सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. ०४ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १२३ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जन धन योजनेअंतर्गत बँक खात्यांची संख्या ५५ कोटींच्या पुढे - निर्मला सीतारामन

नवी दिल्ली, ०३ ऑगस्ट : पंतप्रधान जन धन योजनेअंतर्गत उघडण्यात आलेल्या बँक खात्यांची संख्या आता ५५ कोटींच्या पुढे गेली आहे, अशी माहिती केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज, रविवारी दिली. या खात्यांपैकी बहुसंख्य खाती अशा लोकांची आहेत, जे पूर्वी कधीही बँकेच्या दारात गेले नव्हते, असे त्यांनी नमूद केले.

यासंदर्भात ट्विटरवर (एक्स) जारी केलेल्या संदेशात सीतारामन म्हणाल्या की, या योजनेला १० वर्षे पूर्ण होत असताना आणि केवायसी बंधनकारक झाल्याने, मी सर्व बँकांना आग्रह केला आहे की त्यांनी या प्रक्रियेला अधिक सुलभ करत नागरिकांपर्यंत पोहोच वाढवावी. या अनुषंगाने, १ जुलै २०२५ पासून देशभरात विशेष मोहीम सुरू करण्यात आली असून आतापर्यंत सुमारे १ लाख ग्रामपंचायतींना या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. सीतारामन यांनी सर्व जन धन खातेदारांना आवाहन केले की, त्यांनी या केवायसी शिबिरांमध्ये सहभागी व्हावे व आपली प्रक्रिया पूर्ण करावी.



रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, सुमारे ५६ टक्के जन धन खाती महिलांच्या नावावर असून, २१ मे २०२५ पर्यंत या खात्यांमध्ये एकूण रक्कम २.५ लाख कोटी रुपये झाली आहे. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर एम. राजेश्वर राव यांनी नुकत्याच झालेल्या एका परिसंवादात सांगितले की, प्रधानमंत्री जन धन योजना ही भारतातील वित्तीय समावेशनाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे. जगातील सर्वात मोठ्या समावेशी वित्तीय कार्यक्रमांपैकी ही एक योजना ठरली आहे.

वित्तमंत्री सीतारामन यांच्या म्हणण्यानुसार, चालू आर्थिक वर्षात आणखी ३ कोटी नवीन जन धन खाती उघडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मार्च २०१५ मध्ये प्रति खात्यातील सरासरी शिल्लक १,०६५ रुपये होती, ती आता ४ हजार ३५२ रुपयांवर पोहोचली आहे. सध्या सुमारे ८० टक्के खाती सक्रिय आहेत. यापैकी ६६.६ टक्के खाती ग्रामीण व अर्ध-शहरी भागात उघडण्यात आली असून, २९.५६ कोटी खाती महिलांच्या नावावर आहेत.

वित्त मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, मनरेगा वेतन, उज्ज्वला योजनेतील सबसिडी तसेच कोविड काळातील थेट आर्थिक मदत जन धन योजनेतून

## खोदलेल्या खड्ड्यात पडून दोन मुलांचा मृत्यू

छत्रपती संभाजीनगर, ३ ऑगस्ट : खोदलेल्या जागेतील खड्ड्यात खोल पाण्यात पडून दोन लहान मुलांचा मृत्यू झाला आहे. छत्रपती संभाजीनगर येथे घडली आहे.बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या तळमजल्यात, पार्किंगसाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यातील पाण्यात बुडून दोन चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातील मध्यवर्ती बसस्थानकासमोरील एका खासगी भूखंडावर दोन चिमुकल्यांचा खड्ड्यात पडून दुर्दैवी मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेनं परिसरातील नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे. या घटनेतील मृतांची नावे अद्याप समजू शकली नाहीत. मात्र, सदर भूखंडावर अंडरग्राऊंड पार्किंगसाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम सुरू होते खोदलेल्या जागेतील खड्ड्यात खोल पाणी साचलं.

## पंतप्रधान मोदींनी अचानक घेतली राष्ट्रपतींची भेट



नवी दिल्ली , ३ ऑगस्ट :।पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि.३) अचानक राष्ट्रपती भवनात दाखल होत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. यासंदर्भातील माहिती राष्ट्रपती भवनाने सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर दिली.

राष्ट्रपती भवनाने एक्सवर पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रपती मुर्मू यांच्या भेटीचा फोटो शेअर केला. राष्ट्रपती भवनाने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली.' पंतप्रधानांच्या राष्ट्रपतींसोबतच्या भेटीनंतर वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चा सुरू झाल्या. बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी बिहारमध्ये विशेष सघन आढावा (एसआयआर) वर चर्चा करण्याच्या विरोधकांच्या मागणीवरून संसदेत निर्माण झालेल्या गतिरोधाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांच्यातील ही बैठक होत असल्याचे सांगण्यात येत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाकडून लष्करी उपकरणे आणि कच्चे तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर २५ टक्के कर आणि दंडाची घोषणा केल्यानंतर काही दिवसांनी पंतप्रधान मोदींची राष्ट्रपती मुर्मू यांच्याशी भेट झाली.

## जम्मू-काश्मीरमधील कुलगाममध्ये ३ दिवसांपासून चकमक सुरू

### आतापर्यंत ३ दहशतवादी ठार; २ दहशतवाद्यांना घेराव

कुलगाम: जम्मू-काश्मीरमधील कुलगाममध्ये ३ दिवसांपासून लष्कराचे ऑपरेशन अखल सुरू आहे. याद्वारे एके-४७ रायफल, एके मॅगझिन आणि ग्रेनेडसह शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आले असून, आतापर्यंत ३ दहशतवादी ठार झाल्याचे वृत्त आहे.

कुलगामच्या अखल भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये गोळीबार सुरू आहे. वेढलेल्या जंगलात आणखी २-३ दहशतवादी दडून बसल्याचा अंदाज आहे. या ऑपरेशन अंतर्गत, जम्मू-काश्मीरमधील कुलगाममध्ये आणखी एक दहशतवादी ठार झाला आहे. ज्याचे नाव हरीस नजीर डार (टीआरएफ) असे असल्याचे म्हंटले जात आहे. त्यानुसार, आतापर्यंत एकूण ३ दहशतवादी ठार झाले आहेत. सूत्रांचे म्हणणे आहे की इथे ५ दहशतवाद्यांची टोळी होती, ज्यामधील २ दहशतवादी अजूनही जीवंत आहे.

या भागात दहशतवादी असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शुक्रवारी (१ ऑगस्ट २०२५) जंगलात घेराबंदी आणि शोध मोहीम सुरू केली होती. जंगलाच्या आडून लपलेल्या दहशतवाद्यांच्या एका गटाने सुरक्षा दलांवर गोळीबार केला, त्यानंतर चकमक सुरू झाली. सुरुवातीच्या गोळीबारानंतर शुक्रवारी रात्री ही कारवाई थांबवण्यात आली. शनिवारी पुन्हा सुरू झाली, ज्यामध्ये सुरक्षा दलांनी आतापर्यंत ३ दहशतवाद्यांना ठार मारले आहे. या कारवाईदरम्यान एके-४७ रायफल, एके मॅगझिन आणि ग्रेनेडसह शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला.

## ओडिशा-झारखंड सीमेवर नक्षलवाद्यांनी उडवला रेल्वे ट्रॅक

भुवनेश्वर, ३ ऑगस्ट : संशयित नक्षलवाद्यांनी ओडिशा-झारखंड सीमेवर एक रेल्वे ट्रॅक उडवून दिला. ही घटना माओवाद्यांनी साजरी केलेल्या 'शहीद सप्ताह'च्या शेवटच्या दिवशी घडली. झारखंडमधील करमपाडा आणि ओडिशातील रेंजेडा स्टेशन दरम्यान सारंडा वनक्षेत्रात ही घटना घडली. ज्यामुळे या मार्गावरील गाड्यांची वाहतूक थांबली.प्राथमिक माहितीनुसारबिमलगड रेल्वे विभागाअंतर्गत पहाटेच्या सुमारास स्फोट झाला. ज्यामुळे रेल्वे ट्रॅकचे मोठे नुकसान झाले. पणघटनेच्या वेळी ट्रॅकवर कोणतीही ट्रेन नसल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. घटनेनंतर रेल्वे वाहतूक तात्काळ थांबवण्यात आली आहे. दुसरीकडेओडिशा पोलीस, झारखंड पोलिस, सीआरपीएफ आणि झारखंड जग्वार यांच्या संयुक्त पथकांनी सारंडा वनक्षेत्रात व्यापक शोध आणि कोम्बिंग ऑपरेशन सुरू केले आहे. रेल्वे ट्रॅकवर इतर संभाव्य स्फोटके तपासण्यासाठी बॉम्ब निकामी पथके देखील तैनात करण्यात आली आहेत. झारखंडमधील करमपाडा आणि ओडिशामधील रंगेडा ही दोन्ही स्थानके सीमावर्ती भागात आहेत. आणि ती माओवाद्यांसाठी संवेदनशील मानली जातात.



## राणी मुखर्जीने घेतले सिद्धिविनायकाचे दर्शन

मुंबई, ३ ऑगस्ट - बॉलिवूड अभिनेत्री राणी मुखर्जीने नुकतेच सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले आहे. ज्याचे फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. अलीकडेच ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची शुक्रवारी १ ऑगस्ट रोजी घोषणा करण्यात आली.ज्यात राणी मुखर्जीला पहिल्यांदाच राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आलं आहे.

२०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या त्यांच्या 'मिसेज चटर्जी व्हर्से स नॉर्वे' या चित्रपटासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला आहे. यानंतर आता तिने सिद्धिविनायक मंदिराचे दर्शन घेऊन येथील काही फोटो इंस्टाग्रामवर शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये



ती पारंपरिक ड्रेसमध्ये दिसली. तिचा हा साधा आणि पारंपरिक लूक चाहत्यांना प्रचंड भावला असून, तिच्या फोटोवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.२०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मिसेस चॅटर्जी विरुद्ध नॉर्वे' हा चित्रपट एका सत्य घटनेवर आधारित आहे. या चित्रपटात राणी मुखर्जीने देबिका चॅटर्जी ही भूमिका साकारली होती. ज्यात आपल्या मुलांसाठी आईच्या संघर्षाची कथा मांडली होती. राणी मुखर्जीच्या आगामी 'मर्दानी ३' मध्ये झळकणार आहे. पुढील वर्षी २७ फेब्रुवारी २०२६ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. चाहते देखील तिच्या या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

## लष्करी अधिकाऱ्याकडून स्पाइसजेटच्या कर्मचाऱ्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण

### एका कर्मचाऱ्याच्या पाठीच्या कण्याला फ्रॅक्चर आणि जबड्याला गंभीर दुखापत

श्रीनगर: जम्मू काश्मीरमधील श्रीनगर विमानतळावर एका लष्करी अधिकाऱ्याने स्पाइसजेटच्या चार कर्मचाऱ्यांवर प्राणघातक हल्ला चढवल्याची घटना घडली आहे. अतिरिक्त सामान बाळगल्याबद्दल करण्यात आलेल्या कारवाईमुळे, संतप्त झालेल्या लष्करी अधिकाऱ्याने, तेथे तैनात असलेल्या स्पाइसजेटच्या स्टाफना फ्रीस्टाइल मारहाण करायला सुरुवात केली. या मारहाणीत चार कर्मचाऱ्यांना गंभीर दुखापत झाल्याचे सांगितले जात आहे. ज्याचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल होत आहे.

स्पाइसजेटच्या निवेदनानुसार, ही घटना २६ जुलै रोजी घडली. दिल्लीला जाणाऱ्या एका लष्करी अधिकाऱ्याकडे १६ किलो वजनाचे दोन केबिन सामान होते. देशांतर्गत उड्डाणांमध्ये ७ किलोपेक्षा जास्त वजनाच्या



केबिन सामानावर अतिरिक्त शुल्क आकारले जाते. विमान कंपनीच्या म्हणण्यानुसार, जेव्हा लष्करी अधिकाऱ्याला याची माहिती देण्यात आली तेव्हा त्याने अतिरिक्त शुल्क देण्यास नकार दिला आणि बोर्डिंग प्रक्रिया पूर्ण न करता जबरदस्तीने एअरोब्रिजमध्ये प्रवेश केला. हे विमान सुरक्षा नियमावलीचे उल्लंघन आहे. कर्मचाऱ्यांनी लष्करी अधिकाऱ्याला थांबवण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याने त्यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याने जवळच ठेवलेल्या स्टीलच्या स्टँडने कर्मचाऱ्यावर हल्ला केला.

एअरलाइनने म्हटले आहे की, सैन्य अधिकाऱ्याने स्पाइसजेटच्या चार ग्राउंड स्टाफ अधिकाऱ्यांवर हल्ला केला. आमच्या कर्मचाऱ्यांना वारंवार लाथा आणि ठोसे मारण्यात आले. एका कर्मचाऱ्याच्या पाठीच्या कण्याला फ्रॅक्चर आणि जबड्याला गंभीर दुखापत झाली. स्पाइसजेटचा एक कर्मचारी जमिनीवर बेशुद्ध पडला, परंतु प्रवासी बेशुद्ध कर्मचाऱ्याला लाथा मारत राहिला.

एअरलाइनने म्हटले आहे की, दुसऱ्या कर्मचाऱ्याच्या जबड्यावर जोरदार लाथ मारण्यात आली ज्यामुळे त्याच्या नाकातून आणि तोंडातून रक्त येऊ लागले. तो जखमी कर्मचाऱ्याला मदत करण्यासाठी गेला होता, त्यामुळे त्याच्यावरही हल्ला झाला. जखमी कर्मचाऱ्यांना रुग्णालयात नेण्यात आले. एअरलाइनने म्हटले आहे की त्यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे आणि लष्करी अधिकाऱ्याला नो-फ्लाय लिस्टमध्ये टाकण्याची प्रक्रिया सुरू आहे.

स्पाइसजेटने नागरी विमान वाहतूक मंत्रालयाला पत्र लिहून कर्मचाऱ्यांवर झालेल्या प्राणघातक हल्ल्याची माहिती दिली आहे आणि तसेचग लष्करी अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली आहे. या संदर्भात विमानमानतळ अधिकाऱ्यांनी घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना दिले आहेत.

## सरकारी शाळेत मुलांना दिले श्वानांचे उरलेले अन्न ; ७८ विद्यार्थ्यांना दिले एंटी-रेबीज इंजेक्शन

छत्तीसगड, ३ ऑगस्ट : छत्तीसगडच्या बलौदाबाजार जिल्ह्यातील एका सरकारी शाळेत विद्यार्थ्यांना कुत्र्याने तोंड लावलेले अन्न खायला दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेची विद्यार्थ्यांकडून चौकशी केल्यानंतर ७८ मुलांना अँटी रेबीजचा इंजेक्शन देण्यात आल.या प्रकरणी आता आमदार संदीप साहू यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या घटनेची विद्यार्थ्यांकडून चौकशी केल्यानंतर ७८ विद्यार्थ्यांना अँटी रेबीजचा डोस देण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक आमदार संदीप साहू शाळेत पोहोचले आणि विद्यार्थ्यांशी व शाळा प्रशासनाशी चर्चा केली आणि या घटनेची तक्रार त्यांनी मुख्यमंत्री यांना पत्र लिहून केली असून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.तसेच अँटी रेबीजचे इंजेक्शन कोणाच्या आदेशाने देण्यात आले, यावरही त्यांनी यावेळी प्रश्न उपस्थित केले.

माहितीनुसार, पलारी ब्लॉकमधील लछनपूर गावातील सरकारी माध्यमिक शाळेत मंगळवारी (२९ जुलै ) दुपारी शाळेतील मुलांना जेवण देताना जय स्व-सहायता महिला समूहातील महिलांनी अन्न वाढत असताना एक भटक्या कुत्र्याने भाजीत तोंड लावले. काही विद्यार्थ्यांनी हे पाहिले आणि शिक्षिकांना सांगितले.यानंतर शिक्षिकांनी कुत्र्याच्या तोंड लागलेल्या भाजीतून अन्न न वाढण्याचे महिलांना स्पष्टपणे सांगितले.

## मनोज जरांगे असलेल्या लिफ्टचा अपघात, लिफ्ट जमिनीवर कोसळली

बीड : मराठा नेते मनोज जरांगे पाटील ज्या लिफ्टमध्य होते त्या लिफ्टचा अपघात झाला. लिफ्ट जमिनीवर धाडकन कोसळली. मनोज जरांगे लिफ्टमध्ये असताना ती लिफ्ट थेट जमिनीवर कोसळली.या अपघातातून मनोज जरांगे सुखरुप वाचले. जरांगे बीडमध्ये एका रुग्णालयात गेले होते. ते लिफ्टमधून जात असताना पहिल्या मजल्यावरुन लिफ्ट थेट जमिनीवर कोसळली. यावेळी लिफ्टमध्ये मनोज जरांगे यांच्यासोबत त्यांचे निवडक सहकारी होते. लिफ्टचा दरवाजा तोडून मनोज जरांगे पाटील यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांना बाहेर काढण्यात आले.



राज्य शासनाने मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत निर्णय घेतला आहे. या निर्णयाला आव्हान मिळाल्यामुळे सध्या हा विषय न्यायालयात आहे. न्यायालयीन सुनावणी सुरू असली तरी मनोज जरांगे हे मराठा आरक्षणासाठी सातत्याने उपोषण करतात. त्यामुळे त्यांची तब्येत सारखी बिघडत असते. या परिस्थितीत मनोज जरांगे असलेल्या लिफ्टचा अपघात झाला. यामुळे जरांगेंविषयी त्यांच्या समर्थकांनी चिंता व्यक्त केली आहे.

मनोज जरांगे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. बीडमध्ये एका रुग्णाला भेटण्यासाठी ते शिवाजीराव मेडिकल केअर रुग्णालयात गेले होते. या रुग्णालयात दुसऱ्या मजल्यावर असलेल्या रुग्णाला भेटण्यासाठी जरांगे गेले होते. ते समर्थकांसोबत लिफ्टने दुसऱ्या मजल्यावर जात होते. पण लिफ्ट पहिल्या मजल्यावर असतानाच अपघात झाला. लिफ्ट थेट जमिनीवर कोसळली. लिफ्टमध्ये मनोज जरांगे यांच्यासोबत त्यांचे निवडक सहकारी होते. लिफ्टचा दरवाजा तोडून मनोज जरांगे पाटील यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांना बाहेर काढण्यात आले.



# नवतंत्रज्ञानाच्या आधारे महसूल विभागाची कार्यक्षमत वाढविणार- जिल्हाधिकारी राहुल गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ ऑगस्ट**

बदलत्या काळानुसार लोकहिताची कामे करताना महसूल विभागासमोर नवनवी आव्हाने उभी राहत आहेत. त्या आव्हानांवर मात करण्यासाठी नवतंत्रज्ञानाच्या आधारे महसूल विभागाची कार्यक्षमता वाढविण्यावर जिल्हा प्रशासनाने भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित महसूल दिनाच्या उद्धाटन कार्यक्रमात ते अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

व्यासपीठावर जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, जिल्हा पुरवठा अधिकारी आप्पासाहेब पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे आणि सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी संजय सुंकवाड उपस्थित होते.

महसूल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी 'महसूल विभागाच्या सर्व पातळ्यांवरील समित्यांमधून जिल्ह्याच्या प्रशासनात विश्वासार्हता निर्माण झाली असून, त्यामागे खात्यातील प्रत्येक अधिकाऱ्याची निष्ठा आणि सेवाभाव आहे.' अशा शब्दांमध्ये महसूल खात्याच्या कार्यक्षमतेचे आणि नवोपक्रमांचे त्यांनी कौतुक करत सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. प्रशासनाच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे हिंगोली जिल्हा ई-फेरफाराच्या नोंदी घेण्यात मराठवाडा विभागात प्रथम आला असून, यापुढेही महाराष्ट्रासाठी हिंगोली जिल्हा हा आदर्श जिल्हा ठरावा, यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

महसूल विभागात सुरू असलेल्या माहिती तंत्रज्ञानाच्या नवनवीन बाबींचा वापर करून नवोपक्रमांवर भर द्यावा. सध्याची यंत्रणा मोबाईल-आधारित होत असताना महसूल सेवादेखील लाभार्थ्यांपर्यंत मोबाईलवर डिजिटली स्वरुपात पोहोचविण्याचे धोरण आवश्यक आहे. यामुळे नागरिकांना योजनांचा थेट व पारदर्शक लाभ मिळू शकेल, असेही जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांगितले.

जिल्हा प्रशासनाने अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक ऑनलाइन करण्याचा उपक्रम हाती घेतला असून, महसूल प्रशासनातील उपजिल्हाधिकारी ते गावपातळीवरील सर्व कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक डिजीटल स्वरुपात जतन करण्यात येणार आहे. भूसंपादन, पुरवठा, प्रलंबित प्रकरणे व कोर्टाच्या नोंदी यांचे डिजिटल संग्रह तयार करण्याचे काम महसूल पातळीवर सुरू असून, ही प्रक्रिया भविष्यातील संदर्भांसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असेही जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांगितले.

शासनाच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी पात्र लाभार्थ्यांची यादी, लाभांची सद्यस्थिती व अपूर्ण सेवांचा मागोवा ठेवणारी यंत्रणा विकसित केली जात आहे. आपल्या विभागातील प्रत्येक अधिकारी-कर्मचारी हा कार्यक्षमतेचा आदर्श आहे. कामातील अनुभव व कर्तव्यनिष्ठा यामुळेच महसूल विभाग हा विश्वासाचा आधार बनला आहे, अशा शब्दांत जिल्हाधिकारी गुप्ता यांनी उपस्थितांचे मनोबल वाढविले.

महसूल प्रशासन नागरिकांना अनेक सुविधा पुरवित आहे. त्यामुळे काळानुरुप आधुनिकतेची कास धरून शासनामार्फत नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या विविध समाजाभिमुख सेवांचा लाभ देण्याचे काम महसूल प्रशासनाने करावे, असे सांगून पुरस्कारप्राप्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी कौतुक केले.

महसूल प्रशासन हे राज्य शासनाचे केंद्रीय खाते असून, ते शासनाचा कान, नाक व डोळा बनून काम पाहते. त्यामुळे दैनंदिन काम करताना सर्वांनी त्यांना मिळणाऱ्या पगारात सर्व खर्च भागवावा. तसेच इतर कोणत्याही मोहाला बळी न पडण्याचे आवाहन अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी उपस्थितांना केले.

निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड यांनी प्रास्तविकातून महसूल विभागाने वर्षभरात केलेल्या कामाची व या महसूल सप्ताह अभियानात करण्यात येणाऱ्या कामाची माहिती दिली. सूत्रसंचालन आम्रपाली चोरमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांनी मानले.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते वर्षभरात उत्कृष्ट कामगिरी पार पाडल्याबद्दल वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने, हिंगोलीचे तहसीलदार श्रीकांत भुजबळ, जिल्हाधिकारी यांच्या स्वीय सहायक श्रीमती रंजना कोठाळे यांच्यासह विविध महसूल कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह महसूल विभागातील विविध स्तरांवरील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# भाजपची जिल्हा कार्यकारणीची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ ऑगस्ट**

भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत भाजपच्या नूतन जिल्हा कार्यकारणीची निवड करण्यात आली आहे. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, ज्येष्ठ कार्यकर्ते दुर्गादास साकळे, सरचिटणीस उमेश नागरे यांची उपस्थिती होती.

भाजपचे संघटन मजबुत करण्यासठी तसेच केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहीती व लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात जाऊन काम करावे असे आवाहन यावेळी जिल्हाध्यक्ष घुगे, आ. मुटकुळे यांनी केले. त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यकारणीची निवड करण्यात आली. यामध्ये महिला पदाधिकाऱ्यांनाही स्थान देण्यात आले आहे. जिल्हा उपाध्यक्षपदी वसमतचे शिवदास बोड्डेवार, महेश गोविंदवार, पुरूषोत्तम गडदे, अंकुश आहेर, छायाताई मरडे, दिनकर कोकरे, संतोष टेकाळे, दिलीप देसाई, सखाराम इंगळे, संजय ढोके, पांडुरंग जगताप तर जिल्हा सरचिटणीसपदी उमेश नागरे, खोब्राजी नरवाडे, उमेश सोमानी, सुनिताताई मुळे, चिटणीसपदी शंभुसिंग गहीलोत, प्रकाश नाईक, प्रभाकर रेंगे, कैलास काबरा, हिंमत राठोड, दिपाली पाटील, हनुमान सुर्यवंशी, शिवाजी अडलिंगे, ज्योती वाघमारे, अमिष दरक, शंकर सुर्यवंशी यांची तर कोषाध्यक्षपदी राजेश अग्रवाल यांची निवड करण्यात आली आहे. महिला मोर्चाच्या जिल्हा पदाधिकारीपदी उज्ज्वला तांभाळे, युवा मोर्चाच्या जिल्हा पदाधिकारीपदी शिवाजीराव मुटकुळे, अनुसुचीत जाती मोर्चाच्या जिल्हापदाधिकारीपदी नंदकिशोर खिल्लारे, अनु जमातीच्या जिल्हा पदाधिकारी पदी शशीकांत वडकुते, अल्पसंख्यांक मोर्चाच्या जिल्हापदाधिकारीपदी मो अनिस मो गौस, किसान मोर्चाच्या जिल्हापदाधिकारीपदी विजय नरवाडे, आदिवासी मोर्चाच्या जिल्हापदाधिकारीपदी श्रीरंग हनवते यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते बैठकीला उपस्थित होते.

# मोकाट कुत्र्यांना पकडण्यासाठी पालिकेची विशेष मोहीम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ ऑगस्ट**

शहरात गेल्या काही दिवसांपासून पिसाळलेल्या कुत्र्याने नागरिकांचे जीवन अस्वस्थ केले असून, यापूर्वी आठ नागरिकांना चावा घेतल्याची माहिती समोर आली आहे. परिणामी, हिंगोली नगरपालिकेच्या वतीने या कुत्र्याला पकडण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या कारवाईत स्थानिक नागरिक देखील सक्रिय सहभाग नोंदवत आहेत.

शहरातील विविध भागांमध्ये पिसाळलेला कुत्रा फिरत असून, त्याच्या हल्ल्यामुळे काही नागरिक जखमी झाले आहेत. जखमींवर शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे. या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

नगरपालिकेचे प्राणी नियंत्रण पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले असून, कुत्र्याला पकडण्यासाठी सापळे लावण्यात आले आहेत. मोहिमेमध्ये प्राणी संगोपन अधिकारी, आरोग्य विभागाचे कर्मचारी आणि स्थानिक पोलीस यांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे, परिसरातील नागरिकांनीही पालिकेच्या या मोहिमेत सहभाग घेत कुत्र्याच्या हालचालींबाबत माहिती पुरवली. त्यामुळे कुत्र्याचा थोड्याच वेळात शोध घेण्यात यश आले. काही वेळातच त्याला पकडून सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले. नगरपालिका प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले असून, अशी कोणतीही घटना घडल्यास तात्काळ माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



**हिंगोली- आम्ही हिंदूरक्षक हिंगोलीकर यांच्यावतीने साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, राजेंद्र हलवाई, डॉ अमोल धुमाळ, कैलास श्रीनाथ, महेश बियाणी, राजामती मुटकुळे, मंदाकिनी चव्हाण, ज्योती वाघमारे, सुनिताताई मुळे, अल्का लोखंडे, करण सुतारे, अंकुश हनवते, अरूण कहार आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### खंडेराव सरनाईक यांचा सेवा संघातर्फे सत्कार



हिंगोली- सामाजिक, सांस्कृतिक आणि ग्रंथालय चळवळीत सक्रिय योगदान देणारे शिवश्री खंडेराव सरनाईक यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथमित्र पुरस्कार जाहीर झाला आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लवकरच या पुरस्काराचे वितरण होणार असून, त्यांच्या दीर्घकालीन ग्रंथालय कार्याचा हा सन्मान म्हणून शासनाने गौरव केला आहे. खंडेराव सरनाईक सध्या मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असून, त्यांच्या प्रयत्नांमुळे जिल्ह्यात ग्रंथालय चळवळीला नवे बळ मिळाले आहे. या गौरवाच्या निमित्ताने मराठा सेवा संघातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील स्थापत्य अभियंता मंचकराव पवार, जिल्हा परिषद सवना शाळेचे मुख्याध्यापक सुरेश वानखेडे हे दोघे सेवानिवृत्त झाल्याबद्दल तर डॉ यश खंदारे यांचा एमबीबीएस पदविका पूर्ण केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव ढोकर पाटील, सचिव राजकुमार वायचाळ, पंडित अवचार,पंडित सिरसाट, सुनिता मुळे, पत्रकार गोपालराव सरनायक, शिवराज सरनाईक, महेश राखोंडे, उल्हास पाटील आदींची उपस्थिती होती.

### अवैधरेती वाहतुक करणारे तीन टिप्पर पकडले



हिंगोली- उपविभागीय अधिकारी समाधानजी घुटूकडे, तहसीलदार सखाराम मांडवगडे यांच्या मार्गदर्शनाखाली तांदूळवाडी शिवारामध्ये तिन टिप्पर अंदाजे दोन ब्रास रेती गौणखणीज वाहतूक करणारे रेतीने भरलेले टिप्पर पकडून पोलीस स्टेशन सेनगाव येथे ताब्यात देण्यात आले. सदर कारवाईमध्ये पथक प्रमुख मंडळ अधिकारी के एन पोटे, गजानन पारीसकर, गाहिनाथ दडीमे, देविदास इंगळे आणि ग्राम महसूल अधिकारी रवी इंगोले, प्रशांत देशमुख, संजय लोंढे, वामन राठोड, अनिल गवई, पांडुरंग फुलसावंगे मिलिंद गरपाळ, संभाजी होनमाने, मधुकर लोणकर, हर्षवर्धन गवई, प्रदीप इंगोले, वाहन चालक राजू सावंत यांच्या पथकाने केली.

# माजी नगराध्यक्षसाह पाच नगरसेवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३ ऑगस्ट**

नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष आणि पाच माजी नगरसेवकांनी आमदार राजू नवघरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत थेट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजितदादा पवार गट) मध्ये प्रवेश केला आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनीलजी तटकरे व वसमत विधानसभाचे आमदार राजू नवघरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या प्रमुख तसेच अमोल मिटकरी यांच्या उपस्थितीत मान्यवरांचा पक्षप्रवेश सोहळा पार पाडला.

वसमत नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष वैजनाथ गुंडाळे यांच्यासह माजी नगरसेवक, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, यांच्या समवेत विविध पक्षातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला. या प्रवेशामुळे वसमतच्या राजकारणात नवीन राजकीय समीकरण तयार झाले आहे. यावेळी राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आ राजू नवघरे यांनी वसमतमध्ये केलेल्या विकासकामांमुळे आम्ही प्रेरित झालो. जनतेच्या हितासाठी आणि पुढील काळात वसमतचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आम्ही आता अजित पवार यांच्या नेतृत्वात काम करणार आहोत. या प्रवेशप्रसंगी अजित पवार यांनी नवीन प्रवेशकर्त्यांचे स्वागत करत, वसमतमध्ये पक्ष अधिक मजबूत करण्याचा विश्वास व्यक्त केला. राजू नवघरे यांच्यासारख्या कार्यकर्त्यांमुळे पक्ष खऱ्या अर्थाने जनतेच्या मनात पोहोचतो आहे, असे उद्गार अजितदादांनी काढले.

या ऐतिहासिक पक्षप्रवेशामुळे वसमतमधील आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुका अधिकच रंगतदार होणार हे निश्चित आहे.

# हिंगोलीहून भाविक आयोध्याकडे रवाना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ ऑगस्ट**

येथील ५० ते ६० भावीक शनिवारी कोल्हापूर ते धनबाद दीक्षाभूमी एक्सप्रेस रेल्वे गाडीने अयोध्याकडे रवाना झाले असून त्यांना शुभेच्छा देण्यासाठी शेकडो भावीक हिंगोली रेल्वे स्थानकावर येऊन रवाना केले.

यामध्ये सुभाष दराडे, सुरेखा दराडे, शोभा बांगर, राधाबाई घुगे, सुधा बांगर, मीना बांगर, दत्तराव बांगर, सविता बांगर, कमलाबाई गायकवाड, सुशीला बांगर, दगडा बाई घोळवे, सूर्यकांता बाई मुंढे, बजरंग घुगे, कौशल्या सानप, बेबी काळे, विश्वनाथ घुगे, दिगंबर बांगर, किरण घुगे, विष्णू बांगर, वंदना बांगर, मीना बांगर, नामदेव मुंडे, आदींचा समावेश आहे. या यात्रेत त्यांनी अयोध्या, प्रयाग राज, काशी विश्वनाथ, गया आदी धार्मिक स्थळाना भेटी देऊन दर्शन घेणार आहेत. श्रावण मांस असल्याने सर्व तीर्थक्षेत्राचे दर्शन घेऊन आठ दिवसानंतर हिंगोलीकडे प्रयाण करणार आहेत.

# शिरडशहापूर येथील आश्रमशाळा रामभरोसे



**तभा वृत्तसेवा**
**शिरडशहापूर, ३ ऑगस्ट**

औंढा नागनाथ तालुक्यातील शासकीय प्राथमिक आश्रम शाळा शिरडशहापूर येथे विद्यार्थ्यांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असून पालकांनी तक्रार करूनही काहीच बदल होत नसल्यामुळे ही शाळा रामभरोसे असल्याचे दिसत आहे.

शिरडशहापूर येथील आदिवासी आश्रम शाळेत मुख्याध्यापक खांडरे स्वतः निवासस्थानी राहत नसून तीन वर्षापासून नांदेड येथून ये-जा करीत आहेत. तसेच विद्यार्थ्यांना मेनू प्रमाणे दररोज अंडे, केळी वाटप होत नाही विद्यार्थ्यांना मटन न देता पोल्ट्री दिले जाते. शाळेत जवळपास २०० विद्यार्थ्यांनी आहेत परंतु अजूनही येथे स्त्री अधीक्षक प्रति नियुक्तीवर केलेले आहे. पुरुष अधीक्षक रुजू होत असतानाही मुख्याध्यापक यांनी त्यांना रुजू करून घेतले नाही. चौकीदार हे शिपायाचे काम करत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व देखभालीचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. औंढा तालुक्यातील पालकांनी वारंवार तक्रार करीत आहेत, परंतु या तक्रारीकडे प्रशासनाने लक्ष दिले नाही. काही दिवसापूर्वीच औंढा नागनाथ तालुक्यातील पिंपळदरी येथील शासकीय आश्रम शाळेत एका विद्यार्थिनीने जेवणाच्या वेळेस वर्गात जाऊन वडणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या गंभीर घटना घडलेली असून सुद्धा शिरडशहापूर येथील आश्रम शाळेत रामभरोसे चालत आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी व तसेच हिंगोली जिल्हा अधिकारी यांनी शाळेवर स्वतः लक्ष देऊन विद्यार्थी यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी व तसेच शाळेतील महिला मुख्याध्यापक व तसेच निवासी कर्मचारी अधिकारी राहतील अशी सुविधा करावी अशी मागणी पालकवर्गातून होत आहे.

# अवास्तव अपेक्षा मुलांवर लादू नका-शिवाजीराजे पाटील



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३ ऑगस्ट**

विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारी चर्चा कुटुंबात करा परंतु सध्या कुटुंबात विद्यार्थी आणि पालकांचा संवाद संपलाय. आता वेळ आहे विद्यार्थ्यांना त्यांच्या पायावर उभे करण्याची. त्यांच्या अंगी असलेल्या गुणांना संधी द्या. तुमच्या अवास्तव अपेक्षा कमी करा आणि त्यांच्या करिअरची निवड त्यांच्यावर सोडा, असा सल्ला मास्टर कोच जवाहरलाल नेहरू लीडरशिप इन्स्टिट्यूट नवी दिल्लीचे शिवाजीराजे पाटील यांनी पालकसभेत दिला.

ते लिट्ल किंग्ज इंग्लिश स्कूल, आणि मुक्ताई विद्यालय वसमत येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकसभा आयोजित करण्यात आली होती. त्यांनी विद्यार्थ्यांना मोठं स्वप्न बघण्याची प्रेरणा देताना, स्वाभिमान आणि कष्टाच्या मूल्यांवर भर दिला. यावेळी मागील वर्षी इयत्ता दहावीच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा त्यांना विविध शिष्यवृत्ती देऊन गौरव करण्यात आला. तसेच शाळेत आयोजित विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षेत गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. सभेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेकांनी आपल्या अनुभवातून विचार मांडत सकारात्मक संवाद साधला. शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शंकर घोडके, तुकाराम सूर्यवंशी आणि शाळेतील शिक्षक विद्यार्थी पालक यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## श्री मोहटादेवी विद्यालयात अण्णाभाऊसाठे जयंती व लोकमान्यटिळक पुण्यतिथी संपन्न



बिडकीन दि ३ ऑगस्ट पैठण तालुक्यातील म्हारोळा येथील श्री मोहटादेवी विदयालयात मध्ये लोकशाही अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी निमित्त वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दिपक कर्डीले यांनी तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवछत्रपती विद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख श्रीकांत पाटील होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदी विद्यालयाचे मुख्याध्यापक महेश घोरतळे होते. कार्यक्रमा मध्ये ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. होता सुभाष गवई यांनी आपल्या भाषनातुन विचार मांडले. यावेळी अंजुमन पठाण, ज्योती गायकवाड, प्रशांत शेळके, सतिश मुखेकर, परेश शिंदे,अभय कापसे यांनी अथक आदीक परीश्रम घेतले. तसेच शंकर शिरसाठ, बद्रीनाथ धरपळे, रमेश ऋषि अनिता डोंगरे ऊपस्थित होते.सदर कार्यक्रमासाठी संस्थापक अध्यक्ष डॉ. धनंजय अशोक मुखेकर व संस्थापकीय सचिव वंदनाताई अशोक मुखेकर यानी शुभेच्छा दिल्या.

## बिडकीन येथे लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन



बिडकीन.दि ३ ऑगस्ट – शहरातील पैठण ते छत्रपती संभाजीनगर रोडवरील डॉ अण्णाभाऊ साठे नगर मध्ये आज दि १ रोजी सकाळी १० वाजता साहित्यरत्न लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करत पुष्पहार अर्पण करत जयघोष करण्यात आला.याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य व भाजपा मंडळ अध्यक्ष विजय चव्हाण, काकासाहेब टेके, मनोज पेरे, पोलिस उपनिरीक्षक मनोज पाटील,सरपंच अशोक धर्मे, सरपंच रामेश्वर जाधव, मधुकर सोकटकर, ग्रामपंचायत सदस्य रमेश शिंदे,अंकुश धर्मे,मोहन हिवाळे,किरण गुजर,सागर फरताळे, ज्ञानेश्वर कांबळे, प्रविण चव्हाण, फय्याज पठाण, हसन चाऊस, नरेश रोडगे, राकेश शिंदे, राकेश ढगे, मिलिंद नरवडे,भरत मोघे, विठ्ठल आहेर, मिलिंद इंगोले, जीवन शिंदे,लहु मोघे,किशोर अवचिंदे, अंकुश अवचिंदे,अमोल कोथिंबीरे, यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन रविंद्र गायकवाड यांनी केले.या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत सदस्य रमेश शिंदे व जय श्री राम ग्रुप,बिडकीन यांच्या वतीने करण्यात आले होते.जयंतीनिमित्त आज सायंकाळी ०६ ते १० या वेळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ग्रामपंचायत व इतर शासकीय व निमशासकीय कार्यालये येथे अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

## श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची जयंती उत्साहात



गंगापूर दि.३: श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची ८३२ वी जयंती गंगापुर येथे श्री विठ्ठल मंदिर येथे महाआरती करून साजरी करण्यात आली या वेळी सर्व समाज बांधव या उत्साही वातावरणात सहभागी झाले होते. या प्रसंगी गंगापूर तालुका सराफ सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष आशिष शहाणे,उपाध्यक्ष सुनील अंबिलवादे,उपाध्यक्ष विरेंद्र दहिवाळकर कोषाध्यक्ष दिनेश डहाळे, सहकोषाध्यक्ष अनिल वर्मा, सचिव श्रीकांत मुंडलिक, , संतोष अंबिलवादे, योगेंद्र वर्मा, अनिल बागुल, मनोजशेठ दहीवाळकर, रमाकांत बन्सोड, विजय बन्सोड, सुनील बागुल,शशिकांत दंडगव्हाळ,श्रीकांत बन्सोड,गोविंदराव अंबिलवादे,देवेंद्र सुवर्णकार, कृष्णा शहाणे आनंदराव पाटील, संजय वर्मा, दिनेशशेठ वर्मा, गोपाल वर्मा, अविनाश जाधव, शैलेश दहीवाळ, गिरिष गंगापूरकर कृष्णा सुवर्णकार, आकाश पवार,, लक्ष्मण शहाणे, कृष्णा शहाणे,, सुरेश शहाणे,दीपक दंडगव्हाळ, गौरव कपीले, रामेश्वर वर्मा,संतोष लावंड, भास्कर लावंड,शिवप्रसाद बन्सोड, जीवन मुंडलीक, अनिल चिंतामणी, महेश उदावंत, सुनील अंबीलवादे,अनिल शेलार,सचिन दहीवाळ, बाळकृष्ण भिसे, गणेश सदभावे,राजु दहीवाळ, महेश ऊदावंत, संजय बन्सोड,कुमार डहाळे,बाबासाहेब बन्सोड व सर्व सराफ सुवर्णकार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अमृता सुभाष अभिनीत हॉरर-थ्रिलर 'जारण' च्या वर्ल्ड डिजिटल प्रीमिअरची घोषणा

मुंबई : यंदा ऑगस्ट महिन्यात, झी५-भारतातील अग्रगण्य अति-वैयक्तिकृत (हायपर-पर्सनलाईज्ड), भाषेतील पहिल्या स्ट्रीमिंग मंचावर- 'जारण'सह वर्ल्ड डिजिटल प्रीमिअरसह मराठी भाषेत भयपट प्रदर्शित करण्यात येईल. आपल्या अभिनयाचा विशेष ठसा उमटवणारी गुणी कलाकार अमृता सुभाष हिची भूमिका असणारा, समीक्षकांच्या कौतुकाला पात्र ठरलेला हा भयपट-थरारपट ८ ऑगस्ट रोजी केवळ झी५ वर प्रदर्शित होणार आहे. ए अँड एन सिनेमा एलएलपी आणि ए ३ इव्हेंट्स अँड मीडिया सर्व्हिसेस प्रॉडक्शनच्या सहकार्याने अनीस बझ्मी यांनी सादर केलेले आणि दूरदर्शी लेखक हृषिकेश गुप्ते लिखीत-दिग्दर्शित, जारण खोल दफन केलेल्या रहस्यांनी वेढलेल्या कुटुंबाच्या अस्वस्थ करणाऱ्या जगात प्रेक्षकाना खोलवर घेऊन जाते. भूतकाळ गडप नकार देतो तेव्हा उद्भवणारे भयानक परिणाम कथानकाला आणखी सशक्त करतात. भीतीचे अनामिक सावट, एक दीर्घकाळ दडपलेले रहस्य पुन्हा समोर येते- बरे न झालेले आघात सर्वात त्रासदायक मार्गांनी कसे प्रकट होतात ते समोर येते. अभूतपूर्व रहस्य आणि तीव्र भावनिक नाट्याचे मिश्रण असलेला हा सिनेमा झी५ची धाडसी, विशिष्ट शैलीच्या प्रादेशिक कथाकथनाप्रती असलेली बांधिलकी अधिक घट्ट करतो.

## टाटा पॉवरची दमदार तिमाही कामगिरी – नफा, महसूल आणि अक्षय ऊर्जेत विक्रमी वाढ

छत्रपती संभाजीनगर : भारतातील सर्वात मोठी एकात्मिक वीज कंपनी टाटा पॉवरने आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या तिमाहीत (३० जून २०२५ पर्यंत) रु. १,२६२ कोटींचा करपश्चात नफा नोंदवला, जो वार्षिक ६% वाढ दर्शवतो. महसूल रु. १७,४६४ कोटी (४% वाढ) आणि एबीआयटीडीए रु. ३,९३० कोटी (१७% वाढ) झाला. सलग २३ व्या तिमाहीत कंपनीचा नफा वाढला आहे. अक्षय ऊर्जेत भरारी: तिमाहीत ६५२ मेगावॅट नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प सुरू झाले. एकूण ऑपरेशनल क्षमता ५.६जीडब्ल्यू झाली असून, पुढील ३ तिमाहीत १.६ ऋथ वाढवण्याचे लक्ष्य आहे. रूफटॉप सोलर व्यवसायात २ लाखांहून अधिक इंस्टॉलेशन व ३.४ ऋथ संचयी क्षमता झाली आहे.

## माधवी कोरडे यांचे निधन



सिल्लोड : भाजपा किसान मोर्चा सरचिटणीस व जनता सहकारी पतसंस्था चे चेअरमन मकरंद कोरडे यांच्या आई माधवी मुकुंदराव कोरडे यांचे वयाचा ८० व्या वर्षी वार्धत्यामुळे निधन झाले असून अंतिम विधी ४ ऑगस्ट सकाळी ९ वाजता संभाजीनगर येथे सेंट्रल नाका एन-६ स्मशान भूमी येथे होईल.

# कमी-अधिक पावसामुळे काही ठिकाणी पिके जोमात, तर काही ठिकाणी कोमात

### जिल्ह्यात आठवडाभर पाऊस सुट्टीवर, शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

आठवडाभरापासून पावसाने विश्रांती घेतली आहे. परिणामी, वातावरणात उकाडा जाणवत आहे. पुढील आठ दिवस आणखी हा उकाडा राहण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात कमी-अधिक प्रमाणात पाऊस असून, काही ठिकाणी पिके जोमात, तर काही ठिकाणी कोमात असल्याचे चित्र आहे.

जून महिन्यात धो-धो बरसल्यानंतर जुलै महिन्यातदेखील बहुतेक दिवस पावसाचे राहिले. मात्र, जुलैच्या अखेरीस पावसाने ओढ दिल्याचे चित्र आहे. मागील शनिवारी जोरदार बरसल्यानंतर पाऊस गायब झाला आहे. परिणामी दिवसात बहुतेक वेळ सूर्य आकाशात दिसत आहे. यामुळे वातावरणातील उष्णता वाढली आहे. शनिवारी कमाल तापमान ३१.२ ते किमान २१.८ अंश सेल्सिअस नोंद चिकलठाणा वेधशाळेने केली आहे.

ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांच्या अंदाजानुसार, पुढील आठ दिवस किमान आकाश निरभ्र राहणार असून, उष्णता कायम राहणार आहे. किमान तापमान ३० अंशाच्या आसपास राहील. मात्र, त्यानंतर पुन्हा पाऊस सुरू होईल. ऑगस्ट महिन्यात सरासरीच्या तुलनेत समाधानकारक पाऊस राहील, असा अंदाजही डॉ. साबळे यांनी वर्तविला आहे.

दरम्यान, जून आणि जुलैमध्ये झालेल्या पावसावर शेतकऱ्यांनी पेरण्या आटोपून घेतल्या आहेत. त्यामुळे पिकांना सलग पावसाची गरज आहे. त्यामुळे ऑगस्टमध्ये पावसाची गरज भासणार आहे.

२९१.२ मिमी पाऊस

चालू वर्षी २६ जुलैदरम्यान जिल्ह्यात सरासरी २९१.२ मि. मी. (१०१.४ टक्के) एवढा पाऊस झाला. हा सामान्य पावसाच्या तुलनेत किंचित अधिक आहे. कन्नड : सर्वाधिक पाऊस ४१३.२ मि. मी. (१४३.१ टक्के) म्हणजेच नेहमीच्या तुलनेत ४३ टक्के जास्त पाऊस आहे.

वैजापूर आणि फुलंब्री : अनुक्रमे ११२.३ टक्के आणि १२५.६ टक्के इतका समाधानकारक म्हणजेच नेहमीपेक्षा जास्त पाऊस आहे.

गंगापूर : फक्त १९८.१ मि. मी. (७७.९ टक्के) म्हणजे २२ टक्के, म्हणजेच नेहमीपेक्षा कमी पाऊस आहे.

सिल्लोड, सोयगाव, खुलताबाद : ९३ टक्के, ११७ टक्के दरम्यान म्हणजेच तुलनेने समाधानकारक पाऊस आहे.

विशेष बाबी : गतवर्षी या काळात ३७३.७ मि. मी पाऊस झाला होता. यंदा प्रमाण थोडे कमी असले तरी कोरड्या परिस्थितीपासून बचाव झाला आहे.

पावसाची आवश्यकता

काही ठिकाणी (गंगापूर विभागाच्या पातळीवर) अजूनही ८५ ते ९० टक्के इतके पावसाचे प्रमाण अस्तित्वात आहे. त्यामुळे शेतीसाठी आणखी पावसाची आवश्यकता आहे. सध्या उन पडत असल्यामुळे पुन्हा एकदा पिके कोमेजली असून, चार-आठ दिवसांत पावसाची आवश्यकता असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात यावर्षी मागील शनिवारपर्यंत एकूण समाधानकारक पाऊस पडला आहे. सध्या पिकेही जोमदार आहेत. पावसाचे प्रमाण कमी-अधिक आहे. सर्वाधिक कन्नड व वैजापूर येथे तर गंगापूरमध्ये अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाला आहे. काही तालुक्यांत अजूनही पावसाची अपेक्षा असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

## कै.बाबुरावजी काळे शाळेत लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.,३ ऑगस्ट



कै.बाबुरावजी काळे शाळेत लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.त्यानंतर शाळेच्या दोन्ही सभागृहात प्राथमिक आणि माध्यमिक अशा दोन भागात ४० हून अधिक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.प्राथमिक विभागाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रा.निलेश पाटील तर माध्यमिक विभागाच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ. दादासाहेब पवार हे होते.दोघांनी समारोपीय भाषणात लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याचा आढावा मांडला.या महान विभूतींच्या जयंती आणि पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांनी काहीतरी बोध घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल करावी असे त्यांनी स्पष्ट केले. शाळेचे उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,शीतल पगार,रुपाली मानकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या वेळी पूर्व प्राथमिक शाळेच्या लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या वेशभूशेत उपस्थित चिमुकले आकर्षण ठरली.

इयत्ता १० वीच्या विद्यार्थिनी कु.जिज्ञा दुतोंडे,प्रतीक्षा पगारे,नम्रता बोडखे यांनी सूत्रसंचालन केले.तर कु.मृणाल मानकर,राजलक्ष्मी कुल्ली यांनी आभार मानले. या प्रसंगी पर्यवेक्षक सागर घाटे,प्रा.योगेश काळे,प्रा. मंगेश निकम,शिक्षिका मनिषा पाटील,सीता पगार,जयश्री श्रीवास्तव,आशा गणगे,अंजली कथलकर,शीतल जाधव, अरुणा भोई,रुपाली मानकर,रोहिणी पाटील,रंजना जाधव, उषा ढेपले,नलिनी पाटील हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ज्ञानेश्वर पंडित,रमेश कंडारे,सुनीता जाधव यांनी परिश्रम घेतले.

## रामजीनगर येथे वृक्षदिंडीचे आयोजन करून वृक्षारोपन

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.३ ऑगस्ट



सोयगाव तालुक्यातील उपक्रमशिल जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे महसुल सप्ताह निमित्ताने सोयगाव तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे यांच्या मार्गदर्शनाने सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी याच्या नेतृत्वात शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील सहशिक्षक गोपाल चौधरी यांनी सदस्य शालेय व्यवस्थापन समिती योगेश बोखारे व पालकांच्या उपस्थित वृक्षदिंडीचे आयोजन केले होते.यावेळी विद्यार्थ्यांनी पालखी मध्येवड,पिंपळ,लिंब,सीताफळ,चिंच,पेरू यांची रोपे ठेऊन वाजतगाजत गावात पालखी खांद्यावर घेऊन वृक्षदिंडी काढली तसेच विद्यार्थ्यांनी झाडे लावा झाडे जगवा,वृक्षवल्ली आम्हा सोयरे यासारख्या घोषणानी परीसर दणाणून सोडला.वृक्षदिंडी परत शाळेजवळ आल्या नंतर शालेय परीसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्ष लागवड केले.दरवर्षी शालेय परीसर व काळेनगरच्या भागात विद्यार्थ्यांनी वृक्षरोपण करून त्यांची काळजी घेऊन वृक्ष वाढीस लावल्यामुळे व पालकांच्या सहकार्याने संपूर्ण परीसर हिरवागार झालेला आहे.यावेळी पालक वर्ग मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता.वृक्षदिंडी साठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील सहशिक्षक गोपाल चौधरी यांनी परीश्रम घेतले तर शाळेने वृक्षदिंडी व वृक्षरोपणाच्या आयोजना बद्दल शाळेचे व विद्यार्थ्याचे सोयगाव तहसीलदार मनिषा मेने,सोयगाव गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे यांनी अभिनंदन व कौतूक केले.

## अवैध सावकारी रोखण्यासाठी त्रिसदस्यीय समितीची बैठक संपन्न

अ. नगर : सावकारांच्या जाचाने पिडीत झालेल्या कर्जदार शेतकऱ्यांची व नागरिकांची पिळवणूक थांबविण्यासाठी तसेच अवैध सावकारी व्यवसायावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी शासन निर्देशानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या बैठकीस सावकारांचे जिल्हा निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अहिल्यानगर मंगेश सुरवसे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्यासह जिल्ह्यातील सहकार विभागाच्या सर्व तालुका कार्यालयांचे सहाय्यक निबंधक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले की, बेकायदेशीर सावकारीबाबत तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. अशी प्रकरणे निकाली काढताना सर्व संबंधितांना नोटीस पोहोच झाल्याची खात्री करूनच प्रकरणे गुणवत्तेवर निकाली काढण्याची सूचना त्यांनी दिल्या. याचबरोबर विनापरवाना सावकारांकडून गरजू व्यावसायिक नागरिक व शेतकरी यांनी कर्ज घेऊ नये. सहकार खात्याकडून परवाना दिलेल्या परवानाधारक सावकारांकडूनच कर्ज घ्यावे. यामुळे अवैध सावकारीला रोखण्यास मदत होईल. जे कोणी अवैध सावकारी करून कर्जदारांना नियमबाह्य पद्धतीने व्याज आकारून त्रास देत असतील अशा व्यक्तीविरुद्ध सहकार विभागाकडे तक्रार दाखल करावी संबंधितांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे यावेळी डॉ. आशिया यांनी सुचित केले. जिल्ह्यात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील कलम ३९ अन्वये अवैध सावकारी केल्याप्रकरणी २० गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. अवैध सावकारीमुळे पीडित कर्जदार शेतकरी व नागरिकांनी न घाबरता पुढे येऊन तक्रारी कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व सावकारांचे जिल्हा निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

## भोजापूर चारीच्या विस्तारीकरणामुळे पाण्याचा प्रश्न सुटणार – विखे पाटील

### भोजापूर चारीला पाणीपुरवठा सुरू

अ.नगर, दि. ३ – भोजापूर चारीच्या विस्तारीकरणासाठी ३० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून लवकरच त्याला मंजुरी मिळणार आहे. दमणगंगा – वैतरणा – गोदावरी नदीजोड प्रकल्पात या चारीचा समावेश झाल्याने लवकरच या भागाचा पाणी प्रश्न सुटणार आहे, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

भोजापूर चारीला तब्बल चाळीस वर्षांनंतर पाणी मिळवून देण्यात यश आले असून, यानिमित्ताने संगमनेर तालुक्यातील तिगाव येथे जलपूजन समारंभ पालकमंत्र्यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते.



याप्रसंगी आमदार अमोल खताळ, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सौ.सोनल शहाणे, जलसंधारण विभागाचे अभियंता हरीभाऊ गीते, उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, तसेच लाभक्षेत्रातील शेतकरी व पदाधिकारी उपस्थित होते .

पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, जलसंपदा विभागाच्या माहितीनुसार, चारीच्या रखडलेल्या कामासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यामुळे चारीचे काम पूर्ण होऊन प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. चारी आता जलसंपदा विभागाकडे वर्ग झाल्यामुळे भविष्यातील कामांना गती मिळणार आहे.

याशिवाय, चारीच्या विस्तारीकरणाची मागणी लक्षात घेऊन ३० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्याला लवकरच अंतिम मंजुरी मिळेल. या प्रस्तावांतर्गत पाणी वाहतुकीची कार्यक्षमता वाढविणे, पूर नियंत्रण, तसेच अधिक क्षेत्रास सिंचन सुविधा उपलब्ध होईल.


भोजापूर चारीचा समावेश दमणगंगा – वैतरणा – गोदावरी नदीजोड प्रकल्पात करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे ३३ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याची शक्यता आहे. संबंधित प्रकल्प अहवाल अंतिम टप्प्यात असून, लवकरच अंमलबजावणी सुरू होणार आहे. भविष्यात साकूर व पंचक्रोशीतील गावांचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र योजना तयार करण्यात येत असून, त्याचाही प्रारंभ लवकरच करण्यात येईल,असेही पालकमंत्र्यांनी सांगितले. आमदार अमोल खताळ यांनी ही मनोगत व्यक्त केले.

## मौलाना आझाद ज्युनियर कॉलेज अंडर-१७ फुटबॉल संघाने डी.एस.ओ.सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा जिंकली



सोयगाव,दि.३ ऑगस्ट – मौलाना आझाद कॉलेज ऑफ आर्ट,सायन्स अँड कॉमर्सच्या अंडर- १७ फुटबॉल संघाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ फुटबॉल मैदानावर आयोजित सुब्रतो मुखर्जी डी.एस.ओ.फुटबॉल स्पर्धा २०२५-२६ जिंकली आहे.या शानदार विजयासह,संघ आता २८ जुलै २०२५ रोजी डीएसओ क्रीडा संकुल,बीड येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. हा अभिमानास्पद क्षण साजरा करण्यासाठी,प्राचार्य डॉ. मजहर अहमद फारुकी यांनी खेळाडूंचा आणि संघाचे प्रशिक्षक अकबर खान यांचा सत्कार केला.त्यांनी संघाला आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. उपप्राचार्य शेख अब्बास (ज्युनियर कॉलेज) आणि उपप्राचार्य डॉ.आरिफ पठाण (सिनियर कॉलेज) यांनीही खेळाडूंच्या कठोर परिश्रम आणि कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक केले.या कार्यक्रमाला क्रीडा समिती सदस्य एस.के. आसिफ पटेल उपस्थित होते.हसन झमा खान,एस.के. अख्तर,एस.के.अझहर बाबर,प्राचार्य डॉ.मझहर अहमद फारुकी यांना संघाचा अभिमान आहे आणि ते विभागीय स्तरावर अधिक यश मिळवून देतील अशी आशा आहे.

## सोयगाव आगारातील वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर वाडेकर यांचा सेवानिवृत्त निरोप समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न



सोयगाव,दि.३ ऑगस्ट – सोयगाव बस आगारात दि.३१ जुलै गुरुवार रोजी वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर नारायण वाडेकर सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सेवानिवृत्त निरोप समारंभ सोयगाव बस आगारातील कर्मचाऱ्यातर्फे आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सोयगाव बस आगार प्रमुख मनिष जवळीकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वाहतूक निरीक्षक सतीश अंभोरे होते.यावेळी बस आगार प्रमुख मनिष जवळीकर यांनी मी सोयगाव ते छत्रपती संभाजीनगर बस प्रवास करत असताना मला आमचे चालक,वाहक बस मध्ये मिळाले की ते मला विचारायचे की सोयगावला आमचे वाडेकर साहेब आहेत का असे नेहमी विचारत असतात मी हे ऐकून मला वाडेकर यांच्यावर बस कर्मचाऱ्यांचे किती प्रेम होते हे कळत होते.त्यांचा सोयगाव बस आगारात मध्ये संपूर्ण कार्यकाळ चांगल्या प्रकारे संपन्न झाला आहे.तर सोयगाव बस आगारातील वाहक जयराम सूर्यवंशी,शिक्षक रवींद्र तायडे यांनीही ज्ञानेश्वर वाडेकर यांच्या कार्यकाळाची माहिती सांगितली,

आगारातील वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर नारायण वाडेकर कर्मचाऱ्यांनतर्फे सह पत्नीक व सहकुटुंब यांचा सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनां सजविलेल्या बग्गी मध्ये बसवून मिरवणूक काढून बस डेपो ते सोयगाव स्थानकापर्यंत डीजे मिरवणूकिद्ववारे सह परिवार निरोप देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी यांचे स्नेहीजन आणि मोठ्या संख्येने एस.टी. कर्मचाऱ्यांनी यांनी सहकुटुंब उपस्थित राहून सेवानिवृत्त कर्मचारी यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय कामगार सेना सचिव शिवाजी बोरडे,संतोष पाखरे,जयराम सूर्यवंशी, सहाय्यक वाहतूक नियंत्रण कैलास बागुल,वाहतूक नियंत्रक दिनेश विसपुते,मधुकर शिंदे,विष्णू सोनवणे,रमेश पायघन,अन्नासाहेब ढेपले,वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर गोरे,वर्जन जाधव,राजू बाविस्कर,मधुकर आमटे, सुधाकर बोराडे,रमेश साबळे,सुनिल पवार,अशोक तायडे, सह सोयगाव शहरातील नगरपंचायतचे गटनेते अक्षय काळे, नगरसेवक राजेंद्र दुत्तोडे,संदीप सुरडकर,संतोष वाडेकर,गलवाडा गावचे पोलीस पाटील मिलिंद सोनवणे,भाग्यवान बनसोडे,सोयगाव व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विवेक महाजन आदी उपस्थित होते.

## धर्मतिर्थ क्षेत्रावर ४५ फुट उंचीची सिध्द भगवंताची खडगासन प्रतिमा विराजमान होणार

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – प्रज्ञायोगी दिगंबर जैनाचार्य गुप्तीनंदी गुरुदेव यांच्या आर्शिवाद व प्रेरणेने धर्मतिर्थ क्षेत्राचे निर्माण कार्य प्रगतीपथावर असुन फेब्रुवारी २०२३ मध्ये ऐतिहासीक पंचकल्याणक संपन्न होवुन धर्मतिर्थ क्षेत्रावर ४५ फुट उंचीची सिध्द भगवंताची मुर्तीचे निर्माण कार्य काही दिवसातच सुरू होणार आहे. ज्या पाषाणापासुन हि मुर्ती निर्माण होणार आहे ते पाषाण सजोत पाली राजस्थान येथुन धर्मतिर्थ क्षेत्रावर येणार आहे. २४ जुलै रोजी त्याचे प्रस्थान झाले आहे. या पाषाणाची साईज ४२फुट बाय १२ फुटची असुन २२५ टन वजनाचे हे पाषाण आहे आणि हि प्रतिमा ज्या कमळावर विराजमान होणार आहे. त्या पाषाणाची साईज १५ फुटबाय ९ फुटअसुन त्याचे वजन सुध्दा ४५ टन आहे. परम गुरै भक्त इंदौर निवासी अनिलकुमारजी गोधा यांच्या वतीने या मुर्ती निर्माण करण्यासाठी विशेष सहकार्य मिळाले आहे . या पाषाणाचे ए,एस.क्लब जवळ, सोलापुर हायवे येथे ५ ऑगस्ट रोजी येण्याची शक्यता आहे. या पाषाणाचे स्वागत व पुजा करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर शहरातील राजकीय व सामाजिक कार्यकर्तेची उपस्थिती राहणार आहे. तरी सकल जैन समाजाच्या बांधवांनी पाषाणाच्या स्वागत एवं पुजनासाठी उपस्थित रहावे असे आवाहन धर्मतिर्थ विकास समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर चांदमल पाटणी व महामंत्री पवनकुमार पापडीवाल यांनी केले आहे. तसेच धर्म तिर्थ विकास समितीचे वरीस्ट उपाध्यक्ष संजय पापडीवाल, राजेंद्र पाटणी, शरद जालनापुरकर, सुनिल काला,प्रकाश अजमेरा, चंद्रशेखर पाटणी नेरीवाला, धिरज पाटणी, गुलाबचंद कासलीवाल ,जिंतुरकर, सतिष लोहाडे हे यासाठी परीश्रम घेत आहे.

## जाहिर नोटीस

दिवाणी किरकोळ अर्ज नं. २३७/२०२५

**सोयगांव येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर सोयगांव, यांचे न्यायालयात...**

१. श्रीमती. संगीताबाई सुनिल पाटील वय-५३ वर्षे, धंदा-गृहिणी, २. श्री. वैभव सुनिल खैरनार (पाटील) वय-२७ वर्षे, धंदा-शेती, ३. भाग्यश्री दिपक सुर्यवंशी वय-३१ वर्षे, धंदा-गृहिणी, सर्व रा. छत्रपती शिवाजी चौक, मु.पो. बनोटी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर- ४३११५०

-: विरुध्द :-

सामनेवाले- कोणीही नाही

ज्याअर्थी सुनिल सुखदेव पाटील यांचे दि. ०५/०६/२०२५ रोजी बनोटी येथे निधन झालेले आहे त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी मे. कोर्टामध्ये बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे ॲड. श्री. तन्मय सुनिल जैन यांच्यामार्फत अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा सुनिल सुखदेव पाटील यांचे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकामी केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकिलांमार्फत दि.४/९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता हजर होवून आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. प्रस्तुतची जाहिर नोटीस मे. कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिद्ध केली असे.

ही जाहिर नोटीस ता. ३१/७/२०२५

लिपिक | अधिक्षक

सि.ज.ज्यु.डि.सा., सोयगांव

# दुरावलेला मित्र पुन्हा जवळ!

प्रासंगिक

जनार्दन पाटील



केरळच्या किनाऱ्यापासून सुमारे ५०० किलोमीटर अंतरावर असलेल्या जगातील सर्वांत लहान मुस्लिम राष्ट्र असलेले मालदीव भारतासाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. असे असूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मालदीव दौरा सहा वर्षांनंतरच शक्य झाला. कारण चीन आणि पाकिस्तानच्या प्रयत्नांमुळे तेथे निर्माण झालेले भारतविरोधी वातावरण निष्क्रिय करण्यासाठी थोडा वेळ लागला. चीनने हिंद महासागराच्या मुख्य व्यापार मार्गाजवळ असलेल्या या देशावर नजर ठेवायला सुरुवात केल्यापासून भारत आणि मालदीवमधील संबंधांवर परिणाम होऊ लागला होता. या दशकात मालदीवच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याचे आणि आपल्याला अनुकूल सरकार स्थापन करण्याचे प्रयत्न चीन आणि पाकिस्तानकडून होत आहेत; परंतु चीनने मालदीवच्या सागरी क्षेत्रात आपली उपस्थिती निर्माण करण्याच्या उद्देशाने एक बेट भाडेतत्त्वावर घेतले, तेव्हा स्वाभाविकपणे भारताची चिंता वाढली. या बेटाच्या बहाण्याने चीनने केवळ आपली नौदल जहाजे मालदीवमध्ये पाठवण्यास सुरुवात केली नाहीत, तर ती कायमची तैनात करण्याचाही विचार केला. दुसरीकडे, भारताने मालदीवच्या सागरी क्षेत्रांवर लक्ष ठेवण्यासाठी केवळ त्याच्या तटरक्षक दलाशी सहकार्याचे संबंध प्रस्थापित केले नाहीत, तर तेथील एका बेटावर आपले रडार केंद्रदेखील स्थापित केले. दोन वर्षांपूर्वी मालदीवने भारतीय सैन्य हटवण्याची सूचना केली. भारताविषयी गरळ ओकली. त्यामुळे भारतीय पर्यटकांनी मालदीवऐवजी अंदमान- निकोबारचा पर्याय स्वीकारला. परिणामी, या देशाशी आपले संबंध बिघडले.

मालदीवची अर्थव्यवस्था भारत आणि रशियाच्या पर्यटकांवर अवलंबून आहे. मालदीवच्या जीडीपीमध्ये पर्यटनाचा वाटा तीस टक्के आहे. चीनच्या पर्यटकांची संख्या वाढली असली, तरी मुळात तिथले पर्यटक मालदीवला कमी जातात. भारताशी पंगा घेणे मालदीवला परवडणारे नव्हते; शिवाय चीनच्या कर्जाच्या विळख्यात अडकले, तर देश आणखीच अडचणीत येईल, याची जाणीव मालदीवच्या सत्ताधाऱ्यांना झाली. चीनची मदत सहेतुक असते. अडचणीच्या काळात तो मागे उभा राहीलच याची शाश्वती नसते. मालदीवच्या आक्रस्ताळी भूमिकेनंतरही भारताने अतिशय संयत प्रतिक्रिया दिली. भारताने मदत थांबवली नाही, तर मदतीचा हात दिला. त्यामुळे आता आपला खरा मित्र कोण आणि फायद्यासाठी मैत्रीचा हात पुढे करणारा मित्र कोण यातला फरक लक्षात आला. भारताशी सहकार्य संबंधांशिवाय मालदीव चीन आणि पाकिस्तानच्या बळावर जास्त काळ टिकू शकत नाही. सुमारे चार दशकांपूर्वी १९८८ मध्ये काही बंडखोर तत्कालीन अध्यक्ष अब्दुल गयूम यांना उलथवून टाकण्यासाठी माले येथे उतरले, तेव्हा त्यांनी भारताकडे मदत मागितली होती. राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील तत्कालीन सरकारने गयूम यांची सत्ता वाचवण्यासाठी 'ऑपरेशन कॅक्टस' अंतर्गत भारतीय हवाई दलाच्या वाहतूक विमानातून माले येथे सैन्य पाठवले होते.

भारताशी संबंधांवर परिणाम करण्यासाठी पाकिस्तानी गुप्तचर संस्था 'आयएसआय' मालदीवमधील पाच लाख सुन्नी मुस्लिम लोकसंख्येच्या धार्मिक भावना भडकवून भारतविरोधी बनवण्याचा प्रयत्न करत आहे; परंतु हा प्रयत्न यशस्वी होणार नाही, हे मोदी यांच्या दौऱ्यातून स्पष्ट झाले आहे. त्यांच्या मालदीव दौऱ्यादरम्यान पायाभूत सुविधांच्या विकासासाठी भारताने मालदीवला सुमारे ४८५० कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली. याचा दोन्ही देशांना फायदा होईल. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे भारताच्या आर्थिक मदतीमुळे मालदीववरील चीनचा कर्जाचा बोजा कमी होण्यासही मदत होईल. मालदीववर चीनचे एक अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त कर्ज आहे. मालदीव पूर्वी चीन आणि इतर देशांना दर वर्षी ५१ दशलक्ष डॉलर्स देत असे. भारताच्या मदतीमुळे आता ही रक्कम फक्त २९ दशलक्ष डॉलर्सवर येईल. यामुळे मालदीवचे चीनवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल. मोदी यांच्या या भेटीनंतर आता मालदीवचे नेते आपल्या देशाच्या राजकारणावर प्रभाव पाडण्यासाठी चीन योजत असलेल्या युक्त्या समजून घेतील, अशी आशा निर्माण झाली आहे. भारताने मुईझ्झू यांना चीनच्या प्रभावापासून दूर ठेवून शेजारील देशाशी जुने संबंध पुनर्संचयित करण्यासाठी अभूतपूर्व संयम आणि राजनैतिक कौशल्य दाखवले आहे. चीनसमर्थक मानल्या जाणाऱ्या मुईझ्झू यांनी भारताशी संरक्षण सहकार्याचे संबंध पुनर्संचयित करण्याचे संकेत दिले आहेत. त्याचबरोबर भारताच्या सुरक्षा हितांना हानी पोहोचवू शकेल असे कोणतेही पाऊल उचलणार नाही, असे आश्वासनदेखील दिले आहे.

भौगोलिकदृष्ट्या मालदीवला जगातील सर्वाधिक विखुरलेला देश म्हटले जाते. एका बेटावरून दुसऱ्या बेटावर जाण्यासाठी येथे फेरी बोटीचा वापर करावा लागतो. मालदीव १९६५ मध्ये ब्रिटनपासून राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर तीन वर्षांनी मालदीव एक संवैधानिक इस्लामिक प्रजासत्ताक बनले. स्वातंत्र्यानंतर, मालदीवच्या लोकांच्या राजकारणात आणि जीवनात इस्लामला महत्त्वाचे स्थान आहे. २००८ मध्ये मालदीवमध्ये इस्लाम हा राज्य धर्म बनला. मालदीव हा जगातील सर्वांत लहान इस्लामिक देश आहे. २६ जुलै रोजी मालदीवचा साठावा स्वातंत्र्यदिन होता. या कार्यक्रमाला मोदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मोदी यांचा मालदीवचा हा तिसरा दौरा आहे. पूर्वी मालदीव सरकार 'इंडिया फर्स्ट' धोरणाचे पालन करत होते; परंतु मुईझ्झू यांनी हे धोरण संपवण्याचे आश्वासन दिले होते. मुईझ्झू यांनी चीनशी संबंध अधिक दृढ केले होते. भारताने ७.५ अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था असलेल्या मालदीवला दिवाळखोर होण्यापासून वाचवल्यानंतर मुईझ्झू यांचा भारताबद्दलचा दृष्टिकोन बदलला. मालदीव हिंदी महासागरातील प्रमुख सागरी मार्गांजवळ आहे. या मार्गांवरून आंतरराष्ट्रीय व्यापार होतो. या मार्गाने आखाती देशांमधून भारताला ऊर्जा पुरवली जाते. अशा परिस्थितीत मालदीवशी भारताचे बिघडणारे संबंध कोणत्याही प्रकारे चांगले मानले जात नव्हते. भारताच्या आर्थिक आणि धोरणात्मक हितसंबंधांसाठी हा मार्ग खूप महत्त्वाचा आहे. मालदीवशी चांगले संबंध भारताची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करतात.

भारताच्या सागरी देखरेखीमध्येही मालदीवचे सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे. मालदीव हे भारताच्या लक्षद्वीपपासून सुमारे ७०० किलोमीटर आणि भारताच्या मुख्य भूमीपासून १२०० किलोमीटर अंतरावर आहे. चीनने मालदीवमध्ये नौदल तळ बांधणे भारतासाठी सुरक्षेचे आव्हान निर्माण करते. चीन जगात बलवान झाला, तर युद्धसदृश परिस्थितीत भारतापर्यंत पोहोचणे त्याच्यासाठी खूप सोपे होईल. मालदीवमध्ये चीनचे अनेक प्रकल्प आहेत. अशा परिस्थितीत भारताने सतर्क राहणे आवश्यक आहे. मालदीवचे जनमत अजूनही भारताविरुद्ध आहे. असे असले, तरी भारताने मालदीवच्या अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केली आहे. यापैकी 'ग्रेटर माले कनेक्टिव्हिटी' प्रकल्प हा चीनला टक्कर देण्याचा एक मार्ग म्हणून पाहिला जातो. चीन मालदीवमध्ये २०० दशलक्ष डॉलर्सचा चीन-मालदीव मैत्री पूल बांधत आहे. मालदीवमध्ये चीनची वाढती उपस्थिती भारताच्या सुरक्षेसाठी धोका असल्याचे अनेक विश्लेषकांचे मत आहे. मालदीवने माले विमानतळाजवळील एक बेट चार दशलक्ष डॉलर्समध्ये चीनला ५० वर्षांसाठी भाड्याने दिले. चीन 'बेल्ट ॲण्ड रोड इनिशिएटिव्ह' उपक्रमांतर्गत हिंद महासागरात आपली उपस्थिती वाढवत आहे आणि त्यासाठी मालदीवमध्ये अनेक प्रकल्पांवर काम करत आहे. दोन वर्षांपूर्वी 'क्विट इंडिया' धोरण राबवणाऱ्या, भारतीय सैन्याला 'चले जाव' म्हणणाऱ्या मालदीवने आता 'इंडिया फर्स्ट' धोरण जाहीर केले आहे.

भारत आणि चीन या दोन्ही राष्ट्रांसाठी मालदीवचे भू-राजकीय स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. चीनने मदत देऊनही मालदीवला पुन्हा भारताशी मैत्री करावी का लागली, याचे उत्तर अर्थकारणात आहे. मोदी आणि मोईझ्झू यांच्या भेटीत संरक्षण आणि सागरी सुरक्षेसह इतर अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांत सहकार्य मजबूत करण्याबाबत व्यापक चर्चा झाली. आता भारत आणि मालदीवमधील संबंधांमध्ये एक नवीन अध्याय सुरू होईल, असे मानले जात आहे. भारताने मालदीवबद्दल संयमाची पातळी दाखवल्यानंतर आता विश्वासाची मैत्री पुढे नेण्यावर भर दिला आहे, त्यामुळे मालदीवसाठी सकारात्मक परिस्थिती निर्माण होईल.

# जाणीव सामाजिक सेवाशिल्पींची

दखल

सुरेश देव

## सामाजिक सेवाशिल्पी पुरस्काराच्या निमित्ताने...

धरमपेठ शिक्षण संस्थेचा वर्धापन दिवस ३ ऑगस्टला संपन्न होतोय. संस्थेचे संस्थापक कै. आप्पासाहेब फाटक यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, ध्येयासक्त वृत्तीने ही शिक्षण संस्था छोट्याशा स्वरूपात सुरू केली. पुढे, नि:स्पृह वृत्तीने व शैक्षणिक सेवाभावाने अनेक धुरिणांनी ही संस्था मोठी केली. शिक्षण हे एक सामाजिक ऋण आहे. ती एक सामाजिक, शैक्षणिक गुंतवणूक आहे. म्हणूनच ही संस्था वर्धापन दिवस हा 'सामाजिक जाणीव दिवस' म्हणून साजरा करते. सेवाभावी वृत्तीने शैक्षणिक सेवा करताना असे लक्षात येते की समाजातही अशाच निरपेक्ष भावनेने दुर्बल घटकांची, वंचितांची, गोरगरीब जनतेची सेवा करणाऱ्या काही संस्था, काही महानुभाव आहेत. विदर्भाच्या कानाकोपऱ्यात ग्रामीण भागांत, आदिवासी, भटके विमुक्त, गोंड, भिल्ल, कोरकू, पारधी अशा कितीतरी मागासलेल्या, अशिक्षित जाती जमातीचे बांधव, दुर्लक्षित, दुय्यम दर्जाचे जीवन जगत असतात. या दुर्लक्षित गोरगरिबांची सेवा करून त्यांच्या सामाजिक समस्या सोडविण्याचे, अथक प्रयत्न सेवाभावी वृत्तीने अशा संस्था कार्य करतात. अशा संस्था, असे महानुभाव हे खऱ्या अर्थाने 'समाजशिल्पी' आहेत. पण ते दुर्लक्षित व प्रसिद्धिपराङ्मुख आहेत हे विशेष. अशा दुर्बल सामाजिक घटकांची सेवा करणाऱ्या या खऱ्या समाजशिल्पींचे कार्य एका अर्थाने फार मोठे असे शैक्षणिक व समाज उभारणीचे कार्य आहे.

संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकरांनी हा विचार व कल्पना उचलून धरली. स्थापनादिनी अशा सेवाभावी संस्थांना, 'सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार' द्यावा असा प्रस्ताव ठेवला. विदर्भातील अशा सेवाभावी संस्थेचा गौरव करावा, असा मनोदय त्यांनी कार्यकारिणीसमोर ठेवला. कार्यकारिणीने शुभस्य शीघ्रम या गतीने, हा स्तुत्य उपक्रम सुरू केला. पुरस्कार समिती, निवड प्रक्रिया, प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट देणे, संस्थांशी संवाद साधणे, सगळ्याच बाबी कार्यान्वित होत गेल्या. आजवर संस्थेने तीन समाजशिल्पी पुरस्कार दिलेले आहेत.

सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार पहिल्या वर्षी, भंडारा जिल्ह्यातील भटके-विमुक्त-संस्था यांना प्रदान करण्यात आला. गावकुसाबाहेर पारधी बेड्यावर राहणाऱ्या, भटक्या जमातीतील वंचितांची सेवा करणाऱ्या, या संस्थेने भटक्या विमुक्त समाजाची मुख्य समस्या-त्यांना या देशाचे 'नागरिकत्व मिळवून देणे', यापासून ते शैक्षणिक-सामाजिक प्रश्नांना हात घालणे, इत्यादी कार्य केलेले आहे. अत्यंत दुरवस्थेत, दुर्लक्षित वस्त्यांमध्ये सुद्धा संस्थेने चालवलेली 'संस्कार शाळा' इथे बघून आपण थक्क होतो. असेच कार्य, यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा ग्रामीण भागात एक 'आदिवासी संस्था' करतेय. या भागात व्यसनाधीनता, कुमारी मातांचा प्रश्न, अंधश्रद्धा, बेरोजगारीचा प्रश्न, मोठ्या प्रमाणात आहे. प्रस्तुत संस्थेने हे प्रश्न हाताळताना, महिलांच्या व बालकांच्या समस्या खूप प्रयत्नपूर्वक सेवाभावाने हाताळल्या. दुसऱ्या वर्षीचा पुरस्कार आम्ही त्यांना प्रदान केला, तर तिसऱ्या वर्षी गडचिरोली भागातील एटापल्ली भागातील एक सेवा प्रकल्पाला पुरस्कार देण्यात आला. याही भागात कोरकू पारधी, आदिवासींच्या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत. तिथे ही संस्था शिक्षण, आरोग्याच्या सेवासुविधा, पुरविण्याचे विविध प्रकल्प राबविण्याचे खरोखरीच स्पृहणीय कार्य करतेय.

यावर्षी, सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार अकोला व बुलढाणा क्षेत्रातील सामाजिक संस्थेला द्यावा हा मनोदय होता. त्यानुसार शोधकार्य करताना, दोन संस्थांचे शैक्षणिक-सामाजिक कार्य पुरस्कार समितीला भावले.

अकोला जिल्ह्यातील, गायगाव येथील कस्तुरी सेवा प्रकल्पाला तसेच बुलढाणा जिल्ह्यातील जामोद येथील वनवासी सेवा समितीला सेवाशिल्पी पुरस्कार यंदा घोषित करण्यात आला आहे. प्रस्तुत पुरस्कार रोख राशी, एक लाख रुपये, सन्मान चिन्हांसह, संस्थेच्या वर्धापन दिनी ३ ऑगस्टला देण्यात येईल. रा. स्व. संघाचे अ. भा. कार्यकारिणी सदस्य मा. श्री. भय्याजी जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार सन्मान दिला जाणार आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील, जामोद येथील वनवासी सेवासमितीची आश्रम शाळा ही २२ खेड्यांतील आदिवासी भिल्ल समाजाच्या जवळपास १०८ मुलांना शैक्षणिक संस्कार नि:स्पृहपणे देत आहे. सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी ही खेडी व ही आश्रमशाळा आहे. वनराई, जंगल झुडपं, विदर्भाच्या कोपऱ्यात या दुर्लक्षित भागात पण स्वाभिमानाने काम करणारी ही संस्था, सरकारी अनुदान न घेता स्वआश्रयाने प्रतिकूल परिस्थितीत वाटचाल करतेय.

या भागात भिल्ल, कोरकू समाजाचे दारिद्र्य, दैन्य व अशिक्षितपणाचा फायदा घेऊन, इथे 'धर्मातरणांची समस्या' उग्र झाली आहे. पण जनजागृती करून, शैक्षणिक सेवा, रुग्णसेवा देऊन, तसेच लोकप्रबोधन करून, वनवासी सेवा आश्रम समितीने 'घरवापसीचा' कार्यक्रम जोरकसपणे राबविला. तेथील धर्मातरण थांबविले! खरे तर या संस्थेला खूप आर्थिक, सामाजिक मदतीची मोठी गरज आहे. आमच्या संस्थेने हे कार्य लक्षात घेऊन, हा एक लाखाचा अल्पसा : सेवाशिल्पी पुरस्कार त्यांना सहर्ष घोषित केलाय.

अकोला जिल्ह्यातील- 'कस्तुरी-प्रकल्प' हा आध्यात्मिक प्रेरणेतून उभा झालाय. श्रद्धा, धार्मिक भावनांमधून, सेवाभावी वृत्तीने सामाजिक कार्य सुद्धा कसे घडते, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे 'कस्तुरी प्रकल्प'. शेगावचे संतश्रेष्ठ गजानन महाराज ही या संस्थेची श्रद्धा. यामुळे गजानन महाराज मंदिर व सेवा उपक्रम इथे उभा झालाय. शेगावची पंढरीची पायदळ वारी इथे थांबते. शेकडो वारकऱ्यांची इथे 'सेवा' म्हणून 'विसावा' व्यवस्था आहे. तसेच विदर्भातील शेगावला पायदळ वारी करणाऱ्यांचीही इथे सोय होते.

या संस्थेने, आम्हाला सातपुडा पर्वताच्या कुशीत लहानशा आदिवासी गावी - 'चिपी' येथे आदिवासी संस्कृतीची, गरिबीचे, उपेक्षितांचे दर्शन घडविले! गजानन महाराजांचे शिष्य भास्कर पाटील ज्या 'आडगावी' समाधीस्थ झाले, त्या जंगलातील, रमणीय वनराईतील हे छोटेसे गाव! इथे आदिवासी बांधवांनी नृत्य सादर करत आमचे स्वागत केले. पारंपरिक पद्धतीने औक्षण करून आतिथ्य केले. पुढे ग्रामदेवतेची पूजा, बालगोपालांनी केलेली समाज-प्रार्थना, तसेच गावकऱ्यांचे अठराविश्व दारिद्र्य सगळेच मनाला हेलावून टाकणारे तसेच भारावून टाकणारे होते! अत्यंत कृतार्थ नजरेने आम्ही सर्व सेवाकार्य अनुभवत होतो. खऱ्या अर्थाने कार्य करणाऱ्या समाज 'सेवाशिल्पींची' जाणीव आता इथे प्रखरपणे मुखर होत होती. खरोखरीच, अशा सेवाभावी संस्थांना दिलेला पुरस्कार आता 'औचित्यपूर्ण' वाटत होता...!

सचिव, धरमपेठ शिक्षण संस्था

# २५ टक्के शुल्काचे उत्तर : आत्मनिर्भर भारताचे जागतिक गान

प्रासंगिक

श्याम जाजू : माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष (भाजपा)

३० जुलै २०२५ अमेरिकेचे अध्यक्ष श्री. डोनाल्ड ट्रम्प यांनी एका आश्चर्यकारक घोषणेत भारतातील जवळजवळ सर्व आयातीवर २५% कर लादण्याची घोषणा केली आहे. या करांमध्ये भारतातील सर्वात महत्वाच्या निर्यात वस्तू जसे की औषधे (विशेषतः जेनेरिक औषधे), कापड, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, ऑटो पार्ट्स, फार्मास्युटिकल एपीआय आणि औद्योगिक यंत्रसामग्री यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, ट्रम्प प्रशासनाने असेही सूचित केले आहे की जर भारताने रशियाकडून तेल आणि शस्त्रे खरेदी करणे सुरू ठेवले तर त्याला अधिकचा म्हणजे अतिरिक्त दंडात्मक कर लादला जाईल. हे धोरण केवळ आर्थिक दृष्टिकोनातूनच नाही तर भू-राजकीय, राजनैतिक आणि धोरणात्मक दृष्टिकोनातून देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. गेल्या दोन दशकांमध्ये भारत आणि अमेरिकेतील संबंध अधिक दृढ झाले आहेत. मग ते संरक्षण करार असोत, तांत्रिक सहकार्य असोत किंवा क्वाडसारखे बहुपक्षीय मंच असोत. अशा परिस्थितीत, ट्रम्पचे हे धोरण अचानक एका अनपेक्षित वळणाचे संकेत देते, जे केवळ व्यापार संबंधांवरच नव्हे तर संपूर्ण जागतिक संतुलनावर परिणाम करू शकते.

**ट्रम्पची निवडणूक रणनीती आणि ' अमेरिका फर्स्ट ' चे पुनरागमन**

२०२५ च्या निवडणुकीच्या हंगामात डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा त्यांचे प्रसिद्ध पण वादग्रस्त अमेरिका फर्स्ट हे घोषवाक्य वापरात होते. ट्रम्प यांनी अमेरिकेचे धोरण केंद्रस्थानी ठेवले आहे. त्यांचा असा दावा आहे की परदेशी उत्पादनांवर जास्त कर लादल्याने अमेरिकन कंपन्यांचे संरक्षण होईल, देशात नोकऱ्या परत येतील आणि देशांतर्गत उत्पादन वाढेल. ट्रम्प यांच्या मते, भारतासारख्या देशांमधून स्वस्त आयात अमेरिकेच्या उत्पादन उद्योगाला हानी पोहोचवत आहे. त्यांच्या निवडणूक आश्वासनांमध्ये, ट्रम्प यांनी पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय व्यापार करारांचा आढावा घेण्याबद्दल, चीन आणि भारतासारख्या देशांवर कारवाई करण्याबद्दल आणि अमेरिकेत पुनर्औद्योगीकरण करण्याबद्दल बोलत होते. ट्रम्प यांनी असेही म्हटले की अमेरिका यापुढे मोफत जेवण देणार नाही आणि प्रत्येक मित्र देशाला 'cost-benefit' च्या आधाराने वागणूक दिली जाईल. म्हणूनच भारतासारखे सहयोगी देश, ज्यांनी रशियाकडून ऊर्जा आणि संरक्षण उपकरणे खरेदी केली आहेत, ते आता ट्रम्प तात्यांच्या रडारवर आहेत.

**आंतरराष्ट्रीय संदर्भ आणि भू-राजकीय संदेश**



हा निर्णय केवळ भारतासाठीच नाही तर इतर अमेरिकन भागीदारांसाठी देखील धमकीवजा संकेत आहे. ट्रम्प प्रत्यक्षात एक व्यापक भू-राजकीय संदेश देण्याचा प्रयत्न करीत आहेत की जर एखादा देश अमेरिकेच्या धोरणात्मक प्राधान्यांविरुद्ध गेला, जसे की रशियाशी व्यापार, तर त्याला आर्थिकदृष्ट्या शिक्षा होऊ शकते. हे धोरण अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पारंपारिक उदारमतवादी आंतरराष्ट्रीय व्यवस्थेविरुद्ध ((liberal world order) आहे. युक्रेन युद्ध, चीन-तैवान तणाव आणि जागतिक आर्थिक मंदी यासारख्या आव्हानांमुळे जगभरात अनिश्चितता पसरत असताना ट्रम्प यांचे हे पाऊल उचलण्यात आले आहे. अशा परिस्थितीत, भारतावर शुल्क आणि दंडात्मक कर लादण्याचा ट्रम्प यांचा निर्णय एकतर्फी मानता येणार नाही; तो अमेरिकेच्या भू-राजकीय पुनर्रचनेकडे (realignment) देखील निर्देश करतो .

**नोबेल पारितोषिकाचे आकर्षण आणि त्याची युद्ध-प्रतिबंधक प्रतिमा**

मनोरंजक म्हणजे, यावेळी ट्रम्प स्वतःला शांतता-दूत म्हणत आहेत. निवडणुकांमध्ये जर ते सत्तेत परतले तर ते २४ तासांच्या आत रशिया-युक्रेन युद्ध थांबवतील असा दावा त्यांनी होता, काय झाले आपणास ठाऊक आहेच ! अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी असाच भारत-पाक समेट करण्याचा केलेला दावा सुद्धा संसदेत भारताने स्पष्टपणे फेटाळून लावला आहे. हा केवळ नकार नव्हता, तर तो भारताच्या सार्वभौमत्वाची आणि राजनैतिक तत्त्वांच्या दृढतेची घोषणा होती, महासत्ता कोणीही असो, भारत आपल्या भूमिकेपासून हटणार नाही. त्याचप्रमाणे, त्यांनी चीन आणि तैवानमधील तणाव कमी करण्यासाठी हस्तक्षेप करण्याचे संकेत देखील दिले आहेत. हे सर्व नोबेल शांतता पुरस्कार मिळविण्याच्या आकांक्षेशी देखील जोडलेले आहे, ज्याचा ट्रम्प यांनी अनेक वेळा जाहीरपणे उल्लेख केला आहे. या पार्श्वभूमीवर, भारतासारख्या देशांवर कर लादण्याचा आणि रशियासोबतच्या व्यापारावर दंड आकारण्याचा ट्रम्पचा निर्णय हा त्यांची ती प्रतिमा मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. त्यांची रणनीती स्पष्ट आहे. अमेरिकेच्या आर्थिक हितसंबंधांच्या नावाखाली देशांतर्गत जनमत एकत्र करणे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर एक निर्णायक नेता म्हणून पुनरागमन करणे !

**अमेरिकेतील अस्वस्थ जनमत आणि परराष्ट्र धोरणाचे राजकीयीकरण**

सध्या अंतर्गत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय आव्हानांना तोंड देत आहे. पराकोटीची महागाई, बेरोजगारी, OPOED साथीचे रोग आणि राजकीय ध्रुवीकरण यासारख्या समस्यांमुळे सामान्य अमेरिकन नागरिकाचा सरकार आणि जागतिकीकरणावरील विश्वास उडत आहे. अशा परिस्थितीत, ट्रम्पसारखे नेते बळीचा बकरा बनवणे सारख्या क्लुप्त्या वापरून जनमत स्वतः कडे आकर्षित करू इच्छितात आणि भारत आणि चीनसारखे देश त्या धोरणाचा भाग बनतात. तंत्रज्ञान, औद्योगिक आणि संरक्षण क्षेत्रात अमेरिकेचे धोरणात्मक सहयोगी असलेल्या भारतासारख्या लोकशाही देशांबद्दल ट्रम्प यांचा दृष्टिकोन, केवळ व्यापार तुटीच्या दृष्टिकोनातून, हे दर्शविते की अमेरिकेचे परराष्ट्र धोरण आता धोरणात्मक स्थिरतेपेक्षा अंतर्गत राजकारणाने चालवले जात आहे. हा एक धोकादायक ट्रेंड आहे, जो येत्या काळात ग्लोबल साउथमधील देशांसाठी एक मोठे आव्हान बनू शकतो.

**इतिहासाची पुनरावृत्ती - १९९८ च्या निर्बंधांच्या युगाचे पुनरागमन आहे का ?**

१९९८ मध्ये, भारताने पोखरण -२ अणुचाचण्या केल्या, ही घटना भारताच्या अणुचाचण्यांनंतर अमेरिकेने लादलेल्या निर्बंधांशी संबंधित आहे. ही भारताच्या धोरणात्मक स्वातंत्र्याची घोषणा होती, परंतु पाश्चात्य देशांनी, विशेषतः अमेरिकेने, ते त्यांच्या जागतिक धोरणाच्या विरुद्ध मानले आणि भारतावर कठोर आर्थिक, संरक्षण आणि तांत्रिक निर्बंध लादले. भारताला लष्करी सहकार्य, अंतराळ तंत्रज्ञान, उच्च-तंत्रज्ञान उपकरणे आणि अगदी परदेशी मदतीपासून बंदी घालण्यात आली. त्यावेळीही अमेरिकेने भारतावर एकतर्फी आर्थिक आणि लष्करी निर्बंध लादले होते, परंतु त्याचा परिणाम असा झाला की भारताने स्वावलंबनाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले. त्या काळात आयटी क्रांती, संरक्षण संशोधनातील नवोपक्रम आणि धोरणात्मक स्वावलंबनाचा पाया घातला गेला. ट्रम्प यांनी जाहीर केलेला हा नवीन टॅरिफ आणि पेनल्टी कर हा '१९९८ सारखाच संधी देणारा एक नवीन क्षण आहे. हा असा क्षण असू शकतो जिथे भारताला स्वतःचा आर्थिक, तांत्रिक आणि धोरणात्मक मार्ग स्वतः च्या शर्तीनुसार पार पाडण्याची जणू सुवर्ण संधीच!

**संकटात स्वावलंबनाचा जन्म :** जेव्हा अमेरिकेने Cray XMP सुपर कॉम्प्युटर देण्यास नकार दिला, तेव्हा भारताने स्वतःचा सुपर कॉम्प्युटर विकसित करण्याची योजना आखली. अशा प्रकारे त्याचा जन्म झाला. सी-डॅक (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कम्प्युटिंग) पहिला स्वदेशी सुपर कॉम्प्युटर झठच् ८००० विकसित केला. आणि १ GFLOPS (Gigaflops) चा वेग मिळवणारा तो आशियातील पहिला सुपर कॉम्प्युटर बनला. ही केवळ तंत्रज्ञानात स्वावलंबनाची सुरुवात नव्हती तर लोकांमध्ये भारत हे करू शकतो असा विश्वास निर्माण झाला .

**निर्बंधांमुळे भारताला संरक्षण आणि विज्ञानात स्वावलंबत्व गाठता आले:**

तेजस लढाऊ विमान, ब्रह्मोस क्षेपणास्त्र आणि अर्जुन टँकसारखे प्रकल्प वेगाने पुढे सरकले ज्यामुळे भारतीय सैन्य मजबूत झाले. इस्रो PSLV सारख्या प्रक्षेपण वाहनांमध्ये स्वावलंबीता मिळवली आणि चांद्रयान सारख्या मोहिमांचा पाया रचला. एचएएल, बीईएल अशा संस्थांनी देशांतर्गत संरक्षण उत्पादनाला चालना दिली.

**औषध आणि आयटी क्रांतीची सुरुवात :** पाश्चात्य औषध कंपन्यांकडून पुरवठा कपातीच्या भीतीमुळे, भारत सामान्य औषध निर्मिती वाढलेली गुंतवणूक. परिणामी, आज भारत जगातील फार्मसी हब आहे. जगातील ६०% लसी भारतात बनवल्या जातात. त्याच वेळी, भारताच्या सॉफ्टवेअर निर्यात क्षमता वेगाने वाढल्या. इन्फोसिस, विप्रो, टीसीएस अशा कंपन्यांनी जागतिक बाजारपेठेत आपले स्थान निर्माण केले. अमेरिकेने तंत्रज्ञान निर्बंध लादले असूनही, भारतीय कंपन्या सिलिकॉन व्हॅलीचा कणा बनल्या.

**लोकांच्या मनात आत्मविश्वास :** १९९८ च्या निर्बंधांमुळे भारतीयांच्या मनात पर्याय शोधण्याची आणि स्वीकारण्याची मानसिकता निर्माण झाली. महाविद्यालयांमधील संशोधनाला चालना मिळाली, आयआयटी आणि आयआयएससी सारख्या संस्था नवोपक्रमाची केंद्रे बनल्या. लोकांना जाणवले की क्षमतेवर विश्वास ठेवा,कृपेवर नाही . २०२५ मध्ये पुन्हा एकदा अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते का? आता ट्रम्प प्रशासन भारतावर २५% कर आणि रशियन व्यापारावर दंडात्मक कर लादण्याबद्दल बोलत आहे, ते १९९८ च्या आर्थिक अलिप्तता (Economic Isolation) चे प्रतिनिधित्व करते. फरक एवढाच आहे की आज भारत अधिक सक्षम, समर्थ आणि स्वावलंबी आहे.

**एक तुलनात्मक दृष्टिकोन :**

इतिहासाची उजळणी - १९९८ विरुद्ध २०२५ पैलू १९९८ २०२५ कारण पोखरण अणुचाचणी भारत-रशिया व्यापार, जागतिक दक्षिण उदय आणि अमेरिकेचे धोरणात्मक लक्ष स्वातंत्र्यामुळे निर्माण होणारे असंतुलन अमेरिकन प्रतिसाद लष्करी आणि आर्थिक निर्बंध; तांत्रिक आणि संरक्षण सहकार्य थांबले. व्यापार तूट उद्धृत करून २५% आयात शुल्क + दंडात्मक कर भारताची आर्थिक स्थिती ४२० अब्ज जीडीपी; मर्यादित परदेशी गुंतवणूक; संशोधन सुरुवातीच्या टप्प्यात मध्ये ४.१९ ट्रिलियन जीडीपी; जगातील चौथ्या क्रमांकाची, स्वावलंबी भारत मोहीम प्रगतीपथावर आहे.

जागतिक आघाडी मर्यादित; Non-ligned Movement पुरते मर्यादित BRICS+, Global South, I2U2, QUD, SCO, Indo-Pacific नेटवर्क प्रतिसाद डीआरडीओ, इस्रो, एचएएल सारख्या संस्थांचा विकास; देशांतर्गत उद्योग प्रोत्साहन DPI, ONDC, RuPay, UPI सारखे प्लेटफॉर्म, FT पर्यायांचा शोध; निर्यातीत विविधता; एमएसएमई समर्थन निर्यात कर परिणाम औषधे, कापूस कापड, चहा आणि कृषी उत्पादनांवर अवलंबित्व अभियांत्रिकी वस्तू, औषधे, रत्ने आणि दागिने, आयटी सेवा, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राची भूमिका सरकारच्या नेतृत्वाखालील प्रयत्न; खाजगी गुंतवणूक मर्यादित धोरण + नवोन्मेष; अनेक खाजगी उद्योग आणि स्टार्टअप्स स्वावलंबनात भागीदार आहेत तांत्रिक आणि वैज्ञानिक प्रतिसाद वैज्ञानिक स्वदेशीकरणाचा पाया घातला गेला सेमीकंडक्टर मिशन, डिजिटल इंडिया, क्वांटम आणि एआय मध्ये भारताची वाढ स्वतंत्र रणनीती विकसित निकाल २००० च्या दशकात आयटी आणि अवकाश क्षेत्राचा उदय; संतुलित परराष्ट्र धोरण स्वावलंबनाच्या पुढील टप्प्यात प्रवेश; भारत एक जागतिक पर्याय बनत आहे पुरवठा केंद्र म्हणून उदयास येत आहे.

दीर्घकालीन दिशा सुरक्षा-आधारित तांत्रिक विकास आर्थिक-तांत्रिक सार्वभौमत्व, ज्ञानाधारित निर्यात जागतिक भागीदारीत नेतृत्व व पुनर्रचना प्रमुख आर्थिक क्षेत्रांमध्ये भारताची रणनीती आणि संभावना २५% कर हा एक गंभीर आर्थिक आव्हान म्हणून उदयास आला आहे. जर हा प्रस्ताव लागू झाला तर त्याचा भारताच्या निर्यात उद्योगांवर विशेषतः कापड, आयटी हार्डवेअर, औषधनिर्माण आणि ऑटो पार्ट्स यासारख्या क्षेत्रांवर थेट परिणाम होईल. परंतु या संकटात एक अभूतपूर्व संधी लपलेली आहे जी स्वावलंबी भारताची पहाट, तंत्रज्ञान क्षेत्रातील आपले नेतृत्व आणि जागतिक व्यापारातील नवीन धोरणांची सुरुवात करू शकते. निर्बंध आपल्याला तोडत नाहीत, तर ते आपल्याला एक नवीन दिशा देण्याचे काम करतात. ट्रम्पचे शुल्क हे एक महत्त्वाचे वळण ठरू शकतात.

(क्रमशः)

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# 'डिजिटल अरेस्ट' या सायबर गुन्हेगारीतील फसवणुकीपासून सतर्क रहा -पीएसआय चव्हाण

## रोटरीच्या कार्यक्रमात व्यावसायिक आणि नागरिकांनी समजून घेतले सायबर सुरक्षेचे महत्व

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

डिजिटल अरेस्ट नावाने सध्या एक नविन प्रकारची सायबर फसवणूक सुरू आहे. सायबर गुन्हेगारीतील एक नविन पण अतिशय धोकादायक असलेल्या या फसवणुकीला अनेकजण बळी पडतात. मात्र, अनेकजण तक्रारी करत नाहीत. अशा गुन्ह्यात न्याय आणि लुबाडलेली रक्कम परत मिळून देण्यासाठी स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित आहे. नागरिकांनी अशा फसवणुकीपासून स्वतः चा बचाव करण्यासाठी सतर्क राहावे, असे आवाहन सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक योगेश चव्हाण यांनी येथे बोलताना केले.

सध्या डिजिटल अरेस्ट या नव्या सायबर फसवणुकीच्या प्रकारामुळे नागरिकांना गंडा घालण्याचे प्रकार वाढत आहेत. या प्रकाराविषयी जनजागृती करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे शनिवार दि. २ ऑगस्ट रोजी हॉटेल मधुबनच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक योगेश चव्हाण आणि पोलीस अंमलदार संदीप मांटे यांनी व्यापारी, उद्योजक आणि नागरिकांना अत्यंत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. व्यासपीठावर क्लबच्या अध्यक्षा सौ. वर्षा पित्ती, सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत यांची उपस्थिती होती. योगेश चव्हाण म्हणाले की, डिजिटल अरेस्ट प्रकारात सायबर गुन्हेगार स्वत:ला केंद्रीय तपास संस्था, पोलिस अधिकारी, बँकेचे तसेच अन्य अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांना व्हिडीओ कॉल, ई-मेल किंवा फोनद्वारे धमकावतात. तुमचा मनी लॉन्डरिंग, ड्रग्स प्रकरणात सहभाग आहे, तुमच्यावर गंभीर गुन्हा दाखल झाला आहे आणि त्यासाठी तुमचे अरेस्ट ऑर्डर निघाले आहे, अशा प्रकारचे आरोप लावून त्यांच्याकडून बँक तपशील, ओटीपी किंवा ऑनलाईन व्यवहाराद्वारे पैसे उकळण्याचा प्रयत्न केला जातो. काही प्रकारात तुमचं बँक खातं गोठवलं जाणार आहे, अटक वॉरंट निघालंय असं सांगतात. तुम्हाला सतत व्हिडीओ कॉलवर राहण्यास भाग पाडून मानसिक दबाव आणतात आणि भीतीच्या वातावरणात नागरिक पैसे ट्रान्सफर करतात. डिजिटल अरेस्ट हा एक बनावट प्रकार असून, पोलिस किंवा सरकारी संस्था कधीही अशा पद्धतीने अटक करत नाहीत, असे श्री. चव्हाण यांनी स्पष्ट केले.



अनोळखी नंबरवरून येणारे कॉल्स, ईमेल्स, व्हॉट्सऍप मेसेजेस अथवा सोशल मीडियावरून आलेल्या लिंक्सवर कधीही विश्वास ठेवू नये. कोणतीही आर्थिक देव-णघेवाण करण्यापूर्वी त्या व्यक्तीची खात्री करणे अत्यावश्यक आहे. सोशल मीडियावरील व्यवहार करताना 'टू स्टेप व्हेरिफिकेशन' सुरू ठेवावे, जेणेकरून तुमचे अकाउंट सुरक्षित राहील. अनेक वेळा लोक ऑनलाइन व्यवहार करताना रजिस्टर नसलेल्या प्सवर गुंतवणूक करतात, जी पुढे फसवणुकीचे साधन ठरते. क्रिप्टो अथवा इतर फायनान्शियल व्यवहार करताना अधिकृत व सुरक्षित प्लॅटफॉर्म वापरणे आवश्यक आहे. जर सायबर फसवणूक झालीच, तर तातडीने १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधावा किंवा जवळच्या सायबर सेलमध्ये तक्रार द्यावी. बँकेलाही त्वरित माहिती द्यावी, जेणेकरून पुढील नुकसान रोखता येईल, असे श्री. चव्हाण म्हणाले. यावेळी पोलीस अंमलदार संदीप मांटे म्हणाले की, बँकिंग व्यवहारासाठींचे प्स गुगलवरून न घेता प्ले स्टोरवरूनच डाऊनलोड करावेत. शक्यतो बँकेतूनच प्स ची लिंक मिळवावी. आजघडीला ऑनलाइन व्यवहारामुळे बँक आपल्या खिशात आहे. मोबाईलमध्ये महत्वाचे दस्तऐवज जसे यूपीआय पासवर्ड, पॅन व आधार नंबर सेव्ह करून ठेवू नयेत. कदाचित मोबाईल हरवल्यास खाते स्टॉप करण्यास अडचणी येतात आणि आणि गुन्हेगार या मोबाईलमधील माहितीच्या आधारे आपले खाते रिकामे करू शकतात. आज-काल एटीएम मधून कोणीच पैसे काढत नाहीत. किमान दोन-तीन महिन्याला थोडे का होईना काढायला पाहिजे. कारण एटीएम कार्डवर इन्शुरन्स असतो. मात्र वर्षानुवर्ष ते न वापरल्यास इन्शुरन्सचा फायदा मिळत नाही. फ्रॉड कॉलची खात्री झाल्यानंतर तो कट करून टाकावा. त्यावर बोलू नये. या आवाजाचा एआय पद्धतीने वापर करून ब्लॅकमेलिं-गसारखे प्रकार घडू शकतात, असे ते म्हणाले. यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना पोलीस उपनिरीक्षक योगेश चव्हाण आणि संदीप मांटे यांनी खुलासेवार उत्तरे देऊन शंका समाधान केले. प्रास्ताविकात वर्षा पिती म्हणाल्या की, सायबर फसवणुकीविषयी जागरूकता निर्माण करून नागरिकांना या सापळ्यातून वाचवणे हा या कार्यक्रमामागील उद्देश आहे. जनतेने फसवणुकीपासून सावध राहून सजग नागरिक म्हणून जबाबदारी पार पाडावी असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी विविध क्षेत्रातील व्यावसायिक, व्यापारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सायबर सुरक्षेचे महत्व समजून घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प प्रमुख सीए अंबेश बियानी आणि प्रशांत महाजन यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संक्षिप्त

### कलावंताची निवड यादीवर समितीने दिलेली स्थगिती रद्द करा

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

राजर्षी शाहु महाराज वृध्द साहित्यीक कलावंत जिल्हा निवड समितीने सर्व संमतीने जिल्ह्यातील एकुण कलावंताच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन गुणवंत्ते नुसार ३ वर्षापासून मानधनासाठी प्रलंबीत असलेल्या कलावंतांची प्रतिवर्षी १०० या प्रमाणे जिल्ह्यातील ३०० कलावंताची मानधनासाठी निवड केली होती परंतु याच समितीने याच वेळी निवड झालेल्या कलावंत ज्ञानेश्वर देवराव गव्हाणे यांना न्यायालयात पाठवून आर्थीक लाभापोटी व राजकिय दबावाने जिल्हा राजर्षी शाहु महाराज वृध्द साहित्यीक कलावंत निवड समिती जालना यांनी न्यायालयाचे कारण देत कलावंत निवडीवर स्थगिती दिली आहे. दिलेली स्थगिती रद्द करण्यात यावी व कलावंताना न्याय देण्यात यावा या मागणी संदर्भात संबधीतांना निवेदने, प्रत्यक्ष भेटी देऊन विनंती करण्यात आली परंतु त्यावर कसलाही विचार न झाल्याने नाविलाजाने लोकशाही मागांने आम्ही जिल्ह्यातील कलावंत दि.१४. ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या समोर अमरण उपोषणास बसत आहे. यातुन उध्दभवणाऱ्या सर्व परीणामास संबधीत अधिकारी जबाबदार राहतील असे शंकर हिवाळे, अनिल भदर्गे, सुरेश देवडे, यादवराव जगताप, सुनील जाधव, विष्णू शिंदे, आदीच्या निवेदावर सह्या आहेत.

### सुंदर जनार्धनराव कदम यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

श्री योगानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, परतूर येथे कार्यरत असलेल्या आदरणीय सुंदर जनार्धनराव कदम यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन दि. ३१ जुलै २०२५ रोजी विद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडले.

श्री सुंदरराव कदम यांनी २६ ऑगस्ट १९९५ पासून श्री योगानंद माध्यमिक विद्यालयात ग्रंथपाल म्हणून सुरुवात केली. गेली ३० वर्षे, त्यांनी निष्ठेने, प्रेमाने आणि परिश्रमाने कार्य केले. त्यांच्या सेवाकाळात त्यांनी शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात शाळेचा झेंडा उंचावला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य सदैव प्रेरणादायी राहील. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे कार्याध्यक्ष एडवोकेट सी जी पाटील साहेब प्रमुख पाहुणे महेश शिवणकर माजी उपसंचालक तंत्रशिक्षण तसेच छत्रपती संभाजी नगर येथील देवमाळी साहेब यांनी भूषवले. या वेळी विविध मान्यवर उपस्थित होते. यात संस्थेचे संस्थापक मनोहरराव पेडगावकर उपाध्यक्ष एडवोकेट लिंबूळकर साहेब कोषाध्यक्ष सुनीलजी दायमा सहसचिव अशोकराव उबाळे सदस्य परेशभाऊ पाटील, प्रकाशराव दीक्षित, श्री द या काटे प्राचार्य हरिभाऊ मोगल, प्राचार्य अंभुरे सर पर्यवेक्षक वसंत थोरवे व योगानंद शिक्षण प्रसारक मंडळातील सर्व आजी माजी शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी आणि सुंदरराव कदम यांचे आप्तेष्ट नातेवाईक कार्यक्रमास उपस्थित होते. सहकारी शिक्षक श्री मिसाळ सर, सोनूने सर यांनी मनोगते व्यक्त करून आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाच्या शेवटी सुंदरराव कदम यांनी आपल्या भावना व्यक्त करत सर्वांचे आभार मानले.

### पारध उपकेंद्रामध्ये ११४ जणांची आरोग्य तपासणी संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध उपकेंद्रामध्ये भोकरदनचे तालुकां आरोग्य अधिकारी रघुवीर चंदेल यांच्या प्रयत्नातून आरोग्य शिबीर घेण्यात आले. या आरोग्य शिबीरात एकुणं ११४ महिला व पुरुषांची तपासणी करण्यात आली. यामध्ये एक्स रे, रक्तदाब, मधुमेह, व ईतर आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. ही तपासणी जालनां आरोग्य विभागाचे कर्मचारी बाळोद, श्री पवार, रवि पाईकराव, कपिल कोकरे, ज्ञानेश्वर खटाणे, यांनी तपासणी केल हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी सि. एच. ओ. रेशमा चौधरी, आरोग्य सेविका सुवर्णा जाधवं, आरोग्य सेवक विनोद कुलकर्णी, आशा गटप्रवर्तक संगीता देशमुख, संजीवनी भक्कड चांडोळकर, आशासेविका संगिता मुळे, मंदा जगताप, अरुणा ढगे ठाकुर, अनिता गाढे, निर्मला राऊत, ज्योती बोडखे, सरला आल्हाट यांनी परिश्रम घेतले.

# छत्रपती संभाजीनगर-परभणी रेल्वेमार्ग दुहेरीकरणाला मंत्रिमंडळाची मान्यता

## खासदार डॉ.कल्याण काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे मोठे यश

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय आर्थिक व्यवहार समितीने रेल्वे मंत्रालयाच्या चार बहुप्रतीक्षित बहु-मार्गिकरण प्रकल्पांना मंजुरी दिली असून, यामध्ये छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)-परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचा (ॅ्रीलश्रळपस) समावेश करण्यात आला आहे. या १८७.२९ किमी लांबीच्या प्रकल्पासाठी २१७९ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, तो २०२८-२९ पर्यंत पूर्ण होणार आहे.

या ऐतिहासिक निर्णयामुळे मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड या जिल्ह्यांतील रेल्वे संपर्कात आमूलाग्र बदल होणार आहे. हा प्रकल्प खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या दृढ इच्छाशक्ती, लोकहिताशी बांधिलकी आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा ठोस परिणाम आहे. डॉ. काळे यांनी या मार्गाच्या दुहेरीकरणासाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे वेळोवेळी ठोस मांडणी करून केंद्र सरकारच्या धोरणात्मक योजनेत ही मागणी समाविष्ट करून घेतली. देशव्यापी बहु-मार्गिकरण योजनेंतर्गत चार प्रमुख प्रकल्प मंजूर:इटारसी-नागपूर चौथी लाईन, छत्रपती संभाजीनगर-परभणी दुहेरीकरण, आलुबाडी रोड-न्यू जलपाईगुडी तिसरी व चौथी लाईन, डांगोअपोसी-जारोली तिसरी व चौथी लाईन या चार प्रकल्पांमुळे १३ जिल्ह्यांतील रेल्वे नेटवर्क सुमारे ५७४ किमीने वाढणार आहे. यामुळे २,३०९ गावांतील सुमारे ४३.६० लाख लोकसंख्येला थेट लाभ मिळणार आहे. या प्रकल्पाचे फायदे हे कोळसा, सिमेंट, कृषी उत्पादन, कंटेनर, पेट्रोलियम यांसारख्या मालाच्या वाहतुकीत क्रांती, ९५.९१ दशलक्ष टन दरवर्षी अतिरिक्त मालवाहतूक क्षमता, २२९ लाख मानव-दिवसांचे प्रत्यक्ष रोजगारनिर्माण, तेल आयातीत १६ कोटी लिटर घट, उज× उत्सर्जनात ५१५ कोटी किलो घट, २० कोटी



वृक्षारोपणाच्या परिणामाइतकी हरित ऊर्जा व पर्यावरण लाभ, ₹१ 'गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन'चा भाग, हे सर्व प्रकल्प PM² GatiShakti National Master Plan अंतर्गत राबवले जात असून, देशातील मल्टिमोडल कनेक्टिव्हिटी व लॉजिस्टिक कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ करणारे आहेत.

डॉ. कल्याण काळे यांनी खासदार म्हणून निवडून आल्यानंतर सातत्याने छत्रपती संभाजीनगर-परभणी मार्गाच्या दुहेरीकरणासाठी पाठपुरावा केला. त्यांनी संसदेत आणि मंत्रालयात ही गरज ठामपणे मांडून रेल्वे मंत्रालयाच्या धोरणनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावली. आज या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचे फलित जनतेला दिसून येत आहे. हा निर्णय म्हणजे मराठवाड्याच्या दृष्टीने मैलाचा दगड असून, या भागातील सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासाला नवी दिशा देणारा ठरेल. खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या नेतृत्वातील लोकाभिमुख विकासाचा हा ठोस पुरावा आहे!

# पायदळ दिंडी आज पोहचणार संतनगरीत



**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

हातात टाळ वीणा, डोक्यावर तुळशी वृंदावन, मुखी गण गण गणात बोतेचा गजर करीत पावसाची नतमा बाळगता दरकोस दर मुक्काम करीत ३१ जुलै रोजी जाफ्राबाद तालुक्यातील बोरगाव बु येथुन पायदळ दिंडीने रायपुर ता.जि.बुलढाणा मार्गे विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत नगरी शेगावकडे प्रस्थान केले होते.

बोरगाव बु येथुन गजानन महाराजांचा जयघोष करीत वारकऱ्यांच्या सानीध्यात निघालेली संत गजानन महाराज यांची बोरगाव बु ते श्रीक्षेत्र शेगाव पायदळ दिंडीचे श्रावण महिन्यामध्ये दरवर्षी आयोजन करण्यात येते.पायी दिंडीची १२ वर्षापासुनची परंपरा कायम ठेवत३१ जुलै रोजी बोरगाव बुयेथून दिंडी प्रस्थान झाली आहे.या दिंडीचे रायपुर,वरवंड, रोहना,अन्नकुटी (खामगाव) येथे मुक्कामाची व्यवस्था केली असून दिंडीचा शेवटचा मुक्काम हा शेगांव येथे होणार आहे.दिंडीतींल भाविक भक्तांसाठी जागोजागी चहा, नाष्टा, जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

३१ जुलै रोजी निघालेल्या दिंडीचे ठिकठिकाणी वाटेत पालखीचे जल्लोषात स्वागत करण्यात येत असून भाविक भक्तांनी मनोभावे दर्शन घेतले आहे. अन्नकुटी (खामगाव जि. बुलडाणा) येथील मुक्काम आटोपूनआज ४ ऑगस्ट रोजी श्री संत गजानन महाराजांचा जयघोष करीत संत नगरी शेगाव येथे दिंडी दाखल होईल.

# जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकीत विरोधकांना जागा दाखवणार -विनोद घोसाळकर



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

हिंदुऱ्हदय सम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारतील लढाया शिवसैनिक पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्यावर विश्वास ठेवून येत्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकी मध्ये विरोधकांना त्यांची जागा दाखवणार असल्याचे मत मा.आ.शिवसेना (उबाठा) संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर यांनी कोकरसा ता.मंठा येथील आयोजित मेळाव्याप्रसंगी केले.या मेळाव्यास शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले,जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर माजी आ.संतोष सांबरे,जिल्हाप्रमुख महेश नळगे,उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम,तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे,युवासेना जिल्हाप्रमुख गणेशराव काळे, उपजिल्हाप्रमुख अशोकराव आघाव,विजयराव जाधव, तालुका संघटक ज्ञानेश्वर सरकटे,तालुकाप्रमुख युवा सेना डिगांबर बोराडे,उप तालुकाप्रमुख संजय नागरे,उप तालुकाप्रमुख देविदास खरात,युवासेना उपजिल्हाप्रमुख संदीप सरकटे,युवासेना तालुकाप्रमुख गोरख चव्हाण,अनंतराव वैद्य,आसाराम बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री घोसाळकर म्हणाले की,स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये शिवसेना पक्षाची स्थापना करून शिवसेना पक्षाचे विचार महाराष्ट्रभर रुजवले. त्यांच्या पावलावर पाऊल देत आज पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांनी परत पक्ष वाढीसाठी जोमाने प्रयत्न सुरू केले असून युवा नेते आदित्य ठाकरे यांच्या सहकार्यातून युवकांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका लढवण्याची संधी उपलब्ध झाली आहे.असे सांगून त्यांनी श्री बजरंग बली यांच्या गीतातील एक ओवी म्हणून दाखवली आले किती गेले किती संपले भरया.तरी तुझ्या नामाचा अजुनी दरारा या प्रमाणे पक्षातून कितीही गद्दार गेले असले तरी स्व.बाळासाहेबांचे विचार आजही संपलेली नाहीत त्यामुळे शिवसेना पक्ष कधीही संपू शकत नाही. याची जाणीव विरोधकांना येत्या निवडणुकांमधून दाखवून देण्याची वेळ आलेली आहे.त्यासाठी शिवसैनिकांनी एकत्रित येऊन जोमाने कामाला लागावे असे सांगितले.या वेळी शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले, मा.आ. संतोष सांबरे यांनी उपस्थित शिवसैनिकांना यथोचित मार्गदर्शन केले.

# परतूरचे अर्जुन पाडेवार यांच्या सामाजिक कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल!

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

येथील सामाजिक कार्यकर्ते अर्जुन दादाराव पाडेवार यांचे सामाजिक कार्य आता सातासमुद्रापार पोहोचले असून श्रीलंकेतील बौद्ध भिक्खहू संघाने पाडेवार यांच्याप्रति मंगल कामना व्यक्त केल्याचा संदेश नुकताच प्रसारित केला आहे.



जालना जिल्ह्यातील परतुर शहरातील सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांच्या सामाजिक कार्याची दखल पुज्यनिय भिक्खु संघाने थेट श्रीलंका देशातुन घेत त्यांच्या साठी मंगलकामना केली,पूज्यनीय भिक्खू निर्वाण थेरो,भदंत शिकबोधी थेरो व पुज्यनिय भिक्खुसंघाने थेट श्रीलंका अनुराधापुर येथुन पांडेवार यांना आशीर्वाद दिले, संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुध्द यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पावनभुमीत पाडेवार यांच्या सामाजिक कार्यप्रती मंगलकामना केली.आयुष्यातील गोर गरीब दलित पिडीत वंचित बहुजन कष्टकरी कामगारांच्या न्याय हक्कांसाठी पुकारलेल्या लढ्याच्या अनुषंगाने समस्त पूज्यनीय भिक्खु संघाच्या वतीने थेट तथागत भगवान गौतम बुध्दांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पावनभुमी जिथे सम्यक संबुद्धाला बोधित्व प्राप्त झाले अशा परम पूज्यनीय स्पुर्ती स्थळाहुन पाडेवार यांच्या कार्यासाठी मंगलकामना करून अमूल्य आशीर्वाद दिले. आयुष्यात पुकारलेल्या गोर गरीब दलित वंचित पिडीत कष्टकरी बहुजन कामगार समाज बांधवांच्या न्याय हक्कासाठीच्या पाडेवार हे तत्परतेने पुढाकार घेतात म्हणून त्यांना सुख शांती ऊर्जा प्राप्त होवो म्हणून आशा प्रकारे मंगल मैत्री त्यांच्या कार्यापरीत भिक्खु यांच्या वतीने चिवरदान करून अष्टपुरस्कार दान करून दिपाणे,धुपाने आशिर्वाद दिला, परतूर शहर परिसरात अर्जुन पाडेवार यांचे सामाजिक कार्य सर्वश्रुत आहे. तहसील कार्यालयासह, पंचायत समिती, नगर परिषद, सरकारी दवाखाना, पोलीस स्टेशन,वीज वितरण कंपनी, विविध बँका यासह इतरही अनेक कार्यालये, शासकीय, निमशासकीय कार्यालयाशी निगडित जनतेची कामे ते प्राधान्याने करतात. पाडेवार यांनी सभागृहात एका विशेष शिबिराचे आयोजन करत एकाच दिवशी ३५० सुकन्या समृद्धी योजनेची खाती उघडली.अनेकवेळा रोगनिदान शिबीरे घेतली.

शहरात निर्माण झालेल्या नागरी समस्यांसाठी लोक पाडेवार यांनाच प्राधान्य देत समस्या सांगतात. आणि त्यांची समस्या सुटते असा नागरिकांचा अनुभव आहे. आतापर्यंत पाडेवार यांनी रस्त्यावरील खड्डे, तुंबलेल्या नाल्या, फुटलेले ढापे, बंद पथदिवे, अनियमित पाणीपुरवठा ही व अशी कितीतरी कामे मार्गी. लावली आहेत.

# महावीर स्वामी निर्वाणोत्सव निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

प्रभू महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाणोत्सव वर्ष उजवनीनिमित्त महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, श्री भगवान महावीर स्वामी निर्वाण महोत्सव समितीच्यावतीने भगवान महावीर यांच्या जीवन चरित्रावर शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित निबंध स्पर्धेचा जिल्हास्तरीय पारितोषिक प्रदान सोहळा नुकताच पार पडला. गटनिहाय दहा विजेत्यांना पारितोषिकाचे धनादेश प्रदान करण्यात आले.



जिल्हाधिकारी कार्यालयात हा सो-हळा पार पडला. याप्रसंगी महाराष्ट्र जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ना. ललित गांधी, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू, उद्योजक घनश्याम गोयल, ऋषिकेश कोंडकर, भगवान महावीर स्वामी निर्वाण कल्याणक महोत्सव शासकीय जिल्हास्तरीय समितीचे सुदेश सकलेचा, वीरेंद्र रुणवाल, प्रमोद देसरडा, संजय लव्हाडे, ड. अनिल संचेती, चेतन देसरडा, अशोक संचेती यांच्या हस्ते निबंध स्पर्धेचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. या स्पर्धेसाठी राज्यस्तरावर २५ लाख ५० हजाराचे पारितोषिक ठेवण्यात आले होते. ३६ जिल्ह्यातील सरकारी, निमसरकारी आणि खाजगी शाळांमधील इयत्ता पाचवी ते दहा-वीच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग नोंदविला. जालना जिल्ह्यातूनही विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. जालना जिल्हास्तरावर दहा पारितोषिके प्रदान करण्यात आली. त्यात पाचवी ते सातवीच्या गटात प्रथम ५५५५ रुपयाचे प्रथम पारितोषिक श्रावणी बळीराम मोरे, द्वितीय ३३३३ रुपयाचे पारितोषिक जय शेषराव जोगदंड, तृतीय २२२२ रुपयाचे पारितोषिक ज्ञानेश्वरी विनायक कढ़बाने, चतुर्थ ११११ रुपयाचे पारितोषिक धनश्री विशाल अकोले तर पाचवे ५५१ रुपयाचे पारितोषिक वैभवी विशाल मिसाळ हिने पटकावले. इयत्ता आठवी ते दहावीच्या गटात प्रथम ५५५५ रुपयाचे प्रथम पारितोषिक आंचल शिवलाल लोखंडे, द्वितीय ३३३३ रुपयाचे पारितोषिक आरूषि अर्जुन पिसोरे, तृतीय २२२२ रुपयाचे पारितोषिक सम्यक विलास हिवाळे, चतुर्थ ११११ रुपयाचे पारितोषिक खुशी विलास तळेकर तर पाचवे ५५१ रुपयाचे पारितोषिक गार्गी ज्ञानेश्वर कोरवी हिने पटकावले. या सर्वांना मान्यवरांच्या हस्ते धनादेश प्रदान करण्यात आले. पारितोषिक प्रदान सोहळ्याला कचरूलाल कुंकुळोळ, चेतन बोथरा, विकास जैन, मनोज मुथा, परेश धोका, महेंद्र बोरुंदिया, दीपक मोदी, सचिन पालवे, ड निखिल जैन, श्रीपाल मरलेचा, कन्हैयालाल पाटणी, निलेश पाटणी, पंकज कासलीवाल, किशोर कासलीवाल, प्रशांत दगडा, स्वप्निल लव्हाडे, तनिश सेठिया, विशाल कास-लीवाल, रविंद्र जैन, दिलीप बाकलीवाल, नरेंद्र जोगड़, शांतीलाल वानगोता, पालक, शिक्षक, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीरेंद्र रूणवाल यांनी केले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक मोहीम; ५५७ आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने जिल्ह्यात १ एप्रिल ते ३१ जुलै या कालावधीत धडक मोहीम राबवून अवैध दारू, हातभट्टी निर्मिती अड्ड्यांवर छापे टाकण्यात आले. ५५० आरोपींवर गुन्हे दाखल करून ५५७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. चार महिन्यांत ५१ लाख २० हजार ७६९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांच्या आदेशानुसार व नांदेड विभागाचे विभागीय उपायुक्त डी. एच. तडवी यांच्या निर्देशानुसार लातूर येथील अधीक्षक केशव राऊत, उपाधीक्षक एम. जी. मुडपे यांच्या मार्गदर्शनाखाली धडक मोहीम राबविण्यात आली.

चार महिन्यांच्या काळात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकांनी ४६०३ लिटर हातभट्टी दारु, १८६० लिटर रसायन, १८३६ लिटर देशी दारू, १३४० लिटर ताडी, ११६ लिटर बिअर, ४५० लिटर विदेशी व ७३६ लिटर विदेशी दारू जप्त केली. निलंगा विभागातर्फे शाहूराज विश्वंभर वैराळे (रा. मदनसुरी, ता. निलंगा) या सराईत गुन्हेगारावर एनपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली. त्याला जिल्हा कारागृहात स्थानबध्द करण्याबाबतचे आदेश एमपीडीए प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. त्याची अकरा महिन्यांसाठी कारागृहात रवानगी करण्यात आली. ही कारवाई अधीक्षक राऊत, उपाधीक्षक मुडपे, निरीक्षक आर. एस. कोतवाल, व्ही. ओ. मनाळे, आर. व्ही. कडवे, यू. व्ही. मिसाळ, दुय्यम निरीक्षक स्वप्नील काळे, आर. डी. भोसले, एन. टी. रोटे, एस. आर. राठोड, जी. व्ही. साळवे, बी. एल. येळे, एस. बी. घुले, डी. डी. साळवी, सहायक दुय्यम निरीक्षक गणेश गोळे आदींनी केली.



### संक्षिप्त वृत्त...

## ना.महाजन यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -**
मराठवाड्यासाठी भव्य अशा विभागीय स्टेडीयमला मान्यता पूर्वीच मिळाली असून या कामाची टेंडर प्रक्रीयाही पूर्ण झाली असून सदरील विभागीय स्टेडीयम कव्हा येथेच करण्याचा व ३१ मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर यांनी दिल्यामुळे शासनाने पहिल्या टप्प्यात २५ कोटीचा निधी दिलेला आहे.

विभागीय स्टेडीयमचे काम १२० कोटीपेक्षा अधिक रूपयाचे २६ एकर जमिनीमध्ये होणार आहे. याबरोबर एनआरएचएम अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र कव्हा येथे करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांनी विशेष बाब म्हणून मान्यता देण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस केली होती. त्याप्रमाणे जे.पी.नड्डाजी यांनी त्यास साडेआठ कोटीची मान्यता दिली असून अतिभव्य असे हॉस्पिटल व मेडिकल ऑफीसरसह १५ कर्मचाऱ्यांचा स्टाफ, मेडिकल ॲम्बूलंन्स व वैद्यकीय साहित्य मंजूर करून कार्यान्वित केले आहे. अशा स्मार्ट व्हिलेज कव्हा येथील विविध विकास कामांचा शुभारंभ ०८ ऑगस्ट २०२५ रोजी वार शुक्रवारी सकाळी १०.०० वा. स्वामी दयानंद विद्यालय, राजीव नगर, कव्हा ता.जि.लातूर येथे राज्याचे जलसंपदा मंत्री मा.ना.गिरीष महाजन व राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री मा.ना.प्रकाश आबीटकर यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री ना.शिवेंद्रसिंहराजे भोसले हे उपस्थित राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे कृषी मंत्री ना.दत्तात्रय भरणे मामा,सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील, माजी मंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर, माजी मंत्री आ.अमित देशमुख, माजी मंत्री आ.संजय बनसोडे, खा.डॉ. शिवाजीराव काळगे, खा.ओमराजे निंबाळकर, आ.अभिमन्यू पवार, आ.रमेशअप्पा कराड, मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश चव्हाण, आ.विक्रम काळे, माजी मंत्री तथा भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर, संजय कौडगे, प्रतिभाताई पाटील कव्हेकर, अजित पाटील कव्हेकर, भाजपा नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## अभियांत्रिकीला पहिल्या वर्षी पहिल्याच फेरीत ४८ प्रवेश प्रवेशाची पहिली फेरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -**
येथील पुरणमल लाहोटी शासकीय अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्थेत पहिल्या फेरीत तीन विद्याशाखेत ४८ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले, अशी माहिती संस्थेचे प्राचार्य डॉ. संतोष कुलकर्णी यांनी दिली.

पुरणमल लाहोटी शासकीय अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्थेत यावर्षी प्रथमच पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश होत आहेत. अभियांत्रिकीच्या तीन विद्याशाखांमध्ये २०७ प्रवेश केले जाणार असून, सुमारे १९० विद्यार्थ्यांनी लातूरच्या अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास पसंती दिल्याचे सांगण्यात आले. प्रवेशाच्या आणखी चार फेऱ्या होण्याची शक्यता असून, शुक्रवारी पहिला प्रवेश प्रिया सूर्यवंशी या विद्यार्थिनीचा झाला. संस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले. अभियांत्रिकी महाविद्यालयाचा सर्व कारभार पॉलिटेक्नीक अंतर्गतच पाहिला जात असून, यावर्षीपासून आणखी एका शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची लातूर शहरात भर पडली. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे पहिले वर्ष असले तरी विद्यार्थ्यांची पसंती मिळत असल्याने जसे अभ्यासक्रम वाढतील, तसे प्रवेश वाढणार आहेत.

## लम्पीग्रस्त पशुंना पोषणयुक्त आहार द्या : डॉ. भिकाणे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -**
लम्पीने त्रस्त असलेल्या गोवंशास मऊ हिरवा एकदल, द्विदल चारा द्यावा. चारा प्रथिनेयुक्त, स्वच्छ चारा देऊन तो सडलेला नसावा याची काळजी घ्यावी. गरज पडल्यास हाताने चारा खाऊ घालावा.

कारण गाठी व वेदनेने जनावरे स्वतः खाणे टाळतात, अशी माहिती डॉ. अनिल भिकाणे यांनी दिली. लम्पी चर्मरोग प्रतिबंध व उपचार विषयक जिल्हास्तरीय ऑनलाईन मार्गदर्शन सत्रात ते बोलत होते. डॉ. भिकाणे नागपूरच्या महाराष्ट्र पशुवैद्यक व पशुविज्ञान विद्यापीठात कार्यरत आहेत. मार्गदर्शन सत्रास लातूर जिल्ह्यातील सर्व १३२ पशुवैद्यकीय संस्थांचे प्रमुख, सहाय्यक आयुक्त, पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, प्रादेशिक सहआयुक्त डॉ. नाना सोनवणे, जिल्हा उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे उपस्थित होते. डॉ. भिकाणे पुढे म्हणाले.

## जीवनाच्या परीक्षेत यशस्वी होऊन कुटुंबाचा आधार बना : आमदार काळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -**
केवळ डिग्री मिळवणे पुरेसे नाही, तर जीवनातील आव्हानांना यशस्वीपणे तोंड देऊन कुटुंबासाठी आधारस्तंभ बनणे अधिक महत्त्वाचे आहे. कोरोना काळात परिचारिकांची खरी गरज कळली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजुरांच्या लेकरांना रोजगार मिळावा, म्हणून पाच वर्षांपूर्वी जिजामाता नर्सिंग स्कूलची स्थापना करण्यात आली आहे. या स्कूलमध्ये शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांनी केवळ डिग्री घेऊ नये तर आयुष्याच्या परीक्षेत यशस्वी होऊन आई-वडिलांची सेवा करावी, असे आवाहन आमदार विक्रम काळे यांनी केले.

एमआयडीसी भागातील जिजामाता नर्सिंग स्कूलमध्ये 'एएनएम' आणि 'जीएनएम'च्या विद्यार्थ्यांचा शनिवारी प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला, त्यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, गायत्री हॉस्पिटलचे संचालक डॉ. रमेश भराटे उपस्थित होते. यावेळी नुसरत कादरी, प्रा. डॉ. संतोष जोहरी, प्राचार्य देविदास कोल्हे, अधीक्षक भाऊसाहेब लाकाळ, प्राचार्या पूजा मोरे, प्रा. दत्ता मुंडे, प्रा. बाबासाहेब सोनवणे यांची उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य केंद्रे म्हणाले, डॉक्टरांनी उपचार देऊन झाल्यानंतर रुग्णांची संपूर्ण सुश्रुषा करण्याचे महत्त्वाचे काम परिचारिका करतात. डॉक्टरांपेक्षा रुग्ण हा जास्त वेळ परिचारिकाच्या देखभालीखाली असतो. यामध्ये केवळ महिलाच नाही तर पुरुष परिचारकही रुग्णसेवा देतात. कोरोना काळात नातेवाईक आपल्या रुग्णापासून दूर व्हायचे. मात्र, परिचारिकांनी रुग्णाला आईचे प्रेम देत समर्पणाच्या भावनेतून आरोग्यसेवा दिली.

यावेळी डॉ. भराटे म्हणाले, आरोग्यसेवेत परिचारिकांची भूमिका महत्त्वाची आहे. नर्सिंग हे आरोग्यसेवेचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी रुग्णसेवेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्राचार्य कोल्हे



यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जोहरी यांनी केले. यावेळी अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्राचार्या मोरे यांनी केले. आभार सुमित यादव यांनी मानले.

## रेल्वे प्रश्नांवर खा. डॉ. काळगे रेल्वेमंत्र्यांच्या भेटीला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -**
लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात लातूर जिल्ह्यातील रेल्वेचे प्रश्न मांडल्यानंतर खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे. प्रवाशांच्या सोयी-सुविधांसह रेल्वे जाळे वाढविण्याची प्रमुख मागणी आहे.

लातूर येथे उभारण्यात आलेल्या रेल्वे बोगीचे पुढे काय झाले असा प्रश्न संसदेत मांडल्यानंतर रेल्वे प्रवाशांच्या मागण्या घेऊन खा.डॉ. काळगे यांनी रेल्वेमंत्री यांची भेट घेतली. लातूर-मुंबई वंदे मातरम् सेवा सुरु करावी, कुडूवाडी-लातूर रोड दुहेरी मार्गाचे काम लवकर सुरु करावे, हरंगुळ पुणे विशेष गाडी नियमित करुन लातूरपर्यंत मार्गस्थ व्हावी, मुंबई-लातूर, बिदर-लातूर या एक्सप्रेसचे जुने डबे काढून अधिक सुविधा आणि सुरक्षित असलेले डबे द्यावेत, अमरावती-पुणे एक्सप्रेस दररोज व लातुरकरांच्या सोयीस्कर वेळी करावी, येथील पीटलाईनच्या कामाला गती द्यावी, अशा मागण्यांचे निवेदन रेल्वेमंत्र्यांना देण्यात आले आहे. तसेच वरिष्ठ नागरिकांना व पत्रकारांना प्रवासासाठी उपलब्ध असलेली सूट कोविड काळात रद्द केली गेली होती, ती पूर्ववत सुरू करणे व ऑनलाईन बुकिंगसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशा मागण्या आहेत. यावेळी खा. डॉ कल्याण काळे, खा. डॉ भागवत कराड, खा. उज्ज्वल निकम आणि खा. बळवंत वानखेडे हे उपस्थित होते.

## शिक्षणानेच देश विकसित राष्ट्र बनेल

### सहाय्यक पोलीस निरीक्षक जरीना बागवान यांचे मत



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -**
शिक्षण हे जीवनातील मौल्यवान आणि शक्तिशाली साधन आहे. शिक्षणामुळेच देशाला विकसित राष्ट्र बनवता येईल, असे प्रतिपादन सहायक पोलीस निरीक्षक जरीना बागवान यांनी केले.

येथील रुकय्या बेगम हायस्कूलमध्ये आयोजित पालक मेळाव्यात त्या बोलत होत्या. मंचावर प्राचार्य याहय्या कसेरी, प्रा. महेफुस, नाजेमा शेख, जुनैदी, आसिफ बागवान, प्राथमिकचे मुख्याध्यापक युसूफ यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जरीना बागवान म्हणाल्या, शिक्षणामुळे जीवनात ज्ञान, प्रगती आणि समृध्दी येते. शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्व घडते, विचारशक्ती विकसित होते. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर अनुभवातून मिळणारे जीवनाचे खरे आकलनही आहे. शिक्षणामुळे माणूस चांगल्या-वाईटाचा विचार करू शकतो, निर्णयक्षमता वाढते, आत्मविश्वास निर्माण होतो. अशिक्षित माणूस अंधश्रध्दा, अज्ञान आणि दारिद्र्यात अडकलेला असतो, तर सुशिक्षित माणूस विज्ञानवादी, जागरूक आणि प्रगतीशील असतो. शिक्षित लोक समाजात समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा प्रसार करतात. प्रत्येकाने शिक्षणाचे महत्त्व ओळखून समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रबोधन रॅलीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -**
साहित्यारत्न आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती तसेच नारी प्रबोधन मंच व इतर पुरोगामी परिवर्तनवादी संघटनाच्या वतीने सकाळी साडे आठ वाजता लातूर शहरातुन भव्य प्रबोधन रॅली काढण्यात आली.

सदर रॅलीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून प्रारंभ करण्यात आला. या रॅलीमध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा आणि म.फुले, शाहू महाराज, डॉ.आंबेडकर, जयघोष करण्यात आला. रॅलीमध्ये सहभागी झालेल्या महिला पुरूषांच्या हातामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे



फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.परिवर्तनवादी जोशपूर्ण घोषणा कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. महात्मा ज्योतीराव फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून ही रॅली महात्मा गांधी चौक मार्गे गांधीजींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आणि त्यानंतर साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे चौक येथे पोहचली. या ठिकाणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. आले.

सदर रॅलीमध्ये नारी प्रबोधन मंचच्या अध्यक्षा सुमती जगताप, कुसुम मोरे, सुनंदा जगताप, संगीता शहरकर, उषा शिंदे, सुनीता बोरगावकर, बिरादार मॅडम, प्रेमाताई देडे, सतीश मिरखलकर, महादेवी स्वामी, सुपर्ण जगताप, शिवाय राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, जिजाऊ ब्रिगेडच्या माने मॅडम, अंधश्रद्दा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष माधव बावगे, मराठवाडा जनता विकास परिषदेचे शिवाजी नरहरे, विजय चव्हाण, प्रकाश गायधने, प्राचार्य सोमनाथ रोडे, प्राचार्य नागोराव कुंभार, प्राचार्य आर. डी. निटुरकर, प्रा. अनंत लांडगे, प्रा. सुधीर अनवले, सूर्यप्रकाश धूत, शेखर हविले, जयंती समिती अध्यक्ष राजकुमार होळीकर, नरसिंग घोडके आदिंची समावेश होता.

## शक्तिपीठ महामार्गाला विरोध, आम्ही शेतकऱ्यांसोबतः देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -**
शक्तीपीठ महामार्गाला राज्यभरातून विरोध होत असून लातूरमध्येही शेतकऱ्यांनी मोजणीही होऊ दिलेली नाही. शक्तिपीठ महामार्ग संघर्ष समितीने प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते, माजी आमदार धीरज देशमुख यांची भेट घेतली. यावेळी आम्ही शेतकऱ्यांच्या बाजूने ठामपणे उभे आहोत असा विश्वास त्यांनी शेतकऱ्यांना दिला.

बाभळगाव येथील निवासस्थानी शक्तिपीठ महामार्ग संघर्ष समितीने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते धीरज देशमुख यांची भेट घेतली. यावेळी लातूर जिल्ह्यातील शक्तीपीठ महामार्ग बाधित शेतकरी तसेच धाराशिव सोलापूर जालना हिंगोली आदि जिल्ह्यातील शेतकरी उपस्थित होते. शक्तिपीठ महामार्गाला जमीन दिली तर आमचा संसार उघड्यावर येईल, आमच्या येणाऱ्या पिढ्यांचे मोठे नुकसान होईल असे गाऱ्हाणे शेतकऱ्यांनी धीरज देशमुख यांच्याकडे मांडले. शेतकऱ्यांची एकी असल्याने ९५ टक्के मोजणी झालेली नाही. या लढ्याला काँग्रेसने बळ द्यावे असा या समितीचा सूर उमटला. यावेळी धीरज देशमुख यांनी या संघर्षलढ्यात शेतकऱ्यांच्या बाजूने ठामपणे उभे आहोत असे सांगितले.

यावेळी समितीचे समन्वयक गोविंदराव घाटोळ, गणेश घोडके (बार्शी), अभिजीत देशमुख, गजेंद्र येळकर, बालाजी हाकेपाटील, श्रीनिवास शेळके, गोविंद अप्पा मुंडे, विठ्ठल देशमुख, अनिल ब्याळे, सचिन कराड आदी उपस्थित होते.

## आ. रमेश कराड यांच्या नेतृत्वात भाजपात जाहीर प्रवेश




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -**
रेणापूर तालुक्यातील मौजे गरसुळी येथील काँग्रेस पक्षाचे सरपंच यांच्यासह विविध आजी-माजी लोकप्रतिनिधी व इतर अनेक जणांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात रविवारी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत झालेल्या या भाजपा पक्ष प्रवेश सोहळ्यास मंडळ अध्यक्ष शरद दरेकर, बाबासाहेब घुले, अनिल भिसे, श्रीमंत नागरगोजे, दिनकर राठोड, संतोष चव्हाण, धनंजय पवार, नारायण राठोड, उत्तम चव्हाण, रमेश चव्हाण यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत गरसुळी येथील सरपंच अजय राठोड, माजी सरपंच तथा ग्राप सदस्य वाल्मीक घोडके, श्रीहरी बुवनर, संजय राठोड, सोसायटीचे सदस्य लहू घोडके, शेषेराव राठोड, वृषीकेत चव्हाण, भागवत कातळे, उत्तम कांबळे, वैजनाथ घोडके, प्रशांत चव्हाण, रामराव राठोड, नामदेव गुरुजी राठोड, विजय राठोड, लक्ष्मण चव्हाण, राजाभाऊ राठोड, कृष्णा राठोड, अच्युत सरवदे, बालाजी चव्हाण, बाळासाहेब घोडके, हरीपाल घोडके, अंतराम चव्हाण, गोविंद सोमवंशी, नवनाथ वैद्य, बळीराम चव्हाण, मधुकर घोडके यांच्यासह इतर अनेकांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

ज्या विश्वासाने भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला त्या विश्वासाला कदापि तडा जाणार नाही अशी ग्वाही देऊन यावेळी बोलताना आमदार रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशात नरेंद्रजी आणि राज्यात देवेंद्रजी यांच्या नेतृत्वातील शासनाने सर्वसामान्य माणसासाठी विविध योजना सुरू करून त्याचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम केले आहे. लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून लाखो नव्हे तर कोट्यावधीचा निधी उपलब्ध करून विकास कामांना गती दिली असून गरसुळी गावच्या विकासाला निधीची कमतरता पडू देणार नाही असेही त्यांनी बोलून दाखवले.

## लातूर तहसील कार्यालयात महसूल सप्ताहाला उत्साहात प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -**
महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार १ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत साजऱ्या होणाऱ्या महसूल सप्ताहाला लातूर तहसील कार्यालयात मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके आणि उपविभागीय अधिकारी रोहिणी न-हे-विरोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सचिन जाधव यांनी विशेष पाहुणे म्हणून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास तहसीलदार सौदागर तांदळे, उपविभागीय आणि तहसील कार्यालयातील सर्व नायब तहसीलदार, ग्रामविकास अधिकारी, मंडळ अधिकारी, सहायक महसूल अधिकारी, महसूल सहायक, महसूल सेवक आणि कर्मचारी उपस्थित होते. डॉ. सचिन जाधव यांनी तणावमुक्त जीवनासाठी मौलिक मार्गदर्शन केले. यावेळी



महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या गुणवंत आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला.

महसूल सप्ताहात विविध उपक्रमांचे आयोजन महसूल सप्ताहात ०२ ऑगस्ट रोजी पात्र कुटुंबांना अतिक्रमित रहिवासी जागांचे पट्टे वाटप, ०३ ऑगस्ट रोजी पाणंद/शिवरस्त्यांची मोजणी आणि दुतर्फा वृक्षलागवड, ०४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान, ०५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटीद्वारे अनुदान वाटप, ०६ ऑगस्ट रोजी शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त करणे आणि ०७ ऑगस्ट रोजी एम-सँड धोरणाची अंमलबजावणी तसेच सांगता समारंभ होणार आहे.

सर्व नागरिकांनी या उपक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मैत्रीचा फुलोरा

आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

**भल्या पहाटे बेल वाजली. कोण आलंय, असा आकस्मिक विचार करतच नेहाने दार उघडलं. तर, तिच्या पुढ्यात सरप्राइज उभं होतं. आभा त्यांच्या फ्रेंडशिपची २५ वी ॲनिव्हर्सरी साजरी करायला चक्क जॉनसोबत इंग्लंडहून आली होती. नेहाच्या गळ्यात पडून अगदी भावूक होवून ती म्हणाली,‘ तू तेव्हा माझी फ्रेंडशिप स्वीकारून माझ्या जीवनात आनंदाची बाग फुलवलीस गं, बघ तुला एक नवा मित्र भेट देतेय.**



नेहाच्या अजून या नवीन शहरातील फ्लॅटमध्ये हाय-बाय पलीकडे कोणाशी ओळखी पण झाल्या नव्हत्या. म्हणून तिने रविवारी सकाळी लवकर उठून फिरायला जायचं ठरवलं होतं. तसे तिने बाहेर जायला दार उघडले तर समोरच्या फ्लॅटच्या दाराशी एक ४-५ वर्षांची गोड मुलगी आजीच्या मागे उभी दिसली. नेहाने स्मितहास्याने आजी-नातीकडे बघितले. ‘चला तुम्हालाही खाली जायचे आहे ना! सोबतच जाऊ लिफ्टनी’ असे म्हणत आजींनीही मैत्रीचा हात पुढे केला. जुजबी बोलणे सुरू असताना ती गोड चिमुरडी म्हणाली,‘फ्रेंड तू गार्डनमध्ये आजीसारखी दुर्वा तोडणार आहेस का?की माझ्याशी खेळतेस?’ नेहाने एकदम चमकून बघितलं तिच्याकडे! एवढीशी पोर आपल्याला फ्रेंड म्हणतेय, याचं तिला हसूच आलं.’ ओ हो !माय फ्रेंड ! नाव काय ग तुझं?’ नेहाने विचारताच फुटाणा बोलू लागला. ‘आभा’ आबा नाही हं!‘‘हो...हो आभाराणी मी नेहा! आपण आता मैत्रिणी ना! तू मला नेहाच म्हण!’’ मैत्रीचे हे सुमन लाभताच ती फुलपाखरासारखी आनंदित झाली. त्याला कारणही तसेच होते. नेहा राहायला आली त्या फ्लॅटमध्ये तिची मैत्रीण रिया राहत होती. ती फ्लॅट सोडून गेल्याने आणि आभाच्या विंगमध्ये तिच्या बरोबरीचे कोणीच नसल्याने तीही मैत्रीसाठी आसुसलेली होती. थोडावेळ धावाधावी, पकडपकडी खेळून झाल्यावर आभाने नेहाला विचारले, ‘आपण फक्त संडे फ्रेंड्स का गं? तू नोकरी करतेस ना!’ ‘नाही ग बेटा...!’ नेहाने जीभ चावून म्हटले. ‘आपण आता नेहमीसाठीच फ्रेंड. तू येत जा ना संध्याकाळी माझ्याकडे. आपण खेळत जाऊ थोडावेळ.’ तिघीही उत्साह, आनंदाने घरी आल्या. आभा आणि नेहाच्या जीवनात नवीन मैत्री पर्व सुरू झाले होते. मैत्री म्हणजे निर्व्याज प्रेमाचा टपोरा गुलाब! बघताक्षणी नजरेत भरावा आणि प्रसन्नतेचा गंध चोहिकडे पसरावा असा! वाह! और जिने को क्या चाहिए...

एकच जीवलग घनिष्ठ मित्र मैत्रीण असली तरी ते व्हिटॅमिनचे काम करते. नेहा खाली फिरून आल्यापासून एकदम खुशीत होती. आनंदात असली की, ती गाणं गुणगुणत कामे करायची. हे घरातील सर्वांना आता माहिती होते. त्यामुळे, रोहनने आपलं काम साधून घ्यायचं ठरवलं. ‘आई संध्याकाळी मस्तपैकी पिझ्झा नूडल्स करशील का? माझ्या मित्रांना घरी बोलवायचं ठरवलं होतं, काल तुला सांगायचं राहिलं! मैत्रीचा धागा घट्ट व्हायला हवा ना गं आई ! नवीन ठिकाणी म्हणून बोलवतोय.’खरं तर नेहाने इतर कामांसाठी हा रविवार राखून ठेवला होता. पण, लेकाच्या मैत्रीसाठी तिला तिचा वेळ द्यावाच लागणार म्हणून तिने लगेच होकार दिला तसा रोहन खेळायला बाहेर पडला. रोहनच्या मित्रांसाठी त्याने फ्रेंडशिप डे पार्टी अरेंज केलीय, हे नेहाच्या गावीही नव्हतं. तिची सगळी तयारी होत आली तेव्हा बेल वाजली तर आभा आईसह हजर होती. आभाच्या आईला जरा संकोचल्यासारखं वाटत होतं. ती म्हणाली,‘ताई आभा फारच हट्ट करत होती तुम्हाला फ्रेंडशिप बेल्ट बांधायचा म्हणून! घ्याल का बांधून? चालेल ना तुम्हाला.’ मघा आजीसोबत फिरून आल्यापासून तेच ते सुरू आहे तिचं, ती ऐकेचना म्हणून घेऊन आले आता.’ ‘अरे वाह! आज फ्रेंडशिप डे आहे आणि मला एक छोटी मैत्रीण मिळाली,’ असे उत्साहाने म्हणत नेहाने आभाच्या आईच्या मनातील संकोच दूर करत आभाकडून फ्रेंडशिप बेल्ट बांधून घेतला. तेव्हा हिरमुसली कळी एकदम खुलली. दोघींच्याही मनी मैत्रीचा फुलोरा फुलला.

दिवस पुढे जाऊ लागले. आभा आणि नेहा अगदी जीवलग मैत्रिणी झाल्या. मनातील प्रत्येक गोष्ट सांगायला आभासाठी नेहा सेफझोन झाली. इकडे नेहालाही नवीन मैत्रिणी मिळाल्या होत्या. शिवाय, व्हॉट्स ॲप, फेसबुकमुळे जुन्या मित्रमैत्रिणींचा कट्टा बहरला होता. तरीही आभारूपी मैत्रीचे पुष्प वेगळीच टवटवी देत रहायचे. व्हॉट्स ॲपवर मित्रमैत्रिणींशी कितीही बोलणे झाले तरी, प्रत्यक्ष भेट हा जणू परीस स्पर्श असतो, खराखुरा हर्ष देणारा! आता पन्नाशी ओलांडलेल्या नेहाच्या बॅचचे रियुनियन ठरले तेव्हा सारे विशीतले तरुण झाले. मित्र मैत्रिणींच्या घोळक्यात आनंदाचे क्षण वेचिता सारेच उल्हासित झाले. जुन्या मित्रमैत्रिणींना बघताच चेहऱ्यावर हसू फुलतं आणि लगेच ते मनभर पसरतं. मंद मंद दरवळत आठवणींच्या झोक्यावर झुलतं राहतं. असंच काहीसं साऱ्यांचं झालं होतं. मग काय दरवर्षीच कुठेतरी जमेल, त्यांनी भेटून मैत्रीचा फुलोरा फुलवत जीवन प्रमुदित करत जगायचे ठरवले. आजच्या काळात निवृत्ती नंतरच्या जीवनाला रियुनियनरुपी आनंद सोहळ्याने जगण्याची मौज वाढवली आहे. सुसंवादी मैत्रीच्या नात्याने चक्क हृदयरोग होण्याचे प्रमाण घटते, असे डॉक्टर सांगतात. असे एकमेकांना ऐकवत, हास्याचे तुषार उधळले जाऊ लागले. साठीनंतर तर मैत्रीचे पाते अगदी हिरवेगार भासते कारण, तशा कोणाच्याच कोणाकडून काही अपेक्षा नसतात. मैत्रीच्या नात्याला व्याख्येत बसविण्यापेक्षा अनुभूतींचा निरपेक्ष आनंद घेण्यातच खरी तृप्तता आहे. ‘मैत्री लावते दुःखाला कात्री, देते आनंदाची खात्री’ असे म्हणत नेहा आपली जीवन बाग प्रफुल्लीत ठेवण्यात सफल झाली होती.

तिच्या नवऱ्याने म्हणजे नितीनने तिला चिडवायला विचारलेही, ‘उद्या ऑगस्टचा पहिला रविवार पण बाईसाहेबांच्या हातावर यंदा एक फ्रेंडशिप बेल्ट नसणार हे आहे का स्मरणात?’ नेहानेही हसून उत्तर दिलं. प्रत्यक्ष नाही तर आभा मला व्हॉट्सॲपवर नक्कीच पाठवेल. जगाच्या पाठीवर कोठेही असलो तरी आमच्या मैत्रीचा फुलोरा सुकायचा नाही की, हसरे बंध तुटायचे नाहीत. असे म्हणून ती आभाच्या आठवणीत झोपी गेली. भल्या पहाटे बेल वाजली. कोण आलंय, असा आकस्मिक विचार करतच नेहाने दार उघडलं. तर, तिच्या पुढ्यात सरप्राइज उभं होतं. आभा त्यांच्या फ्रेंडशिपची २५ वी ॲनिव्हर्सरी साजरी करायला चक्क जॉनसोबत इंग्लंडहून आली होती. नेहाच्या गळ्यात पडून अगदी भावूक होवून ती म्हणाली,‘ तू तेव्हा माझी फ्रेंडशिप स्वीकारून माझ्या जीवनात आनंदाची बाग फुलवलीस गं, बघ तुला एक नवा मित्र भेट देतेय.’ या मैत्र सोहळ्यात सामील व्हायला आज नितीनराव चहाचा ट्रे घेऊन बाहेर आले आणि ‘तुझ्या या काकाला’ आता या मैत्र समूहात यायला आवडेल बरं!’ असे म्हणत त्यांनी फ्रेंडशिप बेल्ट बांधून घ्यायला हात पुढे केला.

# तिचा प्रवास एकटीचा

मनस्वी

श्रद्धा सुदामे / ८८३०७८४१०३

**भाग : ४**



बघता बघता दिवस, महिने, वर्षे भुर्रकन उडाली. मुलगी पंचवीशीची आणि ती पन्नाशीची झाली. त्या दिवशी सकाळी दोन्ही हातात भाजीच्या पिशव्या घेऊन ती रिक्षातून उतरली. ङ्ककाकू तुम्हाला मदत हवीय का?ङ्ख तिला दमलेली बघून पार्किंगमधील मिता म्हणाली. तिला नको म्हणत, ती लिफ्टमध्ये चढली. आरशात चमकणाऱ्या चंदेरी बटा स्पष्ट दिसत होत्या, विजयी ध्वजासारख्या भुरभुरताना! दीदीची काकू होतानाची ही वर्षे किती पटकन निघून गेली. स्वत:च्या डोळ्यांखालची काळी वर्तुळं पाहून ती फारच उदास झाली होती.

सकाळी डायनिंग टेबलवर गरमागरम नाश्ता वाढत असताना,अगं किती जास्त मीठ झालंय. लक्षच नसतं तिला सांभाळून घेतलं पाहिजे. पुढची ४-५ वर्षे रजोनिवृत्ती होईपर्यंत तिला, तिच्या मनाला जपलं पाहिजे. घरी येताना बाहेरूनच डिनर करून आले सगळे तिला खुश करण्यासाठी! रात्री एसीतही तिला घाम फुटत होता. खिडकीतून तिने बाहेर पाहिलं. छान पाऊस पडत होता...ऋतू बदलला होता. ती मनात म्हणत होती, परमेश्वरा शरीरातलं हे ऋतूचक्र कधी नीट करशील? असं म्हणत तिने पावसाच्या पाण्याने भरलेली आपली ओंजळ रिती केली. मी पण अशीच रिती होत चाललीय. पानगळ होते झाडांची तेव्हा असेच क्लेश होत असणार त्यांना! तसा जीव कासावीस होतोय माझा! शरीर कात टाकतंय जणू आणि शेवटी अनुलोम विलोम, मेडिटेशन करून ती शांत निजली. या अवस्थेत अनियमित पाळी, सोनोग्राफी, कॅल्शियम, हिमोग्लोबीन डेफिशियन्सी,पाल्पीटेशन्स, एस्ट्रोजिन हार्मोन्सची खालावलेली पातळी, ब्रेन फॉग...पुरुषांना काय कळणार स्त्रीची ही मानसिक अवस्था!

आरशासमोर बसून, का बोचतंय प्रतिबिंब आज माझं? तडा नेमका कशास गेलाय? काचेला की माझ्या मनाला? असं हल्ली तुझं या नवऱ्याच्या ओरडण्याने तिच्या डोळ्यांत टचकन पाणी आलं आणि तिचाही तोल सुटला. थोडं कमीजास्त झालं की, तुम्हाला काय होतंय बोलायला? मदत मागावी तर केवढा पसारा करता नेहमी. मला मात्र थकवा आला तर, माझा मूड नाही किंवा मी चिडले तर वेडी झालीयेस, हायपर होतेस असं आणि तुमचा थकवा मात्र मी समजून घ्यायचा. मी करते त्याचं साधं अप्रिसिएशन नाही कुणाला!

खरंतर हल्ली तिला फ्रीज का उघडलं, भाजीखालचा गॅस सुरू आहे की बंद केलाय, मीठ घातलं की नाही असं विसरायला होतं. तारीख, वार लक्षात नाही, मोलकरणीवर ओरडणं, सतत चिडचिड, छातीत धडधड, सतत मूड बदलतात. आई एवढी का जोरजोरात ओरडते आहेस? शांत हो. तुझे ना खूप मूड स्वींग्ज होतायेत हल्ली! डॉक्टर म्हणाले खरंतर तिला नाही, गरज आहे कुटूंबातील सगळ्यांनाच समुपदेशनाची! ती सध्या पेरीमेनिपॉजल फेजमधून जातेय. अतिशय नाजूक मनस्थिती झालीये त्यामुळे! अशावेळेस वाटतं शोधावा असा आरसा जो दाखवेल माझ्या मनाचा तळ! ती उसासा टाकून उठली. मला माझं वय वाढतंय याचं दुःख नाहीच आहे. वयाबरोबर माझं पोक्त, समंजस दिसणं स्वाभाविकच आहे आणि मला उथळ नकोच आहे मी दिसायला! मी स्त्री म्हणून पूर्णत्वास गेलेली पण, आज गेले कित्येक वर्षाच्या सोबतीणीला निरोप देताना मन रुदन करतंय एवढंच! काही झालं तरी शाळकरी वयापासून आजपर्यंत ऋणानुबंध होता आमचा दोघींचा! आज आई रिटायर होत नाहीये तर रिटायर होतंय तिचं स्त्रीपण! स्त्री म्हणजे साडीत गुंडाळलेली फक्त मुलगी, बायको, आई, मामी, आत्या, काकू, वहिनी, घरातील सगळ्यांची केअरटेकर, होममेकर एवढंच? आणि स्त्रीपण? कधी कधी असं वाटतं सेल्फीच्या अँगलसारखा शोधावा स्वतःकडे बघण्याचा अँगल...ज्यामध्ये उजळून येईल स्त्रीच्या अंतर्मनाचं निवृत्त होतानाचं अस्तित्व आणि फोटोफ्रेम करावी निवृत्तीनंतरच्या प्रवासातील टप्प्याटप्प्यावरील नाजूक क्षणांची! अखेर सुरू झाला तिचा निवृत्तीनंतरचा प्रवास...एकटीचा!

# भराडी गौर

अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६





**१४ दिवस अशा अनेक प्रकारच्या गौरी तयार करायच्या. रोज विविध खेळ असायचे मात्र, रोज खिरापत नसायची कारण ती परवडणं त्याकाळी शक्य नव्हतं आणि मनोरंजनाचं साधन इतर कोणतंच नसल्याने गावातल्या अनेक मुली गौर खेळायला यायच्या. अर्थात प्रत्येकजण गौर आणेलच असं नाही मात्र, गाणी गायला आणि माझ्या माहेरच्या मध्यवर्ती भागात असलेल्या वाड्याच्या अंगणात खेळायला सगळ्या यायच्या.**

गौरी माय नमस्कार, भराडी गौरीची गाणी ही भुलाबाईच्या गाण्यांना समांतर अशीच आहेत. पण, भुलाबाईंची काही गाणी ही शंकर-पार्वती विवाह आणि पुढली अशी आहेत. त्यात सासू-सून-छळ हे विषय येतात. पण भराडी गौरीच्या गाण्यासंबंधात एक गोष्ट मात्र लक्षात आली की, त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीचं चित्र या गाण्यांमध्ये उमटत होतं. एक गाणं बघा...

*गुणी गेली खेळायला, माय आली बोलवायला*
*चल वं गुणे जेवायला, तुला आले न्यायला*
*कोण कोण आले? सासू आली*
*काय काय आणले? पाटल्या आणल्या*
*त्यांच्या पाटल्या घेत नाही माय...घेत नाही माय*
*त्यांच्या घरी जात नाही माय...जात नाही माय*
*त्यांचा संसार करत नाही माय...करत नाही माय*

अशाप्रकारे सासरच्या सर्व मंडळींनी वेगवेगळे दागिने आणले, तिला घ्यायला आले, तरीही ही मुलगी सासरी जात नाही. मात्र, शेवटी नवरा आला आणि त्याने साडी चोळी आणली. तेव्हा,

*त्यांची साडी चोळी घेते वं माय, घेते वं माय*
*त्यांच्या घरी जाते वं माय, जाते वं माय*
*त्यांचा संसार करते वं माय, करते वं माय*

अशाप्रकारे मुलगी बोलते. इथे कुठेतरी संयुक्त कुटुंबात सुनेला झालेला किंवा होणारा त्रास-छळ दिसतो. ती विभक्त व्हायचा प्रयत्न करते आहे की काय, हा संशय घ्यायला जागा आहे. म्हणजे नेमकी ही गाणी केव्हा सुरू झाली असावीत? संशोधनाचा विषय आहे खरा ! या सर्व गाण्यांसोबतच कारलीचं बी पेर गं सुनबाई, यादव राया राणी रुसून बसली कैसी, तळ्याच्या पाळीवर पेरला राळा ही गाणीसुद्धा म्हटली जायची. तळ्याच्या पाळीवर पेरला राळा हे गीत तर अगदी मजेदार आहे. अनेकांना हे गीत ठाऊक आहेच. यातला अतिशयोक्ती अलंकार अगदी बघण्यासारखा आहे. त्या राळ्याला एकच कणीस लागलं, कांडून कुंडून त्याचा राळा केला, राळा घेऊन बाजारात गेली, त्याच पैशाची घागर घेतली, घागर घेऊन पाण्याला गेली, मधल्या बोटाला विंचू चावला, पुढे आणा माझ्या सासरचा वैद्य/माहेरचा वैद्य आणि त्याचं वर्णन! अर्थात माहेरचं सगळंच सुंदर! त्यात तो वैद्यही सुंदरच आणि सासरचं सारंच वाईट असतं. पुढे बघा! आता एका कणसाचा राळा तो किती होणार? पण, अशा गीतांचं साम्य किंवा साधर्म्य कुठेतरी ‘मुंगी उडाली आकाशीङ्ख वगैरे अभंगाशी जोडलं जाऊ शकतं.

१४ दिवस अशा अनेक प्रकारच्या गौरी तयार करायच्या. रोज विविध खेळ असायचे मात्र, रोज खिरापत नसायची कारण ती परवडणं त्याकाळी शक्य नव्हतं आणि मनोरंजनाचं साधन इतर कोणतंच नसल्याने गावातल्या अनेक मुली गौर खेळायला यायच्या. अर्थात प्रत्येकजण गौर आणेलच असं नाही मात्र, गाणी गायला आणि माझ्या माहेरच्या मध्यवर्ती भागात असलेल्या वाड्याच्या अंगणात खेळायला सगळ्या यायच्या. यात खापराचा तुकडा घेऊन खेळलेली लंगडी म्हणजेच टिक्कर बिल्ला, चौकोन आखून खेळलेली लंगडी, विषामृत , नदी का पहाड?, काश्मीर हमारा है, आंधळी कोशिंबीर, मामाचे पत्र हे कुठलीही आर्थिक गुंतवणूक नसलेले खेळ मात्र खेळले जायचे. पावसाळा असल्याने कधीतरी या खेळांना खीळ बसायची. मग वाड्यातच गाण्याच्या भेंड्या रंगायच्या. यावेळी अनेक कवितांची, श्लोकांची, मराठी गाण्यांची, भजनांची आणि भावगीतांची उजळणी व्हायची. कधी मुलींचेच दोन गट पाडले जायचे तर, कधी मुलींच्या आईचा वर्ग विरुद्ध मुली असं असायचं. यात माझ्या आईने गायलेली अनेक जुनी गाणी आजही स्मरणात आहेत. विशेषतः ‘तुज स्वप्नी पाहिले रे गोपाळा, गळ्यात माझ्या तूच जिवलगा मंगलमणी बांधले, त्या तिथे पलीकडेङ्ख अशी अनेक गाणी आहेत. शिवाय, तिच्या लहानपणी म्हटलेल्या शाळेतल्या कवितांची उजळणी व्हायची. यातही,

*तडीत कडाडे उपजे काळ्याकभिन्न मेघोदरी,*
*म्हणून का वीज नसे साजिरी ?*
*खारे पाणी क्षुद्र शिंपले जन्माचे साधन,*
*म्हणून का मौक्तिकास मूल्य नसे*

ही माझ्या आईच्या लहानपणीची कविता अजून माझ्या लक्षात आहे. प्रत्येक पाच दिवसांनंतर गौरीची झाल डोक्यावर घेऊन तलावात तिचं विसर्जन व्हायचं. ही झाल आमच्या घरगड्याची बायको डोक्यावर घ्यायची आणि तिच्या मागे आम्ही सगळ्या मुली, बायका गाणी म्हणत, तीच ती गाणी रिपीट करत तलावावर जायचो. गौरीचे विसर्जन व्हायचं पुन्हा येताना वाळू आणली जायची. दुसऱ्या दिवशी पुन्हा त्याच गौरी, पुन्हा तीच गाणी! तलावात गौरीचे विसर्जन झाल्यानंतर किती तरी वेळ ती फुलं तरंगत असायची. ते बघणं म्हणजे सुद्धा आनंद होता. अर्थात, त्यावेळी आनंदाचे क्षण हे कुठल्याही पैशांनी विकत घेतलेले नव्हते पण, अमोल होते. आजही ते आठवणीत आहेत. असाच तेरा दिवसांचा काळ उलटून जायचा. चौदावा दिवस म्हणजे जागरणाचा. जागरणाला काय करायचं याचं प्लॅनिंग उन्हाळ्याच्या सुट्टीतच व्हायचं. एक नाटक तर हवंच तेही घरातल्या घरात! मग शाळेच्या पुस्तकातलेच प्रवेश घेतले जायचे. यात गो.ब.देवल अतिशय आवडीचे! त्यांच्या ‘शारदाङ्ख नाटकातला प्रवेश, ती वल्लरी, शारदा, कोदंड! मग ‘म्हातारा इतुका न अवघे पाऊणशे वयमानङ्ख हे गीत ! त्यावेळी मात्र बाबा पेटी वाजवायचे. संगीताच्या जाणीवेची पायाभरणी तेव्हाच झाली. कितीकच वेळा हे नाटुकलं आम्ही केलंय. जरठविवाहाबद्दलची चीड तेव्हाच निर्माण झाली. नाटकासोबतच काही गाणी/नृत्य व्हायची. आई चिवडा-लाडू वगैरे खाऊ करायची, चहा व्हायचा. रात्री ८ ला सुरू झालेलं जागरण शहाण्यासारखं रात्री अकरा-साडेअकराला संपायचं. मुली आपल्या आईबाबांसोबत घरी जायच्या.

मग उजाडायचा गौरीचा शेवटचा दिवस! अंतिम विसर्जनाचा! साश्रू नयनांनीच सकाळी फुलं तोडली जायची. या दिवशी गौरीचं चित्र पालखीचं असायचं, पालखीत महादेव! सायंकाळी गौरी आल्या, सर्व मुली एकत्र आल्या की, मनसोक्त गाणी व्हायची. यात महत्वाचं गाणं म्हणजे...

*अंगणची कळई, मंडपा गेली फिरून आली*
*माय म्हणे आलीस वं माय, आलीस वं माय*
*बसायला टाकली नागाची फणी, नागाची फणी*
*गळ्यात घातला विश्वाचा हार, विश्वाचा हार*
*गौरी माय नमस्कार...नमस्कार!*

हे गाणं झाली भोवती फिरून, टाळ्या वाजवत पाच वेळा म्हणायचं. नंतर आरती व्हायची यावेळी, पंधरा दिवस न येणाऱ्याही अनेक बायका गौरीच्या दर्शनाला आणि विसर्जनाला यायच्या. आई गोपाल काला करायची. तलावात गौरीचं विसर्जन व्हायचं. गौरीपुढे फुगड्या घातल्या जायच्या. पुन्हा पुन्हा तिला ‘मंडपा गेली फिरून आलीङ्ख म्हणून आमंत्रण दिलं जायचं. आजही वाटतं, पुन्हा लहान व्हावं आणि भराडी गौर खेळावी.

भराडी गौर आणि तिची गाणी हा अभिजात मराठीचा अमूल्य ठेवा आहे. ही गौर गंमत नव्हे तर, एक व्रत होतं. माझ्या लग्नापूर्वी मी आणि माझ्या धाकट्या बहिणीने/सरोजने याचं उद्यापन केलं होतं. आजही ही गाणी लक्षात आहेत. ती मिटून जाण्यापूर्वी त्यांचं जतन व्हावं, एवढीच माफक अपेक्षा!

# मैनावती नानासाहेब पेशवे



शुभांगी गान/८६५७४२४०७१

१८५७ च्या स्वातंत्र्य समराचा, प्रचंड संग्रामाचा काळ! देशभर बंडांचा वणवा पेटला होता. भारतातला असा एकही प्रांत नव्हता जिथे या वणव्याचं लोण पोहचलं नव्हतं. या स्वातंत्र्य वेदीवर अनेकांनी प्राणाचं बलिदान दिलं होतं. प्रचंड हाल, छळ सहन करून स्वातंत्र्याची मशाल धगधगत ठेवली होती. या स्वातंत्र्यलढ्यात प्राणाची बाजी लावून देशासाठी लढणारी ती एक तेजस्वी शलाका होती.

दुसरे बाजीराव पेशवे यांचे दत्तक पुत्र नानासाहेब पेशवे म्हणजे मराठा रियासतीचे शेवटचे पेशवे यांची कन्या मैनावती! नानासाहेब पेशवे यांना दत्तक घेण्यापूर्वीच दुसरे बाजीराव युद्धात पुणे गमावून बसले. इंग्रजांनी पेशव्यांना ताब्यात घेऊन त्यांना बिठूर येथे रवाना केले आणि त्यांनी शिंदे, होळकर यांच्याशी संधान साधून परत उठाव करू नये यासाठी त्यांना बिठूर सोडायची परवानगी नव्हती. त्यामुळे त्यांचा शेवटचा काळ इंग्रजांनी दिलेल्या पेन्शनवर व्यतीत झाला. पेशव्यांच्या निधनानंतर नानासाहेब पेशवे झाले. पण ब्रिटिशांनी हे दत्तक विधान नाकारत पेशव्यांची आठ लाखाची पेन्शन नाकारली. नानासाहेबांनी अनेक इंग्रज अधिकाऱ्यांशी संवाद साधला पण, उपयोग झाला नाही. ब्रिटिशांचा हा अन्याय सहन न होऊन नानासाहेबांनी १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला.

नानासाहेबांची लाडकी लेक मैनावती! आईविना वाढलेली म्हणून त्यांचा तिच्यावर फार जीव! जात्याच हुशार असलेल्या या मुलीला पेशव्यांच्या रितीप्रमाणे सर्व प्रकारचे शिक्षण देण्यात आले. बिठूर येथे त्यांचा राहता वाडा ब्रिटिश कॅम्पचा भागात होता. त्यामुळे ब्रिटिश अधिकाऱ्यांचा राबताही या वाड्यात असे. मैनावती ही याच अधिकाऱ्यांच्या मुलींबरोबर वाढल्याने तिला इंग्रजीही थोडी अवगत झाली होती. सर्व ज्ञानात पारंगत असलेली ही लेक धाडस आणि साहस यात कुठेही कमी नव्हती.

१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात पेशव्यांच्या सैनिकांनी कानपूरवर विजय मिळवला आणि ब्रिटिश बायका मुलांना पुरुषांसह कैद केलं. सर्व ब्रिटिश कुटुंबाना ठार करावे या उद्देशाने पेशव्यांकडे परवानगी मागितली. पण, नानासाहेबांनी इंग्रज मुलाबायकांना सन्मानाने बिठूरला पोहचवण्याचे निर्देश दिले. इंग्रजांच्या कुटुंब कबिल्याचा पाहुणचार करून, मैनावतीच्या सोबतीने त्यांना कानपूरकडे रवाना केलं. तिने त्या सर्वांना त्यांच्या ठिकाणी सुखरूप पोहोचवले. पण, इंग्रजांना या माणुसकीची किंमत कळलीच नाही.

ती परत येईपर्यंत परिस्थिती बदलली होती. कानपूर पुन्हा इंग्रजांच्या ताब्यात गेले आणि नानासाहेबांना परिस्थितीवश बिठूर सोडावं लागलं. मैनावती बिठूरला परतली तेव्हा वाड्यात कोणीच नव्हतं. इंग्रजांनी पेशव्यांचा हा वाडा लुटला आणि भयग्रस्त झालेले सर्व नोकर वाड्यातून पळून गेले. इंग्रजांनी आता वाडा उध्वस्त करण्याच्या दृष्टीने तोफा डागायला सुरुवात केली. मैनावतीने वाड्याबाहेर येत त्या इंग्रज अधिकाऱ्याला यासंबंधी जाब विचारला. थॉमस नावाच्या या अधिकाऱ्याने आपल्याला तशा सूचना मिळाल्या आहेत पण, या वाड्याला इजा पोहचवायची नसेल तर, व्हाईसरॉयकडून परवानगी मागावी लागेल, असं सांगितलं. त्याप्रमाणे लेखी परवानगी मागण्यासाठी त्यांनी तार रवाना केली.

पण, मैनावतीचं आणि बिठूरचं दुर्दैव की, लॉर्डच्या सभेत ही मागणी धुडकावली गेली आणि काहींनी असा निष्कर्ष काढला की, थॉमस या अधिकाऱ्याचं मैनावतीवर प्रेम आहे म्हणून त्याने ही मागणी केली. सभेत एक आणखी निर्णय झाला की, पेशव्यांच्या मुलीकडून नानासाहेबांचा पत्ता मागून घेणे आणि देत नसेल तर तिला मृत्युदंड देणे!


अवघ्या १५ वर्षांच्या मैनावतीने त्या सर्व इंग्रज कबिल्याला सुखरूप पोहचवलं होतं. त्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे तर दूरच पण, तिलाच मृत्युदंड! थॉमसच्या मुलीनेही याला विरोध केला होता. बिठूरचा वाडा पाडला, खजिन्याच्या शोधात खणून काढण्यात आला. मैनावतीला बंदीवासात टाकून अमानुष छळ करण्यात आला. बिठूर ते कानपूर हा १७ किलोमीटरचा प्रवास, रस्त्यावरून धावणारे असंख्य घोडे आणि एका ब्रिटिशाच्या घोड्याला मागे बांधून फरफटत नेणं, ही छळाची परिसीमा होती. त्या रक्तबंबाळ शरीरातून वेदनेचा हुंकारही निघाला नाही. राष्ट्रासाठी आत्मबलिदान द्यायला मैनावती समर्थ होती. तात्या टोपेंचं बलिदान आणि वडील नानासाहेब राष्ट्रासाठी करीत असलेल्या संघर्षाचा इतिहास तिच्या डोळ्यांसमोर होता. तिला झाडाला बांधून जीवंतच पेटवून देण्यात आलं. ब्रिटीशांचं हे भयंकर क्रौर्य ! ती जळत होती पण, एकदाही मला वाचवा हे शब्द तिच्या मुखातून बाहेर पडले नाही. असंख्य चटक्यांनी वेदनेचा एक प्रचंड डोह शरीरभर पसरला. केवढं प्रचंड हे धाडस आणि वेदनेतही मुखातून शब्द न काढण्याचा संयम. मुर्दाड भारतीय उभे राहून हे जळीतकांड उघड्या डोळ्यांनी बघत होते. पण, तिचं हे वीरमरण बघून देशभक्तीची लाट जनमानसात निर्माण झाली. मैनावतीच्या बलिदानाला मानाचा मुजरा!

# गुणकारी लेंगडा भाजी

रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५

निसर्गाची किमया न्यारीच आहे पण, त्याच्या या अनमोल संपत्तीचा मात्र आजच्या माणसाला विसर पडला आहे. निसर्गाने मानवाला जवन जगण्यासाठी आवश्यक त्या वस्तूंची उपलब्धता अस्सल रानभाजी आहे तिला झाडीबोली भाषेत ‘लेंगडा‘ किंवा लेंगळा‘ भाजी या नावाने ओळखली जाते. ती भाजी वर्षातून फक्त दोनच महिने मिळत असते. जून महिन्यात ती डोंगराच्या पायथ्याशी, खडकाळ जमीनीवर आणि डोंगरावर उगवत असते. जुलै आणि ऑगस्ट या दोनच महिन्यात ही लेंगडा भाजी मिळत असते. पावसाळ्यात मिळणारी ही भाजी माणसांसाठी फार मोठी वनस्पती आहे



आजही गावखेड्यातील लोक या भाजीचे पदार्थ बनवून एकदातरी आवडीने खातात. या भाजीला आणखी वेगवेगळ्या नावांनी ओळखले जात असावे. जाणकारांच्या मते, ही लेंगडा भाजी शरीरात उष्णता निर्माण करते. या भाजीची उंची वाढत नाही. जमिनीवर उगवताना चिरीव व लांब आकाराची पातं तयार होतात. ही भाजी गुरेसुद्धा खातात. ती भाजी उकडून घेतल्यावर खालचा भाग पांढराशुभ्र असतो. या भाजीचे वडे आणि आयते बनवितात. चविष्ट लेंगडा भाजीचे पदार्थ बनविण्याची पद्धत फार सोपी आहे. उपटून आणल्यावर पाण्याने स्वच्छ धुवून घेतात. नंतर,कोवळ्या लुसलुशीत पात्यांना बारीक चिरून घेतात व खालचा पांढरा भाग फेकून देतात. ही भाजी चिरल्यावर थोडासा चिकटपणा असतो म्हणून आधीच एक वाटी तांदूळ भिजवून घेतात. भिजलेल्या तांदुळामध्ये चिरलेली लेंगडा भाजीची पात, चार हिरव्या मिरच्या, आलं, लसणाच्या तीन पाकळ्या, धणे एकत्रित करून पाट्यावर किंवा मिक्सरमध्ये बारीक करून घेतात. त्या पेस्टमध्ये जेवढी भाजी असेल त्याप्रमाणे तांदळाचे पीठ, जिरे, चमचाभर तिखट, मीठ, हळद, बारीक चिरलेली कोथिंबीर व पाणी घालून ते मिश्रण पातळ भिजवून घेतात. नंतर तवा गरम झाल्यानंतर तव्याला तेल लावून हे भिजवलेले मिश्रण तव्यावर गोल चमच्याने पसरवतात. सभोवताली तेल फिरवून नंतर त्यावर झाकण ठेवतात. दोन मिनिटांनी ते झाकण बाजूला करून तव्यावर पसरवलेलं आयतं किंवा धिरडे परतवून घेतात.

लेंगडा भाजीचे आयते खूप खमंग होतात. लेंगडा भाजीचे वडे बनवताना मुगाची डाळ भिजवून, वाटून घेतात. नंतर त्यात लेंगडा भाजीचं पातं बारीक करून टाकतात. एक वाटी तांदळाचं पीठ, हिरव्या मिरच्या, आलं-लसणाचं वाटण, मीठ, हळद, तिखट, जिरे, कोथिंबिर, गरम मसाला टाकून एकजीव करून घेतात. कढईत भरपूर तेल टाकून त्या मिश्रणाचे वडे तयार करून तेलात खमंग तळून घेतात. कुरकुरीत आणि चविष्ट वाटतात. रानात मिळणारी ही गुणकारी लेंगडा भाजीचा आहारात समावेश करावा.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# संघाच्या समाजकेंद्री कार्यातून भटक्या-विमुक्तांसाठी नवदिशा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३ ऑगस्ट -**

भटक्या आणि विमुक्त जातींच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक उत्थानासाठी रचनात्मक चळवळी आणि नव्वदोत्तरी मराठी साहित्य यांचा समन्वय आवश्यक आहे, असे प्रतिपादन विविध मान्यवरांनी केले. 'आधुनिक सामाजिक-राजकीय चळवळी व नव्वदोत्तरी साहित्य' या विषयावरील परिसंवादात त्यांनी आपले विचार मांडले.

या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार दत्ता जोशी होते. परिसंवादात काशिनाथ पवार, मृणालिनी नानिवडेकर, आणि आशुतोष अडोणी यांनी अभ्यासपूर्ण विचार मांडले. या कार्यक्रमाला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलगुरू डॉ. अशोक महाजन, व लातूरचे माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

भटक्या-विमुक्त समाजाच्या प्रश्नांवर भाष्य करताना काशिनाथ पवार म्हणाले, पूर्वी या समाजाची जीवनपद्धती परिघाबाहेरची होती. शिक्षण व संधीपासून तो वंचित राहिल्याने त्यांच्यावर गुन्हेगारीचा ठपका लागला. इंग्रजांनी 'गुन्हेगार जमाती' ठरवून संपूर्ण कुटुंबांना तुरुंगात टाकण्याचे कायदे केले. परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रचनात्मक चळवळीमुळे या समाजाचा उत्थानाचा मार्ग खुला झाला आहे. विद्रोहाशिवाय चळवळ होत नाही हा रूढ समज संघाच्या कार्यामुळे बदलला आहे.

मृणालिनी नानिवडेकर म्हणाल्या, १९९० च्या दशकातील मंडल आयोगानंतरची आंदोलने 'मला काय मिळणार' या दृष्टिकोनातून होती. अस्मितेच्या राजकारणाने समाज भरकटला. आज व्यक्तिकेंद्री आंदोलने होत असली, तरी ती देशविघातक स्तरावर गेलेली नाहीत. मात्र या चळवळी समाजाला काय देतात याचा शोध साहित्यिकांनी घ्यायला हवा. संघाचे कार्यकर्ते जे सामाजिक विचार मांडतात, त्याला समाज स्वीकारतो आहे. त्यामुळे कार्यकर्ते आणि साहित्यिक यांच्यात वैचारिक घुसळण होणे गरजेचे आहे.

सामाजिक समरसतेच्या मूल्यांवर भाष्य करताना आशुतोष अडोणी म्हणाले, सर्वांनी एकाच ताटात जेवावे असे वाटणे म्हणजेच समरसतेचा खरा अर्थ. संघाच्या कार्यातून निर्माण झालेल्या रचनात्मक कृतीमुळे समाजात बंधुभावाचा प्रसार झाला आहे. वैचारिक सृष्टीच्या आकलनासाठी संघाने उभे केलेले सांस्कृतिक कार्य महत्त्वाचे ठरले आहे.

या परिसंवादाचा समारोप करताना दत्ता जोशी म्हणाले, रचनात्मक कार्याचे प्रतिबिंब समाजात उमटते. देशाची उभारणी सकारात्मक चळवळींमुळे होत आहे. साहित्यिकांनी ग्रामीण भागातील अनुभवांवर आधारित लेखन करत राष्ट्रीय विचारांना साहित्यिक अधिष्ठान दिले तर ते व्यापक समाजपरिवर्तनाचे साधन ठरू शकते. संघाच्या रचनात्मक कार्यामुळे समाजाच्या मनामनात विश्वास निर्माण झाला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश अहिरराव यांनी केले. कार्यक्रमाला नांदेड शहरातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.फ्फ

## हिमायतनगर तालुक्यात महसूल दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, दि. ३ ऑगस्ट -**

शासनाच्या महसूल विभागामार्फत तालुक्यातील महसूल सप्ताह दि.१ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या योजनेची माहिती लाभ सेवा नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी शासनाने हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. हिमायतनगर तालुक्यातील विविध ठिकाणी विविध विषयावर निराकरण करून त्याची माहिती तालुक्यातील जनतेला देण्यात येणार आहे त्यामुळे या महसूल सप्ताहाचा शुभारंभ दिनांक १ ऑगस्ट रोजी हिमायतनगर तहसील कार्यालयात होणार असल्याची माहिती तहसीलदार पल्लवी टेमकर यांनी दिली.

राबविण्यात येणाऱ्या महसूल दिनानिमित्त हिमायतनगर महसूल संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांना उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार वितरत करून प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत ,२ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सण २०११ वर्षापासून रहिवासी प्रयोजणार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबापैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रमण जागांचे पट्टे वाटप करणे बाबत कार्यक्रम व ३ ऑगस्ट रोजी हिमायतनगर तालुक्यातील मौजे सिरंजनी येथील पानंद शिव रस्त्याची मोजणी करून त्याच्या दुतर्फा झाडे लावणे ,४ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घर भेटी देऊन डीबीटी करून अनुदानाचे वाटप करणे व ५ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळ निहाय राबविले जाणारे ह्याचे उद्घाटन हदगाव हिमायतनगर विधानसभेचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या हस्ते शहरातील श्री परमेश्वर मंदिर येथे होणार आहे सहा ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमने निष्कासित करणे व त्या अतिक्रमण मुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनी बाबत शासन धोरणानुसार निर्णय घेणे व ७ ऑगस्ट या महसूल दिनाच्या शेवटच्या दिवशी एम - सांड धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे धोरण पूर्णत्वास व या महसूल सप्ताहाचा समारोप कार्यक्रम होणार आहे या महसूल सप्ताहाची तालुक्यातील सर्व जनतेने अवश्य लाभ घेऊन वरील विषयावर समस्या असतील तर त्या संबंधि तालुका मंडळाधिकारी व तलाठी यांच्याशी संपर्क करून त्या कागदपत्राची पूर्तता करावी व या मोहिमेमध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन हिमायतनगर तहसीलचे तहसीलदार पल्लवी टेमकर यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### ९ वी राज्यस्तरीय अबॅकस परीक्षा संपन्न; विजेत्यांना बक्षीस वितरण

**माहूर** -मेट्रो ब्रेन अबॅकस अॅकॅडमी प्रायव्हेट लिमिटेड, लातूर यांच्या वतीने ९ वी राज्यस्तरीय अबॅकस परीक्षा दिनांक २७ जुलै रोजी माहूर



येथील श्री बालाजी मंगलम कार्यालयाच्या भव्य सभागृहात मोठ्या उत्साहवर्धक वातावरणात यशस्वीरित्या पार पडली. परीक्षेनंतर झालेल्या बक्षीस वितरण समारंभात विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्रे व पदक देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेट्रो ब्रेन अबॅकस अॅकॅडमीचे संचालक संतोष लोहारे हे होते. समारंभाचे उद्घाटन माहूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष फिरोज दोसाणी,श्री रेणुकादेवी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विलास पाटील,प्रा. डॉ.तुळशीदास गुरनुले आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. झेड गट : सर्वेश पाटील, अर्णव राऊत, मंजिरी फड, वेदश्री अरगुलवार,ए गट : आयुष राठोड, सावी खोंडे, सार्थक चेवटे, बी गट : स्वरा देवणे, सृष्टी सूर्यवंशी,सी गट : समृद्धी जायभाये, शताक्षी पोपुलवार, तन्वी गहूकर, डी गट : श्रेया पराते, वैदेही देवरसे, ई गट : वैभवी दिनेश अरगुलवार, एडव्हान्स गट : भक्ती भुमलू श्रीरामवार ई गट-वैभवी दिनेश अरगुलवार आणि एडव्हान्स गट- भक्ती भुमलू श्रीरामवार यांनी वेळेचे नियोजन आणि अचूकतेच्या जोरावर आपली गुणवत्ता सिद्ध करत ग्रँड टॉपर पुरस्कार पटकावला. माहूर येथे सात वर्षांपूर्वी फक्त दोन विद्यार्थ्यांच्या सहभागाने सुरू झालेली ही बौद्धिक चळवळ स्मिता कुळकर्णी-जोशी यांच्या प्रयत्नातून आज ६० विद्यार्थ्यांच्या सहभागापर्यंत पोहोचली आहे. या वर्षीच्या परीक्षेत सहभागी विद्यार्थ्यांचा उत्साह आणि त्यांच्या गणन कौशल्याचे कौतुक सर्वत्र झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मेट्रो ब्रेन अबॅकस अॅकॅडमीच्या फ्रँचायजीधारकांनी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.या सर्वांमध्ये विद्यार्थ्यांचे गणन कौशल्य आणि आत्मविश्वास निश्चितच सर्वांसाठी प्रेरणादायी ठरले..

### उत्कृष्ठ ग्राम महसूल अधिकारी मूळेकर यांचा सन्मान

**भोकर** -शासनाच्या वतीने उत्कृष्ठ काम करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मान महसूल दिनी करण्यात येतो.त्या अनूषंगाने भोकर तहसील कार्यालयात महसूल दिनी दि.१ऑगष्ट रोजी आयोजीत केलेल्या कार्यक्रमात किनी चे ग्राम महसूल अधिकारी नामदेव मूळेकर यांनी उल्लेखनिय कामगीरी केल्याबद्दल तहसीलदार विनोद गूंडमवार यांनी त्यांचा सन्मापत्र देवून गौरव करण्यात आला. ग्राम महसूल अधिकारी नामदेव मूळेकर यांनी भोकर तालूक्यातील किनी गावात कर्तव्य बजावत असताना शासनाच्या नियमानूसार शेतीविषयक प्रलंबित प्रकरणे शेतकरी विविध योजनेचे लाभार्थी यांची प्रकरणे निकाली काढून शेतकरी लाभार्थी यांना न्याय मिळवून दिला त्यांनी केलेल्या उल्लेखनिय कामाची दखल घेवून भोकरचे तहसीलदार गूंडमवार यांचे हस्ते मूळेकर यांचा सन्मापत्र देवून गौरव करण्यात आला त्यांचा सन्मान मिळाल्याबद्दल त्यांचे सहकारी मित्र परिवारांनी अभिनंदन केले.

### शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी हाणेगाव ते देगलुर पदयात्रा

**हाणेगाव,दि. ३ ऑगस्ट -** देगलूर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने व शिवसेना तालुका प्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापूरकर यांच्या नेतृत्वाखाली , व शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या आदेशानुसार दि. ०४ ऑगस्ट रोजी शेतकऱ्यांची कर्जमाफी सह इतर मागण्या संदर्भात हणेगाव ते देगलुर उपजिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पदयात्रा काढण्यात येत आहे. हाणेगाव परीसरातील सर्व शेतकरी बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना देगलुर तालुका प्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर यांनी केले आहे. यावेळी उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, उपतालुका प्रमुख उत्तम अन्सापुरे, दिलीप ईनामदार, मानाजी लोणे, पवन ईनामदार, भागवत पाटील सोमुरकर, दशरथ मोरे, गंगाधर पाटील आदी उपस्थित होते.

### नगरपंचायत येथे सेवा गौरव सोहळा



**हिमायतनगर, दि. ३ ऑगस्ट -** हिमायतनगर नगरपंचायतीच्या गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे सेवा देणारे करनिधारक मारोती केंद्रे ३१ जुलै २०२५) सेवानिवृत्त झाले. त्यांच्या गौरव सोहळ्याच आयोजन हिमायतनगर नगरपंचायत येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात अनेक सहकारी, वरिष्ठ अधिकारी आणि मित्रमंडळी उपस्थित होते. मारुती हेंद्रे यांनी आपल्या कार्यकाळात अत्यंत प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम केले. त्यांचा मनमिळाऊ स्वभाव, कामातील अचूकता आणि सहकाऱ्यांशी असलेले सौहार्दपूर्ण संबंध यामुळे ते सर्वांचेच आवडते अधिकारी होते. या कार्यक्रमात त्यांना शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, प्रभारी मुख्य अधिकारी तथा तालुका दंडाधिकारी पल्लवी टेमकर, माजी नगराध्यक्ष अखिल, सरदार खॉन, संजय माने, संदीप तुप्तेवार , फिरोज खॉन, शिंदे ,काटकर, शिंदे,बाच्चे, यासह अनेक कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

## विद्यार्थी लाभाच्या योजनांपासून कुणीही वंचित राहू नये: बनसोडे

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ३ ऑगस्ट -**

विद्यार्थी लाभाच्या योजना सर्व स्तरांतून परिणामकारकपणे राबविण्यात याव्यात व त्यापासून कुणीही वंचित राहणार नाही, याबाबत सर्वांनी जागरुक राहून कार्य करावे असे आवाहन

शिक्षणाधिकारी योजना, जि.प.नांदेड दिलीप कुमार बनसोडे यांनी माहूर येथे आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना केले.

शिक्षण संचालनालय योजना महाराष्ट्र राज्य पुणे, शिक्षणाधिकारी योजना जि.प.नांदेड मार्फत राबविण्यात येणाऱ्या विवीध विद्यार्थी लाभाच्या योजना संदर्भात 'योजनेचा जागर' कार्यशाळा दि.३०/०७/२५ रोजी वसंतराव नाईक सभागृह पंचायत समीती, माहूर येथे शिक्षणाधिकारी योजना जि.प.नांदेड दिलीप कुमार बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी दिलीपकुमार बनसोडे यांच्या मार्गदर्शनात इयत्ता ६वी ते १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या विविध योजनांना प्रभावीपणे राबवण्यासाठी सर्व माध्यमातील जिल्हा परिषद व खाजगी माध्यमिक मुख्याध्यापक,विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख व विषय तज्ञ यांना सखोल मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यशाळेचे अध्यक्ष दिलीपकुमार बनसोड पुढे बोलताना म्हणाले कि,दुर्गम-डोंगरी-अदिवासी भागातील विद्यार्थी वर्गासाठी स्वतःला झोकून द्यावं लागेल. तसेच या समाजाचं आपण सर्वांना देणं लागतं ते आपल्या कार्यातून आपण पूर्णत्वास न्यावं! असेही ते म्हणाले.

या कार्यशाळेस यावेळी संतोष शेटकार गटशिक्षणाधिकारी, माधवराव शिंगडे उपशिक्षणाधिकारी योजना,संग्राम कांबळे शिक्षण विस्तार अधिकारी करंजी बीट,वानोळा बिटचे शिक्षण विस्तार अधिकारी बिरमवार,गटसमन्वयक संजय कांबळे,रुस्तम शेख, काशीनाथ थोंटे, शेषराव पाटील यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

त्याचप्रमाणे या कार्यशाळेस सर्व माध्यमातील मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि साधनव्यक्ती गटसाधनकेंद्र माहूर हे उपस्थित होते.

यावेळी माधवराव शिंगडे उपशिक्षणाधिकारी यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या विविध शिष्यवृत्या तसेच रुस्तुम शेख यांनी विविध लाभाच्या शासनाच्या योजनांच्या संदर्भात माहीती देताना सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यशाळा संपन्नतेवर माहुरचे गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार यांनी उपस्थितांचे आभार मानले व सर्वांना काम करण्यासाठी प्रोत्साहित केले.

## महसूल सप्ताहानिमित्त चिखलीसह बेदी तांडा येथे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ३ ऑगस्ट -**

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार व सहाय्यक जिल्हाधिकारी जेनिथ चंद्र दोनतुला यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते ७ ऑगस्ट २०२५ दरम्यान महसूल सप्ताह साजरा केला जात आहे. या अनुषंगाने किनवट तालुक्यात सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवले जात असून नागरिकांमध्ये जनजागृतीचा प्रयत्न महसूल विभागातर्फे सुरू आहे.






या सप्ताहा अंतर्गत चिखली तांडा व सजा बेदी तांडा (मौजे आमडी) येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. चिखली तांड्यावर झालेल्या उपक्रमात नायब तहसीलदार बालाजी फोले, मंडळ अधिकारी गाडे, ग्राम महसूल अधिकारी हरिष यादव (चिखली बू.), यू.आर. जाधव (कोठारी), उपसरपंच गजानन पवार व ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, सजा बेदी तांडा अंतर्गत मौजे आमडी येथे पांदन रस्त्याच्या दुतर्फा झाडांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमात महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांसह गावकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पर्यावरण रक्षणाचा संदेश देत त्यांनी स्वतः झाडे लावली. तहसीलदार डॉ. शारदा चोंढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभाग 'महाराजस्व अभियान'ही राबवत असून, विविध शासकीय योजनांची माहिती देणे, आवश्यक कागदपत्रांची तपासणी व ऑनलाईन नोंदणीची सुविधा ग्रामपातळीवर उपलब्ध करून दिली जात आहे.

या उपक्रमांद्वारे महसूल प्रशासनाने सामाजिक बांधिलकी जपत जनतेशी आपले संबंध अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला आहे.

## अॅड. सुरेश देसाई यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. ३ ऑगस्ट -**



तालुक्यातील देगाव येथील जेष्ठ सरकारी विधीज्ञ सुरेशराव जयवंतराव देसाई देगावकर यांचे दीर्घ आजाराने शनिवार दि. २ ऑगस्ट २५ रोजी सायंकाळी ५ वाजता निधन झाले. मृत्यू समयी ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी भारतीताई देसाई, शिवस्मारक समितीचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक अॅड.अंकुश देसाई देगावकर, डॉ. अक्षय देसाई देगावकर हे दोन मुले, एक मुलगी मोठा परिवार आहे.

## सिडको येथे अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ३ ऑगस्ट -**

लोकशाहीर साहित्य सम्राट डॉक्टर अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९:३० वाजता सिडको अण्णा भाऊ साठे सभागृह येथे ध्वजारोहणा नंतर अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सिडको अण्णाभाऊ साठे सभागृह येथील अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सिडको हडको परिसरातील सामाजिक, राजकीय, शासकीय अधिकारी पदाधिकारी व समाज बांधवांच्या वतीने दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९:३० वाजता ध्वजारोहण विनय गिरडे यांच्या हस्ते करण्यात आला.तर विठ्ठल राज नगर हडको येथे अण्णाभाऊ साठे चौक उस्मान नगर रोड या ठिकाणी सकाळी ११ वाजता आर्.जे्. वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी प्रीतम डोम्पले, बालाजी बसवंते, विप्रोजी गायकवाड, नागेश बसवंते, शिरीष रामापुरे, श्रीनिवास बसवंते, राजेंद्र कांबळे, अतुल वाघमारे, पवन डोम्पले, साई बसवंते, प्रदीप भांगे, आर्यन सोनकांबळे, सोनू कांबळे, सुदर्शन जाधव यांची उपस्थिती होती यावेळी खिचडीचे वाटप सौ. शोभा मरिबा बसवंते यांच्या हस्ते करण्यात आले.तर अण्णाभाऊ साठे सभागृह येथे यावेळी राष्ट्रगीत घेण्यात आले तदनंतर अभिवादन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी जयंती मंडळाचे अध्यक्ष सुरेश कांबळे, माजी नगरसेविका बेबीताई गोपीले, जनार्दन गोपिले, गंगाधर वाघमारे, आर्.जे. वाघमारे, नारायण कोलंबीकर, मधव डोम्पले, पप्पू गायकवाड, चंद्रकांत मेकाले, प्रकाश दर्शने, आनंद गायकवाड, शंकरराव धीरडीकर, विठ्ठल घाटे, नितीन वाघमारे, संभाजी बसवंते, सखाराम गजले, राजकोट सर, विठ्ठल वाघमारे, बाबू बाऱ्हाळीकर, शिवाजी वाघमारे, विशाल गडंबे, राहुल वाघमारे, मुन्ना कोलंबीकर, मरिबा बसवंते, शिवाजी मोरताटे, विलास वाघमारे, सुनील देवकांबळे, आनंदा वाघमारे, किसन वाघमारे, जयप्रकाश वाघमारे, रमेश तालीमकर, उत्तम घोडजकर, ईरावंत गायकवाड, सुभाष सूर्यवंशी ,बाबु कांबळे, देविदास सूर्यवंशी, माधव आंबटवार समाज बांधवांसह विलास गजभारे, राज लांडगे, सम्राट आढाव, प्रदीप हनवते, डी.के.कांबळे, गौतम पवार, व्हॉइस ऑफ मीडिया दक्षिण नांदेड पत्रकार संघाचे अध्यक्ष संभाजी सोनकांबळे, सचिव शिवाजी राजुरकर, सहसचिव सुरेश आंबटवार, कार्याध्यक्ष डीगा पाटील शिंदे यांच्यासह राजकीय सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. तर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनी व्यंकट कुसने, गोपनीय शाखेचे बालाजी दंत्तापले ,बाळासाहेब टर्के यांचा बंदोबस्त होता.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन यशवंत गादेकर यांनी केले.

## स्व. प्रा. किनवटकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ३ ऑगस्ट -**

प्रा. किशनराव किनवटकर यांच्या चौथ्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक ३१ जुलै रोजी किनवट शहरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्व .किशनराव किनवटकर सांस्कृतिक संवर्धन मंडळ आयोजित या उपक्रमात पर्यावरणपूरक झाडे लावून त्यांना अभिवादन करण्यात आले.

वृक्षारोपणाचा कार्यक्रम साने गुरुजी इमर्जन्सी हॉस्पिटल, एम.आय.डी.सी. परीसर कोठारी येथे तसेच मानव कल्याण ट्रस्ट संचलित मनसब योग साधना केंद्र परिसरात पार पडला. या प्रसंगी शहरातील विविध मान्यवर उपस्थित होते.

## राष्ट्रीय अवयवदान दिनानिमित्त नांदेड शहरात रॅली

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. ३ ऑगस्ट -**

राष्ट्रीय अवयवदान दिनानिमित्त शहरातील मुख्य रस्त्यावरून, अवयवदान जाणीव जागृतीचे भव्य आयोजन करण्यात आले .सकाळीच महात्मा फुले पुतळ्याजवळ सर्व प्रथम अवयवदान प्रतिज्ञा ज्योती पिपंळे यानी दिली ,त्यानंतर अर्पण अवयवदान समितीचे अध्यक्ष माधव अटकोरे यानी मनोगत व्यक्त करताना ३ ते १५ ऑगस्ट या पधंरवाड्यात मोठ्या प्रमाणावर अवयवदान विषयावर विविध उपक्रम राबविण्यात येत असून, हा पधंरवाडा लाकुड मुक्त स्मशानभूमी अभियान राबविण्यात येणार आहे .प्रत्येकाने अवयवदान संकल्प करून या माणुसकीच्या विचाराला गतीमान करावे आणि अवयवदानाच्या बाबतीत नांदेड जिल्हा स्वयंपूर्ण करावा असे आवाहन केले.

त्यानंतर या अभूतपूर्व कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित असलेले डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.सुधीर देशमुख, जिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली , जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके,जि.प.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगीता देशमुख, डॉ. यशवंत पाटील, डॉ. हनमत पाटील, डॉ. सत्यनारायण मुरमुरे आणि माधव अटकोरे यानी रॅलीच्या सुरूवातीला हिरवा झेन्डा दाखवून रॅलीची सुरूवात केली.

## किनवट येथे साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती सोहळा उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ३ ऑगस्ट -**

साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त किनवट येथील डॉ. अण्णाभाऊ साठे पुतळा परिसरात आयोजित भव्य सोहळ्यात परिसराच्या सुशोभीकरण आणि विकास कामांचे उद्घाटन आमदार भिमराव केराम यांच्या हस्ते झाले. यावेळी आकर्षक "I Love Kinwat' सेल्फी पॉइंटचाही शुभारंभ करण्यात आला. या सोहळ्याला विविध पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, नगरपरिषदेचे अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ नेते मारोती सुंकलवाड यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक आणि सामाजिक योगदानाचा गौरव करत उपस्थितांना त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. यानंतर ध्वजारोहण आणि डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात आमदार भिमराव केराम यांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक कार्याची प्रशंसा केली. ते म्हणाले, डॉ. अण्णाभाऊ साठे हे साहित्याची खाण होते. त्यांच्या साहित्यातून सामाजिक बदल आणि प्रबोधनाचा संदेश मिळतो. समाजाने त्यांच्या विचारांचा अवलंब करून सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा. त्यांनी सामाजिक एकता आणि विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते कपिल नाईक, माजी नगराध्यक्ष इसा खान, के. मुर्ती, आनंद मच्छेवार, साजिद खान, आणि श्रीनिवास नेम्मानिवार, स्वागत आयनेनिवार यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या सामाजिक समतेच्या विचारांना पुढे नेण्याचा संकल्प केला. सत्यवंश सोनकांबळे यांच्या परिवर्तन गीत गायन पार्टीने प्रबोधनात्मक गीते सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. या गीतांनी सामाजिक जागरूकतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचवला. हा जयंती सोहळा केवळ डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतींना उजाळा देणारा नसून, त्यांच्या विचारांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी समाजाला प्रेरणा देणारा ठरला. किनवट परिसरातील जयंती निमित्त सजावट व सुशोभीकरण या करिता माजी उपनगराध्य श्रीनिवास नेम्मानिवार यांनी साठे नगर येथिल युवक मंडळासह परिश्रम घेतले. तसेच नव्या सेल्फी पॉइंटमुळे शहराच्या सौंदर्यातही भर पडली आहे.

कार्यक्रमाला मातंग समाजाचे अध्यक्ष शिवन्ना कलगुटवार, दादाराव कयापाक, बालाजी मुरकुटे, आयनेन्नीवार, अभय महाजन, गंगारेड्डी बैनमवार, गजानन पाटील, बालाजी बामने, वैजनाथ करपुडे, नागनाथ भालेराव, लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, मारोती भरकड, अमन कुंडगीर, शंकर भंडारे, आकाश भंडारे, भगवान मारपवार, राजेंद्र भातनासे, संतोष मारपवार, अॅड. हरीभाऊ दर्शनवाड, अॅड. राहुल नाईक, साजीद बडगुजर, अतुल दर्शनवाड, शिवा क्यातमवार, बालाजी धोतरे, अॅड. माज बडगुजर, आणि मिलिंद सर्पे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याशिवाय पत्रकार, विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते आणि नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांनीही हजेरी लावली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ अण्णाभाऊ साठे जयंती समितीचे अध्यक्ष साई दिसलवार, उपाध्यक्ष विशाल दोनपेल्लीवार, कोषाध्यक्ष राकेश उप्पलवार, सचिव अविनाश कालासवार. सह कोषाध्यक्ष अंकुश मंत्रीवार, सहसचिव सचिन माहुरकर, आयोजक संतोष मारपवार यांनी कठोर परिश्रम घेतले तर यांच्यासह सदस्य विकास गोंटीमुकुलवार, अनवेश माहुरकर, सुशांत राशलवार, रोहीत गडचंदावार यांनी देखिल परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारोती सुंकलवाड यांनी केले व शेवटी उपस्थितांचे आभार मानले. मातंग युवक मंडळाने या कार्यक्रमाचे अत्यंत उत्कृष्ट संयोजन केले, ज्यामुळे हा सोहळा यशस्वी आणि संस्मरणीय ठरला.